म. ग्रं. सं. ठाणे.
विषय भू प्रवास
सं. क्र. ७८७

REFBK-0026672
REFBK-0026672

# अपरिचित महाराष्ट्र

(पर्यटकांना आकर्षित करणारी
परंतु फारशी माहिती नसलेली महाराष्ट्रातील स्थळे)

लेखक
डॉ. सुरेश गरसोळे
एम्.ए., पीएच.डी., एफ.आर.जी.एस. (लंडन)

प्रस्तावना
पं. महादेवशास्त्री जोशी

REFBK-0026672
REFBK-0026672

मूल्य रुपये पंचवीस फक्त

नितीन प्रकाशन, पुणे ३०.

प्रकाशक
नितीन वसंत गोगटे
नितीन प्रकाशन
१४६४ सदाशिव पेठ
पुणे ४११०३०

© डॉ.सुरेश गरसोळे

प्रथमावृत्ती : १६ मे १९९२

टाईपसेटिंग
इफेक्टस्
९/२३, आयडिअल कॉलनी
कोथरुड, पुणे २९.

मुखपृष्ठ
श्री. शाम देशपांडे

आतील व मुखपृष्ठावरील सर्व छायाचित्रे
डॉ. सुरेश गरसोळे

मुखपृष्ठ छायाचित्र
कमानदरवाजा, दौलताबाद किल्ला
मलपृष्ठ छायाचित्रे
१) रंधा धबधबा - भंडारदरा
२) जेब्रेश्वर मंदिर - फलटण

मुद्रक
निगुडकर अँड असोसिएटस्
४८४/७ मित्रमंडळ कॉलनी
पुणे ९

माझे ज्येष्ठ गुरु, भूगोलमहर्षि

डॉ. सी. डी. देशपांडे यांना

आदरपूर्वक

सुरेश गरसोळे

# यात्रिकाचे दर्शन

यात्रिकाचे दर्शन या जोड शब्दाचे दोन अर्थ संभवतात. एक म्हणजे आपण घेतलेले यात्रिकाचे दर्शन आणि त्याच्याशी केलेली बातचित. आणि दुसरे म्हणजे यात्रिकांना घडलेले किंवा त्याने मुद्दाम प्रयत्न करून स्वत:ला घडविलेले प्रदेशाचे दर्शन. या दोन्ही अर्थांनी मथळ्याचे शब्द मला अभिप्रेत आहेत.

महाराष्ट्र म्हणजे सामान्य चीज नव्हे. भौगोलिकदृष्ट्या तर एक छानदार अंतर्गोल वळण घेऊन वसलेला तो प्रदेश आणि मुख्य म्हणजे भारताच्या अगदी पोटातला प्रदेश आहे. वर विंध्य पर्वताने आडवी बैठक मारून विभाजित केलेला हा भारत आहे. खाली निमुळती दक्षिण, वर उत्तरेचा विस्तीर्ण मैदानी भूप्रदेश आणि या दोहोच्या थेट मध्यावर महाराष्ट्र वसला आहे. खरे तर हे आर्य - द्रविड संस्कृतींचे प्रभाग आहे. उत्तरेची आर्य आणि दक्षिणेची द्रविड या दोन्ही संस्कृती इथे एकमेकींना उराउरी भेटल्या त्या या महाराष्ट्रातच. मात्र तरीही महाराष्ट्रावर त्याची कला, स्थापत्य, चित्र आणि मंदिरवैविध्य या सगळ्या गोष्टी दक्षिणेकडे बोट दाखवितात.

महाराष्ट्राचे हे वैशिष्ट्य भारतात कोणत्याही प्रदेशाला लाभलेले नाही म्हणून ते जतन करण्याची, ते शोधण्याची, त्याचे विवरण करण्याची आणि आपुल्या सांस्कृतिक इतिहासावर नवा प्रकाश टाकण्याची जबाबदारी महाराष्ट्रावर येते. ती त्याला नाकारून भागणार नाही. दक्षिणेतील चालुक्य व राष्ट्रकूट यांनी उभारलेली स्थापत्यशिल्पे पाहिल्या, अभ्यासिल्याशिवाय कोल्हापूरच्या अंबाबाईची मंदिररचना अशी का ते कळायचे नाही. तसेच अंबरनाथचे शिवमंदिर हे कोणाशी आपला संबंध दाखविते तेही कळणार नाही. मंगल कार्यालयातील कित्येक सोहळे आणि सोपस्कार दक्षिणेशी संपर्क आल्याशिवाय प्रकाशित होणार नाहीत.

तर असा हा महाराष्ट्र. या महाराष्ट्रावर अनेक विद्वानांनी विद्वत्तापूर्ण असे लहानमोठे अनेक ग्रंथ लिहिले आहेत आणि तरीही ते वाचून आपल्याला महाराष्ट्र पाहिल्याचे समाधान होत नाही. मग त्यासाठी 'दुर्गदर्शन', 'तीर्थरूप महाराष्ट्र', 'असा हा महाराष्ट्र', 'ऐतिहासिक महाराष्ट्र', 'अपरिचित महाराष्ट्र' अशा या ग्रंथांची आवश्यकता राहतेच. जे मोठ्यांना दिसले नाही ते लहानांना दिसते आणि जे मोठ्यांनी दुर्लक्षित केले असे शिल्पादि दर्शन अशा लहानमोठ्या ग्रंथातून होते. पण तरीही महाराष्ट्राचे समग्र दर्शन घेतल्याचे समाधान लाभत नाही. महाराष्ट्र अपरिचितच राहतो. अशा या अपरिचित महाराष्ट्राचे दर्शन डॉ. सुरेश गरसोळे या गृहस्थांनी आपल्याला घडविले आहे. मात्र त्यांचा दावा असा असणार नाही की अपरिचित महाराष्ट्र वर्णून विवरून मी समग्र महाराष्ट्राची आकृती आणि प्रकृती उभी केली आहे.. अपरिचित महाराष्ट्रानंतर अल्प परिचित, अत्यल्प परिचित आणि दूर दऱ्यातला महाराष्ट्र अदृष्टच राहील.

अपरिचित महाराष्ट्रात परिभ्रमण करीत असताना गरसोळ्यांची दृष्टी स्थूल नाही. ती सूक्ष्म आहे आणि तिला रसिकतेचा भावस्पर्शही आहे. म्हणूनच गरसोळ्यांचे पुस्तक वाचताना आपल्याला आनंद होतो आणि काही बोधही होतो. उदाहरणार्थ, भोरच्या परिसरातील मोहरी गावातील अमृतेश्वर मंदिर पाहावे. हे गुंजण मावळातील ऐतिहासिक मंदिरस्थान असून आज मात्र पूर्ण दुर्लक्षित आहे.

शिवकालात या मंदिराचा खूप गाजावाजा होता. कारण इथले शिवलिंग घडविलेले नसून स्वयंभू आहे.

डेरवणची शिवसृष्टी बहुतेक कोणी वर्णीत नाही. पण गरसोळ्यांनी त्या क्षेत्राचा महिमा आत्मीयतेने वर्णून सांगितला आहे.

शनि शिंगणापूर या गावाला म्हणे कुलपेच नाहीत. सगळी घरेदारे तेथे बिनकुलपाची आहेत. या आजच्या स्वार्थी आणि हावभरी जगाचा यावर विश्वास बसेल? बसो अगर न बसो, पण आहे हे सत्य आहे.

भंडारदरा धरणापेक्षाही लेखकाला रंधा धबधब्याचे आकर्षण वाटले हे त्याच्या रसिकतेला साजेसेच आहे. अशी आणखी कितीतरी ठिकाणे.

डॉ. गरसोळे यांच्या लेखनाला शिस्त आहे असे दिसले. ते प्रमुख परिचित स्थळापासून विवक्षित स्थळाचे अंतर सांगतात, दिशा सांगतात, तेथे गेल्यावर काय पाहायचे ते सांगतात आणि वाचकांच्या मनात त्या अपरिचित स्थळाविषयी आभिरुची निर्माण करतात.

खरे तर या पुस्तकाचे नाव अपरिचित महाराष्ट्र असे न ठेवता अल्पपरिचित महाराष्ट्र असे ठेवणे अधिक उचित ठरले असते. डॉ. गरसोळ्यांनी दाखविलेल्या अपरिचित महाराष्ट्रापेक्षा खरा अपरिचित महाराष्ट्र अधिक खोल आहे, अधिक दुर्गम आहे, दऱ्यादरकुट्यांचा आहे आणि उग्र गंभीरही आहे. तेथे वास्तव्य करून असणाऱ्या माणसांचा सुधारलेल्या जगाशी आजवर संपर्क आलेला नसला तरी तिथेही मराठी संस्कृतीचे अनुबंध पाहायला, ऐकायला मिळतील. अर्थात हेही अपरिचित महाराष्ट्राचे दर्शन घडविण्याची नैतिक जबाबदारी आता डॉ. गरसोळे यांचेवर येऊन पडली आहे असे मी समजतो. ते तरुण आहेत, उत्साहीही आहेत. त्यामुळे ते हीही जबाबदारी पार पाडतील आणि त्यामुळे परिचित, अल्प परिचित आणि अपरिचित अशा त्रिविध महाराष्ट्राचे सर्वांगीण दर्शन वाचकांना घडेल.

आजकाल नवे काही वाचण्याविषयी विद्यार्थ्यांच्या मनामध्ये निरुत्साहच जाणवतो. दूरदर्शनने उगवत्या पिढीचे अनेक प्रकारे भले केले असले तरी त्याचबरोबर काही अपप्रवृत्तीही निर्माण केल्या आहेत.

अशा प्रतिकूल परिस्थितीतही हे पुस्तक विद्यार्थ्यांच्या हाती जावे, त्यांनी ते वाचावे आणि एकमेकांना सांगावे अशी मी शिफारस करेन.

**महादेवशास्त्री जोशी**

धायरी, पुणे ४११०४१
३०.४.१९९२

# अपरिचिताचे अंतरंग

निसर्गाची आणि मानवाची कला आणि कृती यांचे आगळे दर्शन घेण्याच्या अनिवार व उत्स्फूर्त इच्छेने मी गेली २०/२५ वर्षे प्रवास करतो आहे. त्याचे वेळोवेळी शब्दरूप चित्रण, छायाचित्रीकरण आणि मला भावलेले सौंदर्य अनेक लेखांतून मांडले. वेगवेगळ्या वर्तमानपत्रातून साप्ताहिकांतून आणि मासिकांमधून त्यांना प्रसिद्धीही मिळाली.

खरा भू-गोल, इतिहास, समाज, संस्कृती, शिक्षण, परिसर, पर्यावरण, प्रदूषण पाहायचे असेल तर असा प्रवास - तोही अपरिचित ठिकाणांचा प्रवास खूपच मोलाचा, महत्त्वाचा आणि अनुभव देणारा असतो. असा माझा अनुभव आहे. यातून निसर्गाचे, माणसांचे आणि समाजजीवनाचे विविध पैलू तर दिसतातच; परंतु हे सारे आपल्याला माहीत नव्हते - अज्ञात होते, म्हणून आपल्या अज्ञानाचीही नकळत जाणीव करून देतात. आपला अनुभव, ज्ञान, परिचित स्थाने किती थोडी आहेत; आणि अपरिचित किती अगाध आणि अनंत आहेत. आपले एवढेसे आयुष्य आणि उमेद, मर्यादित पैसा आणि वेळ यातून किती अप्रसिद्धांचा परिचय आपण करून घेऊ शकतो ? फारच थोड्या अपरिचितांचा मला झालेला परिचय खास मराठी वाचकांसाठी पुस्तकरूपाने एकत्रित करावा, तो साऱ्यांना वाटावा, पोहोचवावा !

'जे जे आपणांसि ठावे - ते ते इतरांसि सांगावे -' या दृष्टिकोनातून प्रथम प्रवास आणि नंतर लेखन केले. अशी ही अभिमानास्पद सौंदर्य लेणी महाराष्ट्राची 'अपरिचित पर्यटनक्षेत्रेच' आहेत.

पर्यटनातून परिसराचा अभ्यास हाही माझा एक हेतू होता. त्यातून पर्यावरणाची माहिती आणि प्रदूषणाची भीती याचेही दिग्दर्शन अशा डोळस स्थानदर्शनातून घडते. पर्यटन हा शिक्षणाचा नैसर्गिक मार्ग आहे. निसर्ग आणि मानव यांच्यातील परस्परसंबंध, सहकार्य आणि असहकार यातून शोधता येतो. बदलत्या पर्यावरणातून बदलते व्यक्तिमत्त्व - निसर्गाचे आणि मानवाचे जवळून पाहता येते. त्यातून आपले व्यक्तिमत्त्व घडते, विकसित होते. सर्वस्पर्शी, बहुअनुभवी होण्यास मदत होते; हाच तर शिक्षणाचा मूलभूत हेतू आहे, जो पर्यटनातून मिळणाऱ्या अनौपचारिक शिक्षणातून साधायला अनुकूल पर्यावरण तयार होते; म्हणूनच पर्यावरणाचा खरा प्रत्यक्षानुभव पर्यटनातून मिळतो. तो घ्यावा आणि द्यावा - देण्याने तो वाढतो - घासून पुसून अनुभवाच्या कसावर सिद्ध होतो, म्हणून हा लेखनप्रपंच !

आपला महाराष्ट्र मराठी माणसाने पाहावा. त्यातील परिचित, प्रसिद्ध, सुप्रतिष्ठित ठिकाणांबरोबरच काही अनोळखी ठिकाणांचा शोध घ्यावा. प्रत्यक्ष ही स्थाने पाहावीत, पूर्वतयारी करून माहिती घेऊन, अभ्यास - वाचन, प्रसंगी माहितगारांशी चर्चा करून अशा स्थानाच्या शोधाला निघावे. असे या पुस्तकाच्या वाचनातून घडले तर हवे आहे. तेच या लेखनाचे खरे श्रेय मी मानतो. कारण या पुस्तकात वर्णिलेली ठिकाणे एवढीच अपरिचित आहेत असे नव्हे, तर यापेक्षा असंख्य वैविध्यपूर्ण, आकर्षक ठिकाणे महाराष्ट्रात आहेत, हे नक्कीच ! त्याचा शोध घ्या, पहा - जमल्यास मलाही कळवा. कारण आजची अपरिचित स्थाने उद्याची परिचित स्थाने होतील म्हणून अपरिचिताचा हा शोध अखंड चालू राहील... तुमच्या आमच्या जिद्दीने - उत्साहाने आणि संशोधनाने !..

१ मे 'महाराष्ट्र - दिन'

**सुरेश गरसोळे**

# कृतज्ञता

वयाच्या ऐंशीव्या वर्षापर्यंतही सातत्याने आणि प्रसंगी प्रतिकूल परिस्थितीतही मनाचा आणि शरीराचा उत्साह टिकवून प्रवास करण्याचा संशोधक दृष्टीचा आदर्श मी भूगोल महर्षी डॉ.सी.डी. देशपांडे यांच्याकडून घेतला. अर्थात त्यासाठी घरातील अनुकूल परिस्थिती, वातावरण, तयारी, सोयी या साऱ्या होत्याच आणि आहेतही. माझ्या घरातल्या नसण्याने आणि प्रवासाला जाण्याने नेहमीच्या कौटुंबिक व्यवहारांवर, आल्यागेल्यांच्या स्वागतावर आणि अपेक्षित कामांवर प्रतिकूल परिणाम होऊ न देण्याची काळजी माझ्या घरातील सर्वचजण घेतात, म्हणूनच माझा प्रवास सुखकर होतो. जाताना काळजी नसते. प्रवासात घरची चिंता लागून राहात नाही; आणि आल्यावरही अडचणी उद्भवत नाहीत. 'घरचे राज्य' करसे सुरळीत आणि सुरक्षित असते. याचे श्रेय माझे वडिल – नाना, आई, पत्नी – सीमा, मुले – अभि, मुक्ता आणि अमृत या सगळ्यांनाच आहे. ही सर्व मंडळी 'घरचा किल्ला' सांभाळतात म्हणूनच मी बाहेर लढू शकतो; नवे नवे क्षेत्र – अनुभव पादाक्रांत करू शकतो. प्रसंगी घरातल्या मंडळींसह कुटुंबसहलीस जाण्यात अशा प्रवासाचा आनंद दुणावतो. मग त्या कुटुंबसहलीत नव्या माहितीची टिपणे घेण्यापासून फोटो काढण्यापर्यंत आणि परतल्यावर लेख लिहून घेण्यापर्यंत सर्वांची उत्स्फूर्त मदत असतेच.

माझ्या ऑफिसमधील – 'बालभारती' तील मित्रांनी आणि सहकाऱ्यांनी वेळोवेळी केलेली मदत फारच मोलाची आणि समयोचित ठरली आहे. यात सौ. सुचेता बापट, वि.शं. बनसोडे आणि सुधाकर इंगोले या सर्वांचा ऋणनिर्देश करणं माझं स्नेहकर्तव्य आहे.

अनेक ठिकाणी मी प्रवास केला तो कधी व्याख्यानाच्या वा भूगोलदिनाच्या निमित्ताने, कधी 'बालभारती'च्या कामासाठी शैक्षणिक – सामाजिक कार्यासाठी, तर कधी बदल म्हणून हौसेनं; पण या सर्वामागे प्रबळ आणि अनिवार – इच्छा होती, काहीतरी नवं पाहण्याची, समजून घेण्याची, अनुभवण्याची आणि त्यातून लाभणाऱ्या ज्ञानानंदाची!

हा ज्ञानानंद सचित्र रंगीत छायाचित्रांसह लेखांच्या स्वरूपात इच्छुक वाचकांप्रत पोचवण्यासाठी सकाळ, केसरी, प्रभात, तरुण भारत, महाराष्ट्र टाइम्स्, लोकसत्ता, सामना, लोकमत या दैनिकांनी आणि साप्ताहिक सकाळ, लोकप्रभा या नियतकालिकांनी चांगलेच सहकार्य दिले; त्यामुळे आणि वाचकांनी दिलेल्या प्रतिसादामुळे माझ्या लिखाणाचा उत्साहही वाढला.

या माझ्या ज्ञानयात्रेत माझ्याबरोबर सहयोग दिलेले ज्येष्ठ स्नेही श्री. संभाजीराव सावंत, श्री. म.श्री. दीक्षित, श्री. शंकरराव कांबळे यांचा आणि छायाचित्रकला मार्गदर्शक श्री. आर.के. शिंदे व शाळामित्र अरुण शिंदे या सर्वांचा उल्लेख या प्रसंगी सुस्थानी ठरेल. ज्येष्ठ स्नेही श्री. ना.या. जोशी यांचा संदर्भ – सहवास लेखक – मित्र रमेश

पेठे यांचे नेटके मुद्रणप्रत लेखन आणि औरंगाबादचे श्री. द.रा. मेढेकर यांचा पाठपुरावा नसता तर जिज्ञासू वाचकांनां या 'अपरिचित महाराष्ट्रा' चा पुस्तक रूपाने घडणारा परिचय एवढ्या लवकर घडला नसता.

नितीन प्रकाशनाचे श्री. व.ना. गोगटे यांनी मुद्रण – प्रकाशन प्रक्रिया करून नितांत सुंदर केलेल्या या परिचयाबद्दल मी त्यांचा सदैव ऋणी आहे. या पुस्तकाचे प्रकाशन करून त्यांनी एक पर्यटन व शिक्षणकार्यच केले आहे, असे म्हटल्यास ते वावगे ठरणार नाही.

या पुस्तकाची वाचनीयता, प्रवास उपयुक्तता आणि पर्यटन प्रेरकता, परिणामकारकता ठरवण्याचा, अजमावण्याचा आणि अनुभवण्याचा अधिकार मी सोडून सर्वांचा आहे, तो ते गाजवतीलच!

महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधून प्रकाशित होणाऱ्या या पुस्तकाला ज्येष्ठ व श्रेष्ठ साहित्यमहर्षि आणि 'तीर्थरूप महाराष्ट्र' आणि महाराष्ट्र संस्कृती कार्यकर्ते पंडित महादेवशास्त्री जोशी यांची प्रस्तावना लाभल्याने आम्ही खरोखरीच धन्य झालो....

'धन्य आनंद दिन पूर्ण मम कामना'...

डॉ. सुरेश गरसोळे

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| **१)** | **अपरिचित महाराष्ट्र** | ९ |
| **२)** | **महाराष्ट्राच्या दाहीदिशा पर्यटनाच्या** | १३ |
| **३)** | **अपरिचित पर्यटन स्थळे** | १७ |
| ३.१) | अमृतेश्वर | १७ |
| ३.२) | डेरवणची शिवसृष्टी | २० |
| ३.३) | बिनकुलपाचे गाव - शनि शिंगणापूर | २२ |
| ३.४) | भुलेश्वर, केडगाव, बेळापूर, सोनोसी | २४ |
| ३.५) | उज्ज्वल भवितव्याचा सिंधुदुर्ग किल्ला | २६ |
| ३.६) | अहमदनगर जिल्ह्याची झलक | २७ |
| ३.७) | दौलताबादचा किल्ला | २९ |
| ३.८) | रंधा धबधब्याचे शुभ्रदर्शन | ३१ |
| ३.९) | कुलदैवत - तुळजापूर व पर्यटनदैवत - नळदुर्ग | ३३ |
| ३.१०) | चिखलदरा - विदर्भाचे नंदनवन | ३५ |
| ३.११) | राष्ट्रीय उद्याने, अभयारण्ये, वनोद्याने (समग्रसूची) | ३९ |
| ३.१२) | संभाजी महाराज ते मस्तानी | ४१ |
| ३.१३) | धुळ्याची त्रिस्थळी | ४३ |
| ३.१४) | वरंधा घाटातील नेत्रानंद | ४५ |
| ३.१५) | शिखर शिंगणापूर, औंधची यमाई, चित्रसंग्रहालय | ४७ |
| | धुक्यात गवसलेले शिखर - शिंगणापूर | ५२ |
| ३.१६) | नागझिरा | ५३ |
| ३.१७) | ढाकणा कोळकाज | ५३ |
| ३.१८) | राधानगरी | ५४ |
| ३.१९) | सागरेश्वर | ५४ |
| ३.२०) | किनवट | ५५ |
| ३.२१) | कुंथलगिरी | ५५ |
| ३.२२) | भद्रावती | ५५ |

३.२३) मार्कंडा ५६
३.२४) रामटेक ५६
३.२५) येडशी ५६
३.२६) सहस्रकुंड ५६
३.२७) रेणापूर ५७
३.२८) वैरागड ५७
३.२९) खरोसा ५७
३.३०) कुकडी ५७
३.३१) कान्हूर ५७
३.३२) अल्लापल्ली ५८
**४) महाराष्ट्रातील थंड हवेची अपरिचित ठिकाणे** ६०
४.१) चिखलदरा ६०
४.२) म्हैसमाळ ६१
४.३) तोरणमाळ ६२
४.४) भंडारदरा ६२
४.५) आंबोली ६३
४.६) जव्हार ६३
४.७) पन्हाळा ६४
थंड हवेची परिचित ठिकाणे
४.८) महाबळेश्वर - पाचगणी ६५
४.९) माथेरान ६५
४.१०) लोणावळा - खंडाळा - कार्ले ६६

# १

# अपरिचित महाराष्ट्र

आपण ज्या महाराष्ट्रात राहतो, तो महाराष्ट्र तरी आपण कुठे पाहिलेला असतो ? आपल्या गावच्या, शहराच्या, कामाच्या ठिकाणापलीकडे जाणे आणि पाहणे फारसे कुणी केलेले नसते. फारतर सहलीच्या, यात्रेच्या आणि प्रवासाच्या निमित्ताने वाटेत लागणारी ठिकाणे किंवा निवडक प्रसिद्ध ठिकाणे पाहण्याचे पुण्य आपण पदरी बांधतो आणि महाराष्ट्र पाहिल्याचे खोटे समाधान मानतो. पण हे काही खरं नाही. संपूर्ण महाराष्ट्र बघायला, डोळी साठवायला आणि मनी नोंदवायला कित्येक वर्षे लागतील. सिंधुदुर्गचे आंबोली हे निसर्गरम्य ठिकाण, लातूरची खरोसा लेणी, बीडचा सौताड्याचा धबधबा, नगर जिल्ह्यातील कान्हूर पठारावरील चुनखडी सौंदर्य, रत्नागिरीची पन्हाळेकाजी लेणी, अमरावतीच्या मेळघाट व्याघ्र प्रकल्पातील ढाकणा - कोलकाज, २७ दरवाजे असलेला अकोल्याचा नरनाळा किल्ला, उस्मानाबादच्या कुंथलगिरीचे शिल्पसौंदर्य, यवतमाळ- नांदेडच्या सीमेवरील सहस्रकुंड धबधबा, ठाण्याजवळील सातिवलीजवळची गरम पाण्याची कुंडे, ठाणे जिल्ह्याचे महाबळेश्वर - जव्हार, उस्मानाबादचा नवदुर्ग किल्ला व येडशी - रामलिंगची वनश्री, भंडारदऱ्याचा रंधा धबधबा अशी कितीतरी अपरिचित ठिकाणे महाराष्ट्रात असूनही फारशी प्रसिद्ध आणि परिचित नाहीत. त्या त्या ठिकाणच्या पंचक्रोशीत आणि जिल्ह्यात ती परिचित आहेत; परंतु पर्यटन स्थळ, ऐतिहासिक ठिकाण, धार्मिक स्थान किंवा प्रसिद्ध थंड हवेचे निसर्गसौंदर्याचे ठिकाण यांच्या यादीत ही ठिकाणे सहजी सापडत नाहीत, मग नकाशातही मुद्दाम शोधावी लागतात.

महाराष्ट्रात पाच राष्ट्रीय उद्याने, बावीस अभयारण्ये शासनाने संरक्षिलेली आहेत, परंतु त्यापैकीही जळगावचे यावल, वर्ध्याचे बोर, यवतमाळचे किनवट व सांगलीचे सागरेश्वर फारसे परिचित नाही. काही वनोद्यानेही (सुमारे बत्तीस) विविध ठिकाणी वनविभागाने जोपासलेली आहेत. त्यापैकी अमरावतीतील चिखलदऱ्याचे, सांगलीचा दंडोबा डोंगर, परभणीची येलदरी, बुलढाण्याचे लोणार सरोवर, जळगावचे पाल, कोकणातील जलदुर्ग,

सिंधुदुर्गतील वेंगुर्ले, सावंतवाडीची जुनी चर्चेस, नगरच्या चांदबिबी महालाचे वास्तुशिल्प ही ठिकाणे पर्यटकांनीही उपेक्षिलेली आहेत. अशा नव्या ठिकाणांचा शोध सुट्टीत लागला तर निसर्गाचा बोध तर आपल्याला मिळेलच आणि त्यातून काहीतरी नवे वेगळे पाहिल्याचे आणि फारशा कुणी न पाहिलेली ठिकाणे अनुभवण्याचे समाधानही मिळेल. तेच ते ऐतिहासिक किल्ले, शहरीकरण झालेली प्रसिद्ध थंड हवेची ठिकाणे आता टाळायला हवीत.

कालिदासाचे स्मारक रामटेकवरून आपल्याला साहित्याची स्फूर्ती देईल, तर परतवाड्याजवळचे मुक्तागिरी - बावन्न जैन मंदिरांच्या प्रदक्षिणेनंतरही थकवा जाणवू देणार नाही. महाराष्ट्र गुजरातच्या सीमेवरील, धुळ्याजवळील प्रकाशे प्राचीन शिल्पसौंदर्याचे दर्शन घडवेल, तर सिंधुदुर्गमधील सैतवड्याचा धबधबा वेगळेच कोकणसौंदर्य दाखवेल. सोलापूरच्या दुष्काळी भागातील वेळापूरचे अर्धनारीनटेश्वरराचे मंदिर, गडचिरोलीचे कोरीव मार्कंडा मंदिर, प्राचीन सुबत्तेची साक्ष देईल. रेणापूरची झुलती दीपमाळ आणि यवतचे भुलेश्वर शिल्प ऐतिहासिक वास्तुकलेचे नमुने म्हणून निश्चितच आहेत. तसेच चंद्रपूर जिल्ह्यातील भद्रावतीची बौद्ध लेणी व जैन मंदिर पाहण्यासारखे आहे. त्याहीपेक्षा चंद्रपूरचे वरोड्याचे आनंदवन आणि गडचिरोलीची हेमलकसाची लोकबिरादरी, अमरावतीचे तपोवन ही आधुनिक तीर्थक्षेत्रेच आहेत. गडचिरोतील अल्लापल्लीची वनश्री पाहिल्यावर १०/२० इंच पाऊस पडणाऱ्या महाराष्ट्रात आपण राहतो हे खरे वाटत नाही. निसर्गाची इतकी विविधरूपे पाहण्यासाठी कोकणातल्या वेंगुर्ल्यापासून विदर्भातील गडचिरोलीच्या वैरागडापर्यंत आणि धुळ्याच्या उत्तरेकडील तोरणमाळपासून नांदेडमधील धर्माबादपर्यंत, ठाण्याच्या बोर्डीपासून भंडाऱ्याच्या इटियाडोहपर्यंत जमेल तेव्हा जमेल तसे भटकायला हवे. निदान महाराष्ट्र तरी उभा आडवा, किनाऱ्याने आणि डोंगराने, दगडाधोंड्यातून आणि रानावनातून दऱ्याडोंगरातून, काळ्या, तांबड्या मातीतून पांढऱ्या आणि तपकिरी मातीतून, वाळू आणि दगडातून, मुरमाड आणि रेताडातून, हिरव्यागार सागाच्या झाडातून फिरून आणि राहून पाहायला हवा तरच महाराष्ट्र हा सर्वार्थाने किती मोठा आहे याची संकल्पना स्पष्ट होईल.

महाराष्ट्र म्हणजे मोठे राष्ट्र, महंत राष्ट्र, महारथ ऊर्फ महारठ या लोकांचे राष्ट्र ते महाराष्ट्र. मराठी भाषिकांची भूमी म्हणजे महाराष्ट्र यासारखी कोणतीही महाराष्ट्र शब्दाची व्युत्पत्ती ग्राह्य धरता येईल. हा संशोधनाचा आणि तज्ज्ञांचा विषय असला तरी अपरिचित महाराष्ट्र पाहणे आणि जाणून घेणे मराठी माणसाला महाराष्ट्र - दिनाच्या निमित्ताने ठरवायला सुयोग्य वेळ आहे, असे निश्चित वाटते. या निमित्ताने ठिकठिकाणच्या अपरिचित, दुर्लक्षित ठिकाणांची, किल्ल्यांची, वास्तुंची माहिती जमवण्याचा छंद अनेकांना लागल्यास त्यातून समाजसेवा व समाजशिक्षणही घडेल.

# अपरिचित महाराष्ट्र : काही स्थाने व वैशिष्ट्ये

| | |
|---|---|
| १) सातिवली (ठाणे) - | वनश्री, गरम पाण्याची कुंडे व जलाशय |
| २) राधानगरी (कोल्हापूर) - | धरण, वनश्री, गवा अभयारण्य |
| ३) सागरेश्वर व दंडोबा डोंगर (सांगली) - | राखीव मृगया क्षेत्र, वनोद्यान |
| ४) कान्हूर पठार (नगर) - | वैशिष्ट्यपूर्ण चुनखडी भूरूपे, दर्यादेवी |
| ५) सौताडा (बीड) - | १०० मीटर उंच धबधबा, नैसर्गिक परिसर |
| ६) कुंथलगिरी (उस्मानाबाद) - | जैन तीर्थक्षेत्र व कोरीव काम, बालाघाट |
| ७) येडशी (उस्मानाबाद) - | थंड हवेचे ठिकाण व वनसौंदर्य, डोंगर परिसर, मंदिर |
| ८) खरोसा (लातूर) - | बौद्ध हिंदू लेणी - कोरीव काम प्रेक्षणीय |
| ९) रेणापुर (लातूर) - | रेणुका मंदिर व दीपमाळ (हालती), वास्तुवैशिष्ट्य |
| १०) सहस्रकुंड (यवतमाळ) - | पैनगंगा नदीवरील धबधबा, रम्य ठिकाण |
| ११) वैरागड (गडचिरोली) - | ऐतिहासिक किल्ला व प्राचीन मंदिरे |
| १२) मार्कंडा (गडचिरोली) - | कोरीवशिल्पकाम प्रेक्षणीय, पैनगंगेच्या काठावरील ठिकाण |
| १३) हेमलकसा (गडचिरोली) - | आदिवासी सेवा केंद्र व बाबा आमटे यांचा आश्रम, निसर्गरम्य परिसर |
| १४) अल्लापल्ली (गडचिरोली) - | वनश्री व वृक्षसौंदर्य, साग वाहतुकीसाठी हत्तींचा उपयोग |
| १५) किनवट (नांदेड व यवतमाळ) - | अभयारण्य व वनसंपत्ती - वन्य प्राणी व पक्षी यांचा आढळ |
| १६) प्रकाशे (धुळे) - | तापी नदीच्या काठावरील रम्य प्राचीन ठिकाण व शिल्प मंदिर |
| १७) रंधा (अहमदनगर) - | भंडारदरा धरणाजवळील रम्य धबधबा, प्रवरा नदीचा धावता प्रवाह |

१८) रामटेक (नागपूर) - कवी कालिदासांना मेघदूत काव्य लिखाणाची प्रेरणा देणारे स्थान, कालिदास स्मारक व प्राचीन मंदिर

१९) भद्रावती (चंद्रपूर) - जैन मंदिर परिसर व कोरीव लेणी - शिल्पसौंदर्य प्रेक्षणीय


२०) वेळापूर (सोलापूर) - अकलूजजवळचे प्राचीन अर्धनारीनटेश्वर मंदिर - अप्रतिम - कोरीव काम - शिवपार्वती नृत्यमूर्ती

२१) म्हैसमाळ (औरंगाबाद) - थंड हवेचे ठिकाण


२२) सैतवडा (सिंधुदुर्ग) - धबधबा व निसर्ग सौंदर्य



कालिदास स्मारक - रामटेक




◆ शिवसृष्टी-डेरवण.




◆ एकविरा देवी-धुळे.


◆ वरंधा घाट.









◆ जुने वैभव नव्या दिमाखात - अकलूजचा किल्ला.



◆ अहमदनगरचा चांदबिबीचा महाल अर्थात सलाबतखानाचा मकबरा.



◆ ज्ञानेश्वर मंदिरातील 'पैसा'चा खांब - नेवासे.



◆ वेळापूर - अर्धनारी नटेश्वर - शिवपार्वती दर्शन उमा महेश



# २

# महाराष्ट्राच्या दाही दिशा पर्यटनाच्या

महाराष्ट्राच्या दाही दिशा प्रवासासाठी आणि पर्यटनाच्या आनंदासाठी आपल्या सर्वांना खुल्या आहेत. या दाही दिशांमधील पारंपरिक तीर्थक्षेत्रे, थंड हवेची ठिकाणे, पर्यटन केंद्रे आणि आधुनिक तीर्थक्षेत्रे निवडण्यासाठी आपल्याला भरपूर वाव आहे, हे महाराष्ट्राच्या नकाशावर सहज डोळस दृष्टी टाकली असता लक्षात येईल. महाराष्ट्र राज्याचा पर्यटनाच्या दृष्टीने विचार करताना पूर्वेकडील अमरावती, नागपूर, गडचिरोली, चंद्रपूर हा वनसौंदर्याचा प्रदेश खूपसा न पाहिलेला आणि अप्रसिद्ध आहे. पश्चिमेकडील महाराष्ट्राचा किनारा अरबी समुद्राच्या संगतीने वेगळेच जलसौंदर्य निर्माण करतो. थेट ठाणे जिल्ह्यापासून ते सिंधुदुर्ग - सावंतवाडीपर्यंत गोव्याला जाऊन भिडणारी ही कोकणपट्टी, दक्षिण भागातील कोल्हापूर, सातारा, सांगली या भागातील पारंपरिक तीर्थक्षेत्रे आणि महाराष्ट्राच्या उत्तर भागातील नाशिक, धुळे, जळगाव परिसरातील प्राचीन तीर्थक्षेत्रे त्यांच्या स्थानमाहात्म्यापेक्षाही परिसरमाहात्म्य स्पष्ट करणारी आहेत. पूर्व, पश्चिम, दक्षिण, उत्तर या चार दिशांनंतर आग्नेयेकडील मराठवाड्यातील लातूर, उस्मानाबाद, नांदेड येथील पारंपरिक तीर्थक्षेत्रे, नैर्ऋत्य भागातील सह्याद्रीच्या कुशीतील गड, किल्ले आणि थंड हवेची ठिकाणे, नैर्ऋत्य व वायव्येकडील सह्याद्रीच्या पायथ्याशी असलेले जलाशय आणि ईशान्येकडील यवतमाळ, भंडारा, गडचिरोली भागातील वनसौंदर्य अशा या चार उपदिशांनाही असलेले सौंदर्य म्हणजे अष्टदिशांचे सौंदर्य महाराष्ट्राच्या पर्यटनक्षेत्राला लाभले आहे. यातच आणखी दोन दिशांची भर म्हणजे वरची दिशा (ऊर्ध्व) व खालची दिशा (अधो) दिशा. सह्याद्रीची उंच शिखरे, त्यातील सर्वोच्च असलेले कळसूबाईचे शिखर, आकाशाचा वेध घेणारी ही गिरिशिखरे आणि किल्ले, खोलगट भागात दऱ्याखोऱ्यात पाताळाशी स्पर्धा करणारी - खोलगट भागात असलेली महादेव - मंदिरे, वैशिष्ट्यपूर्ण लोणार सरोवर, जमिनीखालची खनिजसंपत्ती प्रकाशात आणणाऱ्या कोळसा, मँगेनीज, चुनखडीच्या खाणी ही सुद्धा पर्यटनस्थळेच! अशा या दाही दिशांतील सौंदर्य, महाराष्ट्राच्या बाबतीत तरी शोधण्या - पाहण्यासाठी

आपणच कमी पडू. यासाठी कमी वेळात, योजकतेने, पूर्वाभ्यासाने, संदर्भ पाहून, नकाशे वाचून, माहिती मिळवून हिंडा - फिरायला, प्रवास - पर्यटनाला जायला हवे; म्हणजे सहकुटुंब पर्यटनाचा आनंद घेता येईल. व्यक्तिमत्त्व विकासातील शिबिरामधून जे सहजी साधणार नाही; ते संस्कार व व्यक्तिमत्त्व विकास - मुलांचा आणि मोठ्यांचाही - अशा पर्यटनातूनच साधेल हे निश्चित!

**तुळजापूर, नळदुर्ग, अक्कलकोट आणि सोलापूर** - कुलस्वामिनी तुळजाभवानीच्या तुळजापूरच्या बालाघाट डोंगरातील परिसर नव्याने विकास पावतो आहे. या पारंपरिक तीर्थस्थानाजवळच असलेला नळदुर्गचा किल्ला प्राचीन आणि विस्तीर्ण असून तेथील पाणी - महाल स्थापत्यशास्त्र जलनियोजन वैशिष्ट्यपूर्ण आहे. बोरी नदीमुळे किल्ल्याचे सौंदर्य अधिकच खुलते. येथून उमरगामार्गे कर्नाटकातील दत्तस्थान गाणगापूरचे दर्शन घेता येते. तेथील अमरजा संगमावरील स्नानाचा आनंद भाविकांना आणि पर्यटकांना सारखाच मिळतो. तेथून परतून अक्कलकोट येथील समाधी - मंदिर परिसर आणि संग्रहालय पाहण्यासाठी येता येते. समाधी - मंदिर परिसर स्वच्छ आणि शांत आहे. तेथून सोलापूर येथे येऊन सिद्धेश्वर मंदिर आणि सिद्धनाथ स्वामींची नूतनीकरण केलेली समाधी पाहता येते आणि सोलापुरी चादर अंगावर घेऊन प्रवासाचा शीण घालवता येतो.

(अंतरे :- सोलापूरपासून - तुळजापूर ४० कि.मी; नळदुर्ग - ४५ कि.मी; अक्कलकोट - ४० कि.मी; गाणगापूर - १८० कि.मी.)

**पंढरपूर, वेळापूर, अकलूज, उजनी जलाशय - शिखर शिंगणापूर** - सोलापूर जिल्ह्यातील ही स्थाने एका खेपेत पाहण्यासारखी आहेत. (पंढरपूरपासून अंतर - वेळापूर ५१ कि.मी; अकलूज ६० कि.मी; शिखर शिंगणापूर ११० कि.मी. शिखर शिंगणापूर सातारा जिल्ह्यात आहे.)

**सांगली** जिल्ह्यातील मिरज, नरसोबाची वाडी, सागरेश्वर, औदुंबर आणि कोल्हापूर परिसरातील पन्हाळा, राधानगरी अभयारण्ये तसेच बत्तीसशिराळे, बाहुबली पाहता येतील. (सांगली - कोल्हापूर ६० कि.मी. सांगलीपासून ही ठिकाणे ५०/६०' कि.मी. अंतरात आहेत. कोल्हापूरपासून राधानगरी मात्र ८० कि.मी आहे.)

**रत्नागिरी** परिसरातील गणपतीपुळे.मालगुंडचे केशवसुत जन्मस्थान आणि राजापूर ५० कि.मी. वर असून विजयदुर्ग हा सागरी किल्ला, दक्षिणेकडील सिंधुदुर्ग किल्ल्याप्रमाणेच पाहण्यासारखा आहे. सावंतवाडीजवळील आंबोली हे दक्षिण टोकावरील सह्याद्रीच्या घाटमाथ्यावरील ठिकाण आपले नैसर्गिक सौंदर्य अबाधित राखून आहे.

**पुणे परिसरातील** अष्टविनायक, महाबळेश्वर, प्रतापगड, आळंदी - देहू, सिंहगड - जेजुरी, खडकवासला, खंडाळा, लोणावळे, कार्ले ही ठिकाणे १०० कि.मी. च्या आत

असूनही ग्रामीण सौंदर्यदर्शन घडवणारी आहेत.

**मुंबई** परिसरातील घारापुरीची लेणी, पनवेलजवळचे कर्नाळा अभयारण्य, माथेरान, वज्रेश्वरी, बोरिवलीचे संजय गांधी राष्ट्रीय उद्यान ही पर्यटनस्थळे १०० कि.मी. च्या आत आहेत.

**नाशिक** जिल्ह्यातील क्षेत्र त्रिंबकेश्वर, गंगापूरचे धरण, नाशिकची प्राचीन मंदिरे आणि ओझरचा विमान कारखाना पाहायलाच हवा. नाशिकपासून ही ठिकाणे ५० कि.मी. अंतरात आहेत.

**जव्हार** हे ठाणे जिल्ह्याचे 'महाबळेश्वर' आणि तानसा तलाव ठाणे आणि नाशिकपासून १०० कि.मी. पेक्षा जास्त अंतरावर आहेत.

**अहमदनगर** जिल्ह्यातील पारंपरिक तीर्थक्षेत्रातील शिर्डी, शनी - शिंगणापूर, मढी पैठण ही प्रमुख तीर्थक्षेत्रे आहेत; तर रेहेकुरीचे काळवीट अभयारण्य, सीमेवरील जायकवाडी धरण ही नवी आकर्षण केंद्रे आहेत. ही सर्व ठिकाणे नगरपासून ५०/१०० कि.मी. अंतरावर आहेत.

**धुळे** जिल्ह्यातील प्रकाशे हे पारंपरिक तीर्थक्षेत्र दक्षिणकाशी या नावाने ओळखले जाते. ते धुळ्यापासून सुमारे १०० कि.मी. वर आहे. उत्तरसीमेवरील तोरणमाळ हे सातपुड्याच्या रांगेतील थंड हवेचे ठिकाण तापी आणि नर्मदेच्या परिसरात आहे. **जळगावच्या** उत्तरेकडील पाल आणि यावल ही अभयारण्ये मध्यप्रदेशाच्या सीमेला लागूनच आहेत. अजिंठ्याची लेणी जळगावहून ५५ कि.मी. वर तर औरंगाबादपासून १०० कि.मी. आहेत. औरंगाबादजवळचे वेरुळ, घृष्णेश्वर परिचित असले तरी म्हैसमाळ हे ५० कि.मी. वरचे थंड हवेचे ठिकाण फारसे परिचित नाही.

**बुलढाण्यातील** गजानन महाराजांच्या शेगाव येथील समाधी - दर्शनानंतर लोणार सरोवर वैशिष्ट्यपूर्ण स्थान म्हणून पाहायला हवे. (बुलढाण्यापासून अंतर १०० कि.मी.)

**अकोला** जिल्ह्यातील पारस हे वीजकेंद्र आधुनिक तीर्थक्षेत्र म्हणायला लागेल. (१० कि.मी.) **अमरावतीचे** चिखलदरा आणि मेळघाट व्याघ्रप्रकल्प हे महाराष्ट्राचे वैशिष्ट्य आहे. (१५० कि.मी.) **यवतमाळजवळची** माहूरची देवी (७० कि.मी.) परिचित आहे. पण आंध्रच्या सीमेजवळचे टिपेश्वरचे अभयारण्य (१५० कि.मी.) हे ब्रिटिश काळापासून प्रसिद्ध असलेले शिकाऱ्यांचे नंदनवन होते हे फारच थोड्यांनाच माहीत असणार.

**वर्धा** जिल्ह्यातील महात्मा गांधींच्या कर्मभूमीमुळे आणि पवनारच्या विनोबांच्या आश्रमामुळे ही केंद्रे राष्ट्रीय स्फूर्तिकेंद्रे बनली आहेत. बोर अभयारण्यही वर्ध्यापासून ५०/६० कि.मी. वर आहे. **नागपूरजवळचे** खापरखेडा व कोराडी ही औष्णिक वीजकेंद्रे, रामटेक हे पारंपरिक तीर्थक्षेत्र व पेंच हे अभयारण्य ही विदर्भाची पर्यटन - क्षेत्रे आहेत. (नागपूरपासून

५० कि.मी. च्या आत आहेत.)

**भंडारा** जिल्ह्यातील नवेगाव बांध, राष्ट्रीय पक्षी उद्यान व नागझिरा अभयारण्य ही फारशा पर्यटकांनी न पाहिलेली अशी ठिकाणे आहेत. तेथील वन आणि प्राणिसौंदर्य अनुभवायलाच हवे. (भंडाऱ्यापासून १०० कि.मी.)

**चंद्रपूरचे** ताडोबा हे राष्ट्रीय उद्यान आणि वरोड्याचे आनंदवन ही दोन्ही आधुनिक तीर्थक्षेत्रे आहेत. कुष्ठरोग्यांसाठी समाजसेवेच्या आणि सामाजिक कृतज्ञतेच्या भावनेतून बाबा आमटे कुटुंबियांनी चालवलेले हे प्रेरणा - केंद्र आहे.

**गडचिरोली** हा जिल्हा अगदी पूर्व टोकावरील विपुल आणि समृद्ध वनसंपत्तीचा जिल्हा असल्याने नैसर्गिक वन व आदिवासी जीवन अभ्यासण्यासारखे आहे. हेमलकसाचे लोक - बिरादरी केंद्र, मार्कंडा येथील प्राचीन शिल्प आणि अल्लापल्ली येथील वनश्री व सागाचे ओंडके वाहून नेणारे हत्ती हे प्रत्यक्ष पाहण्यासारखे आहे. सुमारे ६०/७० टक्के वनश्री असलेला हा एकमेव जिल्हा महाराष्ट्राचे वनवैभवचिन्ह आहे. (गडचिरोलीपासून अल्लापल्ली १०० कि.मी; मार्कंडा ५० कि.मी. आणि हेमलकसा १५० कि.मी.)

माझ्या मते महाराष्ट्रातील प्रवासासाठी स्वतंत्र व स्वायत्त वाहन सोयीचे व वेळ वाचवणारे असते, तसे फारसे खर्चिकही नसते. नव्या पर्यटन धोरणानुसार शासकीय विश्रामगृहे, डाकबंगले सामान्य पर्यटकांना उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. धरणांच्या, जलाशयांच्या काठीही नवी पर्यटन - केंद्रे विकसित होत आहेत.

असा हा दाही दिशांनी विस्तारलेला वैचित्र्य आणि वैविध्याने नटलेला महाराष्ट्र! 'याचि देही याचि डोळा' पाहण्याचे व अनुभवण्याचे सद्भाग्य अनेकांना लाभावे. यातून स्वार्थ आणि परमार्थ, पुण्य आणि शांती, बदल आणि स्वास्थ्य, विरंगुळा आणि आगळा आनंद एकाच वेळी लाभतो. मात्र यासाठी इच्छा आणि आवड हवी. डोळसदृष्टी, चौकस वाणी आणि जागरूक कान हवेत. शरीराची ताकद आणि मनाची उमेद असली म्हणजे आर्थिक अडचणींवर मात करून निसर्गाची साथ घेता येते; आणि पर्यटनाचा परमानंद लाभतो हेच खरे!

# ३

# अपरिचित पर्यटन स्थळे

## ३.१ अमृतेश्वर

सहल, प्रवास, पर्यटन, यात्रा, जत्रा, अभ्यास - भेट, भटकंती, भ्रमंती, पाहणी, ट्रिप, पिकनिक, टूर असे अनेक शब्द आपल्या कानी येत असतात, आपणही वापरत असतो. वेगवेगळ्या कारणासाठी, वेगवेगळ्या संदर्भात व्यक्तिपरत्वे या शब्दांच्या अर्थ - छटा बदलतात. मात्र मूळ क्रिया प्रवासाचीच असते. निमित्त, कारण, हेतू, उद्देश भिन्न - भिन्न असला तरी तो प्रवासच असतो.

पुण्याजवळची भोर - भाटघर - बनेश्वर ही ठिकाणे गेली पन्नास वर्षे तरी शाळा - कॉलेजांच्या सहलीसाठी निवडली जात आहेत. त्यातला तोचतोपणा, शहरी आणि व्यापारी सावट, हरवत चाललेला निसर्ग, व्यापारी वृत्ती आणि शांततेची हकालपट्टी, यामुळे बनेश्वरचे बाजारी स्वरूप आता आपल्याला मोहवत नाही. मुद्दाम रांगेत लावलेली झाडे, शहरी कृत्रिम बाग - बगीचा, मुलांची खेळण्याची लोखंडी साधने, बागेतले सरकारी क्रॉंक्रीटचे बंगले, हॉटेले आणि विक्रेते यामुळे मंदिर झाकाळून गेले आहे. लोखंडी कठड्यात पाण्याची कुंडेही बंदिस्त झालेली आहेत. सारे परिसर - दृष्यच कृत्रिम दिसते आहे. मुळातला निसर्गच हरवल्यासारखा झाला आहे.

मंदिराच्या आवारात प्रवेश करतानाच डाव्या बाजूला हातपाय धुण्याच्या कुंडात वनविभागाचे व अन्य सरकारी नोकर भरपूर साबण फेसाळून कपडे धुण्याचा कार्यक्रम करत होते; त्यामुळे फेसाने भरलेले कुंडच प्रवाशांना पाहावे लागत होते; आणि या सरकारी सेवकांना काही सुचवणार किंवा बोलणार कोण ? त्यांची धुण्यापाण्याची सोय मंदिराबाहेर आडबाजूला करणे शक्य नाही का? तसेच प्रवाशांमुळे होणारा कचरा मंदिराशेजारीच उतारावर उघडा टाकून देण्यापेक्षा व तो वाऱ्याने सर्वत्र पसरू देण्यापेक्षा कचऱ्यासाठी जागोजागी खड्डे करण्याची योजकता का नसावी ? अशा सर्व कारणांमुळे प्रचलित, परिचित आणि पर्यटक - प्रिय प्रसिद्ध सहलीची ठिकाणे मला आकर्षित करू शकत नाहीत. निसर्गाच्या

ओढीने तिथे जायचे आणि ओढगस्तीने परत यायचे यात ना समाधान ना आनंद!....

...म्हणूनच हरवलेला निसर्ग शोधण्यासाठी व प्रवासाचे पुण्य पदरी बांधण्यासाठी बनेश्वरच्या पलीकडे बारा किलोमीटरवर – 'अमृतेश्वर मोहरी' हे ठिकाण आपल्याला निवडता येईल. पुण्याहून निघाल्यावर महानगरपालिकेचे कात्रजचे सर्प – उद्यान व कात्रजचा तलाव मागे टाकून थेट कात्रज घाटाचा रस्ता धरावा. बोगद्यात शिरण्यापूर्वी मागे वळून पुणे शहराचे दूरदर्शन घ्यावे आणि घाट उतरावा. रस्त्यातच खेड – शिवापूर आपले अंजीरांनी स्वागत करते. पुढे चेलाडी गावाजवळ नसरापूर फाटा लागतो. तोच रस्ता बनेश्वरला जातो. पुण्यापासून आपण सुमारे ३० किलोमीटरवर आलेलो असतो; तेथून बनेश्वरला पोचण्यासाठी मुख्य रस्त्यापासून तीन किलोमीटर पश्चिमेला जावे, आणि शिवगंगेच्या काठी असलेल्या बनेश्वरचे पारंपरिक दर्शन घ्यावे.

त्यानंतर मात्र सरळ अमृतेश्वराचा रस्ता धरावा. बनेश्वरपासून परत पुणे – सातारा मुख्य रस्त्यावर येऊन कामथडी गाव ओलांडावे आणि कापूरव्हळ गावाजवळचा पुरंदर किल्ल्याकडे जाणारा रस्ता ओलांडून पुढे जावे, अन् भोर फाट्याला वळावे नैर्ऋत्येकडे. वाटेत गुंजवणी नदीवरील कासुर्डी गावाजवळचा पूल पार करावा आणि पुढे भोरच्या रस्त्याने न जाता उजवीकडे हातवे तांभाड रस्त्याने थेट मोहरी गावातील अमृतेश्वर मंदिर परिसरात पोचावे. थेटपर्यंत बऱ्यापैकी रस्ता असल्याने स्वतंत्र वाहनाने पुण्याहून सुमारे ४५ किलोमीटरचे हे अंतर सुमारे दीड तासात तोडता येते. तसेच दुपारी ११॥ च्या सुमारास पुण्याहून तांभाडला जाणारी एस.टी. पकडून तासाभराने परतीच्या प्रवासासाठी २॥ वाजता परतणारी एस.टी. गाठता येते.

अमृतेश्वर शिवमंदिर गुंजण मावळातील ऐतिहासिक मंदिर – स्थान असून आज मात्र ते दुर्लक्षित आहे. मंदिरात दगडी बांधणीचे वाघ, सिंह, हत्ती, गाय, बैल या प्राण्यांची शिल्पचित्रे आणि कमळशिल्पेही आहेत. त्यातील दक्षिणेकडे 'गंडभेरूड' शिल्प म्हणजे दोन चोची व एक पोट असलेला गरुडासारखा पक्षी आणि पोटामध्ये दोन्ही बाजूस वाघ असे वेगळेच शिल्प आहे. ही जुनी दगडी शिल्प – मंदिरे रंगवण्याची अनिष्ट प्रथा बंद व्हायला हवी. नवे, भडक आणि-चकाकणारे रंग दिल्याने सौंदर्यवृद्धी होण्याऐवजी हानीच होते. जुन्या वस्तूंचा वा शिल्पांचा जीर्णोद्धार करताना आवश्यक ती डागडुजी व देखभाल ओळखताही येऊ नये इतपत, ती हुबेहूब जुन्यासारखीच पण नव्याने केलेली असावी.

अमृतेश्वराच्या गाभाऱ्यातील शिवलिंग व मागील कोनाड्यातील मूर्ती कोरीव आहेत. सभामंडप नव्याने बांधलेला आहे; मात्र आजूबाजूचा मंदिर परिसर सुधारावयास हवा. दारातील उंच दगडी दीपमाळ त्रिपुरी पौर्णिमेच्या उत्सवाच्या वेळी अनेक ज्योतींनी प्रकाशमान होते, आणि गुंजणमावळच्या चौऱ्यांऐंशी गावांचे शिळीमकर देशमुख रात्री बारा वाजता

देवाची पालखी उचलण्याचा मान अजूनही सांभाळतात. चैत्री पाडव्याला या मंदिरातील मानाची कावड मंदिराकाठच्या ओढ्यातील पाण्याने भरून शिखर- शिंगणापूरला नेली जाते.

या रम्य अमृतेश्वराच्या कळसाखाली मात्र आता पिंपळाची झाडे वाढू लागलेली आहेत. त्याकडे वेळीच लक्ष देऊन दक्षता घेणे जरूरीचे आहे.

महाशिवरात्रीला तीन दिवस भजन- कीर्तनाने उत्सव साजरा करण्यासाठी पुण्यातूनही काही निवडक मंडळी जातात; आणि भजन- कीर्तनाच्या आनंदाने आसमंत फुलवून टाकतात. गुंजवणी नदी आणि शिवगंगा नदी यांच्या पाणथळ आसमंतातील हा परिसर थंडाव्याने प्रसन्नता निर्माण करतो. मंदिराच्या जवळून वाहणारा ओढा आणि त्याकाठी असलेली दगडी तळी किंवा कुंडे दुष्काळातही आटत नाहीत. थंड आणि स्वच्छ पाण्याने ती सदैव भरलेली असतात.

सह्याद्रीच्या रांगेच्या पार्श्वभूमीवरील हे अमृतेश्वर मोहरी मंदिर एक चांगले सहलीचे निसर्गस्थान असून पर्यटनस्थळ म्हणून विकसित करता येईल. महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाने असे ऐतिहासिक प्राचीन मंदिर- परिसर सुधारल्यास पर्यटनातून शिक्षण, शिक्षणातून प्रशिक्षण, प्रशिक्षणातून लोकशिक्षण आणि लोकशिक्षणातून समाजकारण आणि समाजरंजनही घडेल; मात्र हा परिसर - विकास स्थानिक निसर्गदृश्य व परिसरदृश्य कोणत्याही प्रकारे न विचलित करता- न बिघडवता करणे विशेष जबाबदारीचे आणि कौशल्याचे आहे.

महाशिवरात्रीचे पुण्य केवळ अमृतेश्वराच्या दर्शनाने गाठी बांधण्यापेक्षा या परिसर विकासाची खूणगाठ बांधली तर अधिक श्रेयस्कर! यासाठी ग्रामस्थ, पर्यटनप्रेमी, खाजगी आणि सरकारी मंडळी सहभागी होऊ शकतील.

शिवछत्रपतींनी याच परिसरातील राजगड किल्ल्यावर २४ वर्षे राजधानी शर्थीने जपली. तोरणा आणि पुरंदरही याच परिसरात. मराठ्यांच्या इतिहासाला मावळचा भूगोल अनुकूल ठरला. त्यातून राजकारण घडले- निसर्गाच्या मदतीने, मनाच्या उमेदीने आणि शर्थीच्या शौर्याने! याबद्दलची कृतज्ञता व्यक्त करण्याची सुसंधी आपल्याला लाभते अशा स्थानांच्या भेटीगाठीतून!

अमृतेश्वराबद्दल काही महत्त्वपूर्ण आणि वैशिष्ट्यपूर्ण उल्लेख केल्याशिवाय त्याच्या परिचयाची सांगता होणार नाही.

**मोहरीचे ‘दिव्य’ -**

शिवकालात आपापसातील वादविवाद, तंटेबखेडे मिटवण्यासाठी व निर्णयासाठी अमृतेश्वर मोहरी मंदिरात न्यायनिवाडा होत असे. एकमत किंवा उभयपक्षी समझोता न

झाल्यास 'दिव्य' करण्याची प्रथा होती. तापलेला लोखंडी गोळा हातात धरून निर्दोषीपणा सिद्ध करावा लागे. अशी 'दिव्ये' इथे झाल्याचे ऐतिहासिक कागदपत्रात उल्लेख आहेत.

**गुंजन - मावळचे कुलदैवत -**

शिवकालीन अमृतेश्वर मंदिराची व्यवस्था पाहण्यासाठी पुरोहित, इनामदार आणि राजगुरवांची नियुक्ती केलेली होती. त्यांचे सालीना वर्षासन स्वातंत्र्य मिळेपर्यंत रु. ४०/- होते. गुंजन - मावळातील ८४ गावांचे देशमुख - शिळीमकर यांचे कुलदैवत 'अमृतेश्वर'! राजगडावर शिळीमकर घराण्यातील पुरुषाने शौर्य गाजवले होते, त्यांचे वंशज सेवा करतात. महादेव कोळी मंडळी, व गोपाळ महादेव, बबन हरिभाऊ राजगुरू, वसंत नारायण आणि कृष्णाजी गंगाधर पुरोहित हे ग्रामस्थ - वंशजही परंपरागत देवाची सेवा करतात.

**स्वयंभू शिवलिंग नदीत सापडले -**

मधे शाळुंका नसलेले शिवलिंग हे या मंदिराचे वैशिष्ट्य. मंदिराच्या निर्मितीच्या अनेक दंतकथा प्रचलित आहेत. त्यापैकी एक म्हणजे मोहरी बुद्रुक गावाजवळील गुंजवणी नदीच्या पात्रात एका गुराख्याला दोन गायी दुधाचा पान्हा सोडत असल्याचा दृष्टान्त झाल्यावर शोध घेता तेथे दोन शिवलिंगे आढळली; त्यापैकी एक न घडवलेले - स्वयंभू लिंग अमृतेश्वर मंदिरात आहे. ते आणण्यासाठी बारा बैल लावूनही लिंग हलेना. दूध देणाऱ्या त्या गायींचे खोंड दृष्टांताप्रमाणे लावल्यावर शिवलिंग जागचे हलले व त्याची ओढ्याकाठी स्थापना झाली.

## ३.२ डेरवणची 'शिवसृष्टी'

कोकणच्या लाल मातीत आणि फेसाळ समुद्रात शंखशिंपल्यात आणि ताडामाडात, भातखाचरात आणि आंब्यांच्या कलमात, कोकमात आणि काजुंगरात नाना प्रकारची वैशिष्ट्ये वास्तव्य करून आहेत. असेच अगदी वास्तवाच्या जवळ जाणारे वैशिष्ट्य डेरवणला आहे. चिपळूणजवळच्या सावर्डे गावाजवळ एक फाटा जातो डेरवणच्या शिवसृष्टीला!

मुंबई - गोवा राष्ट्रीय महामार्गावर चिपळूणपासून दक्षिणेला सुमारे २५ किलोमीटरवर व रत्नागिरीपासून उत्तरेला ८० किलोमीटरवर रत्नागिरी जिल्ह्यातील डेरवण हे ठिकाण श्रद्धा - सहलीचे केंद्रच आहे. सावर्डे फाट्यापासून आत सुमारे १० कि.मी. अंतर वळणावळणांच्या रस्त्याने गेल्यावर रस्त्यालगतच किल्ल्याची तटबंदी दिसते; आणि तटबंदीच्या कडेने रस्ता तुम्हाला किल्ल्याच्या प्रवेशद्वारापाशी नेऊन पोहोचवतो. किल्ल्याच्या भिंतीलगत मराठे सरदार, शिपाई, शिलेदार, घोडेस्वार रुबाबात उभे असल्याचे भासते, तर प्रवेशद्वारी दोन हत्ती गजांतलक्ष्मी स्वरूपात झुलत असतात. त्यावर माहुत आहेत. त्या सर्व रचनेतून सत्याचा भास निर्माण होतो व जणू काही आपण प्रत्यक्ष 'शिवसृष्टी'

अनुभवतो आहोत असे वाटते; यातच त्या सर्व कलाकृतींचे व बोलक्या मूर्तींचे खरेपण आहे. कारण उभे राहण्याची पद्धत, पोशाख, भाव, आविर्भाव, शस्त्रास्त्रे यात अतिशय रेखीवपणा, प्रमाणबद्धता, सुयोग्य रंगसंगती यांच्यामुळेच सतत खरेपणाचा भास होतो. आता शिवरायांचा मावळा आपल्याशी बोलणार, सरदार मोहिमेवर निघणार, घोड्याला टाच मारून आणि तलवार उंचावून शूर शिपाई शत्रूवर तुटून पडणार, असे वाटते. पवित्र मनाने, आदराने, अभिमानाने आत प्रवेश करावा. भारतीय पोशाखाची परंपरा स्त्रियांनी राखावी, असे सुचवून शिवसृष्टीतील नियमांची तामिली केली जाते आणि मगच प्रवेश मिळतो. घोड्यावर स्वार झालेले छत्रपती आणि महाराष्ट्राचे राजवैभव पाहताना प्रत्येक मराठी माणूस हरखून जातो; अन् ते तेज, ते शौर्य, ते धैर्य तो डोळ्यांत साठवतो. शेजारीच गोमातेचे दर्शन घडते. 'गोब्राह्मण प्रतिपालक क्षत्रिय कुलावतंस' श्रीमंत छत्रपती शिवाजी महाराजांपुढे आपण नतमस्तक होतो. शेजारील भव्य दालनात महाराजांच्या जीवनातील सर्व निवडक प्रसंग त्रिमिती दृश्यांच्या साहाय्याने व रंगीत चित्रकृती आणि मूर्तीरचना करून सजीव केले आहेत. त्या सर्वांच्या तपशीलं - वर्णनापेक्षा ते प्रत्यक्ष पाहायलाच हवेत. सूर्योदय ते सूर्यास्त ही या शिवसृष्टीदर्शनाची वेळ असते.

शिवसृष्टीच्या आतील भागात खास परवानगी घेऊन संत शिवरामबुवा वालावलकर यांच्या समाधी - मंदिराचे दर्शन घेता येते. तेथील सर्वच वातावरण व परिसर आग्रहपूर्वक व विशेष प्रयत्नाने प्रसन्न, शांत, पवित्र व प्रेरक ठेवला आहे. या 'शिवसमर्थगड' परिसराचा विकास करण्याचे ध्येय व ध्यास संत विठ्ठलराव गणेश जोशी महाराज यांनी घेतला होता. सन १९७९ नंतर सुमारे ८/१० वर्षांत हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प वालावलकर ट्रस्टने पूर्ण केला. आतील भागातील मारुतीमंदिर व औदुंबराच्या झाडाखालील श्री दत्तात्रय मंदिर मनाला प्रसन्नता देते. शेती, बागायती, बांधकामे अशी लोकोपयोगी कार्ये आणि राष्ट्रीय व धार्मिक उत्सव - परंपरा तेथे चालू आहे. रंगीत माहिती - पुस्तिका फक्त जिज्ञासू आणि अभ्यासूंनाच भेट मिळते. त्यात उल्लेखल्याप्रमाणे विवेकी, निःस्वार्थी - समाजसेवा, तसेच प्रचंड उद्योगचातुर्य, सन्मार्ग आणि ब्राह्मण्य म्हणजे 'उत्तम जीवनपद्धती' हे विचार वाचायला मिळाले. गोमाता म्हणजे पृथ्वी ही भावना त्यात व्यक्त केली आहे.

प्रत्येक मराठी माणसानेच नव्हे, तर महाराष्ट्रातील सर्व जाती, धर्म, वंशाच्या स्त्रीपुरुषांनी, मुलांनी आणि मोठ्यांनीही ही शिवसृष्टी पाहावी. हे आधुनिक तीर्थक्षेत्रच आहे. हे पाहायला जाताना महाडचे स्वामी अक्कलकोट यांचे श्रद्धास्थान, चिपळूणजवळचे क्षेत्र परशुराम किंवा रत्नागिरीजवळचे स्वामी स्वरूपानंदांचे पावस, निसर्गरम्य गणपतीपुळे हेही बघता येईल. येताना कुंभार्ली घाटातून आल्यास सातारामार्गे कोयनाधरणाचेही दर्शन घडते. महाबळेश्वर मार्गे आल्यास खंबाटकी घाटातून येता येते. महाडमार्गे वरंधाघाटाचे सौंदर्य टिपता येते आणि समर्थांची शिवथर घळ अनुभवता येते, किंवा थेट दक्षिणेकडून अंबाघाटातून

कोल्हापूरमार्गे अंबाबाईचे दर्शन घेऊनही पुण्य पदरी बांधता येते. देशावरून सह्याद्री पर्वत ओलांडून कोकणात उतरण्यासाठी अनेक वाटा व घाट आहेत. प्रत्येक घाटात काहीतरी दर्शनीय आहेच. किती पहावे आणि किती नको असे होते. वेळेचे, काळाचे व पैशाचे बंधन सांभाळून स्वतंत्र वाहनाने प्रवास केल्यास कमी वेळात जास्त ठिकाणे पाहता येतात. महाराष्ट्राच्या महत्त्वपूर्ण पर्यटन केंद्रात पर्यटन विकास महामंडळाने या डेरवणाच्या शिवसृष्टीचा अधिकृत समावेश करायला हवा.

## ३.३ बिनकुलपाचे गाव - शनिशिंगणापूर!

बँकेची तिजोरी फोडली, घराचे कुलूप फोडून दागिने पळवले; डुप्लिकेट चावीने दरवाजा उघडून चोरी, लॉकरमधून रक्कम गायब, बंद घरातून मौल्यवान वस्तू चोरीस गेल्या, खिडकीतून शिरकाव करून रकमेची चोरी, घराच्या मागील दारातून प्रवेश करून घर लुटले, पोलिस तपास चालू- दरोडेखोर पळाले! सराईत चोरांनी कोठडीतून पोबारा केला, या बातम्या किंवा असे वारंवार छापून येणारे वृत्त वाचण्याची आपल्या डोळ्यांना व मनालाच सवयच होते. त्यात वेगळेपणा जाणवत नाही. तो एक नेहमीच्या व्यवहाराचा भाग होतो. चोऱ्या, दोन गटातील मारामाऱ्या, फसवाफसवी, गुंडगिरीचे प्रकार, अविश्वास आणि पर्यायाने पोलिस कारवाया, कोर्ट - कचेऱ्या, तुरुंगवासाच्या वारंवार होणाऱ्या शिक्षा व वारंवार चालू राहणारे त्यांचे तसेच धंदे!

अशा या पार्श्वभूमीवर असे कोणी सांगितले की, घरांना दारे नाहीत, खिडक्यांना कवाडे नाही, घरांना व घरात कुठेच कुलपे नाहीत, कडी नाही, कोयंडे नाहीत, बॅगा नाहीत, लॉकरही नाहीत, कुठे मुळी अडसरच नाही! 'आवो - जावो घर तुम्हारा' येणाऱ्यांवर आमचा पूर्ण विश्वास आहे- घर तुमचेच आहे- असे ध्वनित करणारी घरे एका गावात आहेत, असे नुसते सांगून आणि ऐकून कोण विश्वास ठेवणार?

-- आणि खरोखरच हे गाव पाहण्याचा योग आला तर--! नक्कीच श्रद्धायुक्त अभिमान वाटेल आणि आपण आपोआपच हे आश्चर्य घडवून आणणाऱ्या या गावातील दैवतापुढे नतमस्तक होऊ. काळ्याशार शिळेपुढे एकविसाव्या शतकात प्रामाणिकपणाला आव्हान देणारे तीर्थक्षेत्र म्हणजेच शनिदेवाचे - शनिशिंगणापूर! आपल्याच महाराष्ट्रातील अहमदनगर जिल्ह्यातील हे एक आश्चर्यच! नगर- औरंगाबाद राज्य महामार्गावर नगरच्या उत्तरेला सुमारे ४० कि.मी. वर घोडेगावपासून आत पश्चिमेला पाच किलोमीटरवर सोनईकडे जाणाऱ्या कच्च्या रस्त्यावर शनिशिंगणापूर गावी नेणारी पत्र्याची कमान दिसते. तेथून थेट गावाच्या शिवारातून शेते व वस्तीतून शनिदेवस्थानापर्यंत पोहोचता येते. हातपाय धुऊन देवदर्शनास सिद्ध करण्यासाठी नळाचे पाणी येथे उपलब्ध आहे. वस्ती आहे फक्त दोन हजार!

आकाश हेच एकमेव छत्र धारण करणारे हे शनीचे स्थान! तिथे ना मंदिर ना मंदिराचा कळस, ना छप्पर, ना झाड, कसलाच निवारा इथे नाही. केवळ तीन फूट उंचीच्या चौथऱ्यावर पाच फूट नऊ इंच उंचीची काळीशार शनिमहाराजांची शिळा तेलाचा अभिषेक घेत थंडी - वारा - ऊन - पाऊस अंगावर घेत भक्तांना आशीर्वाद देत उभी आहे. शनिशिळेचे स्पर्शदर्शन ओलेत्याने व सोवळ्याने करण्याचा संकेत कटाक्षाने पाळला जातो. मात्र दुरून दर्शनासाठी कोणतेही बंधन नाही. दर्शनासाठी ताटकळणारी रांग, पुजाऱ्यांचा ससेमिरा, असे इथे काहीच नाही. दक्षिणा - देणग्या देण्याची सक्ती नाही. निवांत प्रदक्षिणा घालावी, वाटेल तितका वेळ देवदर्शन घ्यावे व धर्मशाळेत मुक्काम करावा, अगदी बिनघोर! ना चोरीची भीती ना सामानाची काळजी. असे हे क्षेत्र अद्‌भुतच!

शनिवारी येणाऱ्या गाड्या दर शनी अमावास्येला व वर्षातून दोन - तीनदा गुढीपाडवा, शनीजयंती (वैशाख अमावास्या) यावेळी मोठी यात्रा भरते. दर शनिवारी दहा हजारपर्यंत श्रद्धाळू भाविक आपापली वाहने घेऊन दर्शनासाठी मुद्दाम येतात.

सुमारे दीडशे वर्षांपूर्वी शिंगणापूर गावाजवळील नाल्यात शनिदेवाची शिळा सापडली. दृष्टांताप्रमाणे मामा - भाचे यांच्या व मामा - भाचे यांनी बैलजोडीच्या मदतीने ती शिळा आणून तिची स्थापना केली गेली. शिळेला गुराख्यांनी काठीने टोचल्याने एक खड्डा पडला व त्यातून रक्त वाहू लागले, असे सांगतात. तसेच या शिळास्थानाभोवती चौथरा बांधण्यात आला. दुष्काळाच्या वेळी शिते लावणे किंवा कौल लावणे हा प्रकार सुकाळ किंवा दुष्काळ याची पूर्वकल्पना देतो, यावर परिसरातील ग्रामस्थांची श्रद्धा आहे.

या गावाच्या आजूबाजूचा परिसर हा साखर क़ारखान्यांचा. त्यामुळे उसाचे मळे, ऊस घेऊन साखर कारखान्यांकडे जाणाऱ्या बैलगाड्या अशी दृश्ये दिसतात. या शनिस्थानाजवळून जाताना प्रत्येक उसाची गाडी क्षणभर थांबते, एक उसाची मोळी देवासाठी ठेवते आणि मार्गस्थ होते.

हिंदूप्रमाणेच सिंधी, जैन, मुस्लीम व्यापारी, नोकरदार, शेतकरी, कामकरी या सर्वांनाच शनिदेवाचे दर्शन घ्यावेसे वाटते. त्यातल्या बुद्धिवंत, शिक्षित, नास्तिक, लेखक मंडळींना हा चमत्कार काय आहे, हे 'प्रत्यक्ष' पाहण्याची उत्सुकता वाटते. दारे, कड्या, कुलपे यांना झुगारून देऊन मनाचे बंधन पाळणारे हे कलियुगातील सुलक्षणी विलक्षण गाव पाहून 'ही तर शनिदेवाची कृपा' असे मनोमन पटते. कुत्र्या - मांजरांपासून घराचे रक्षण करण्यासाठी पडदे, तात्पुरता लाकडी आडोसा, पिंप लावतात. सर्व समजून वागतात; त्यामुळे नवविवाहितांची अडचण होत नाही, असे संस्थानाचे अध्यक्ष श्री. बाबूराव बनकर यांनी सांगितले. लोक समंजसपणे वागतात, श्रद्धेने जगतात. येथे चोरी करणारा आंधळा होतो, त्याला परतीची वाट सापडत नाही, असे अनुभव अनेकांना आल्याचे त्यांनी सांगितले.

येणाऱ्या भक्तांच्या सोयीसाठी या शनिदेवाचे परमभक्त उदासीबाबा यांचा संगमरवरी मठ आता तयार झाला आहे. त्यांचा पुतळा व देवदेवतांच्या मूर्ती यांची नुकतीच स्थापना करण्यात आली, मात्र शनिदेव उघड्यावरच राहील. कारण असे बिनदाराचे, बिनकुलपाचे गाव हे नगर जिल्ह्याचेच नव्हे तर महाराष्ट्राचे आकर्षण व भूषण आहे. 'रामराज्य' अथवा 'आनंदवनभुवन' च म्हणावे असे हे स्थान सदैव अबाधित राहून अशी स्थाने जागोजागी निर्माण व्हावीत.

आपण एकदा तरी या अनोख्या व वैशिष्ट्यपूर्ण गावाचे व शनिदेवाचे दर्शन पर्यटक म्हणूनही घ्यायला हरकत नाही.

## ३.४ पुणे परिसर - पाहाल तेवढे थोडेच
## भुलेश्वर, केडगाव, वेळापूर, सोनोरी

पुणे - सोलापूर रस्त्याने निघाल्यावर सुमारे २० किलोमीटर अंतरावर थेऊर अष्टविनायक आहे. पुढे पुण्यापासून सुमारे ५० कि.मी. अंतरावर हडपसर, उरळीकांचन ओलांडल्यावर रस्त्याच्या उजवीकडे दक्षिण दिशेला यवत गावाच्या अलीकडे एक लोखंडी मनोरा व किल्ल्यासारखा डोंगरमाथा दिसतो तेच भुलेश्वरचे मंदिर. दुरून एखाद्या किल्ल्यासारखे दिसणारे प्राचीन दगडी शिल्पसौंदर्य डोंगरमाथ्यावर आहे. आता वरपर्यंत मोटारमार्ग झाला आहे. स्कूटर, मोटारसायकलने वर थेट पायऱ्यांपर्यंत जाता येते. हे शिवमंदिर पुरातत्त्व विभागाने संरक्षिलेले असून या मंदिरातील महादेवाची पिंड वैशिष्ट्यपूर्ण आहे. बिनतारी दळवणळणासाठी मंदिराच्या मागे बांधलेला लोखंडी मनोरा दुरूनही दिसतो.

मंदिरातील शिवपिंडीवरील शाळुंका काढल्यावर आत प्रसाद ठेवला असता देव त्यापैकी काही प्रसाद ग्रहण करतात व बाकीचा भक्तांसाठी ठेवतात, अशी भाविकांची श्रद्धा आहे. या ठिकाणी पोहोचण्यास जेजुरी - सासवडमार्गेही जाता येते. पुण्याहून सरळ सोलापूर रस्त्याने निघाल्यावर घाट व वळणाचे रस्ते फारसे नाहीत. केडगाव - चौफुला फाट्यापासून केडगाव बेटाकडे जाता येते. नारायण महाराजांचे केडगाव बेट मुख्य रस्त्याच्या उजवीकडे दक्षिण दिशेला २-४ कि.मी. आत आहे. प्रसन्न, स्वच्छ परिसर, ध्यानधारणा व चिंतनासाठी निवांत वातावरण, धर्मशाळा व दत्तमंदिर आहे. पुन्हा सोलापूर रस्त्याने पुढे निघाल्यावर पुण्यापासून ९० कि.मी. अंतरावर भिगवण आहे. भिगवण ओलांडल्यावर रस्त्याच्या डावीकडे म्हणजे उत्तरेस उजनी जलाशयाचे विस्तीर्ण पाणी दृष्टिपथात येते व बराच काळ रस्त्याशेजारून आपली सोबत करते. हवेत थंड गारवा जाणवतो. पाण्याच्या कडेला पाणपक्षी व हिरवळ आता वाढू लागली आहे, त्यामुळे कुठेही बसून मोकळ्या हवेचा, प्रसन्न वातावरणाचा सुखद आनंद उपभोगता येतो.

पुण्याहून अंदाजे १२० कि.मी. वर इंदापूर गावापलीकडे पुणे जिल्ह्याची हद्द संपते आणि सोलापूर जिल्हा सुरू होतो. इंदापूरपासूनच एक फाटा दक्षिणेला अकलूज गावाकडे जातो. अकलूज हे साखर कारखानदारीकरता प्रसिद्ध असलेले गाव; तरी तेथे पाहण्यासारखे बरेच काही आहे. तेथील ऐतिहासिक भुईकोट किल्ला मुद्दाम पाहण्यासारखा आहे. जुन्या किल्ल्याचे प्राचीन वास्तुशिल्प अबाधित राखून तट, बुरूज, बालेकिल्ला, कारंजी, हौद, कमानी यांची देखभाल करून अकलूज ग्रामपंचायतीने ही दुर्लक्षित वास्तू आकर्षक बनवली आहे. आतील कर्मवीर बाबासाहेब पाटील उद्यान, हिरवळ व बालेकिल्ल्यावरील शिवछत्रपतींचा अश्वारूढ पुतळा यामुळे हे केवळ ऐतिहासिक स्थान न राहता प्रेरणादायी, प्रेक्षणीय व सहलीचे ठिकाण झाले आहे. किल्ल्यातच प्राचीन अवशेष, शिलालेख, वस्तू, भांडी, हत्यारे यांचे छोटे प्रदर्शन असून किल्ल्यात सापडलेले वीरगळ, सतीगळ, कोरीव कामाच्या वस्तू किल्ल्यातील प्राचीन रचनेचा वापर करून मांडल्या आहेत. आधुनिक बांधकामातील कृत्रिमता मुद्दामच आणलेली नाही. किल्ल्याच्या तटावरून फेरफटका मारताना नीरा नदीचे पात्र लगतच असल्याने थंड वाऱ्याची सुखद झुळुक अनुभवता येते. पूर्वी नदीच्या पात्रातून किल्ल्यावरील मोट हत्तींच्या साहाय्याने पाणी खेचत असे; व ते पाणी पौष्टिक व आरोग्यदायी असल्यामुळे 'झेल मोटेचे पाणी मेलेल्याला रंग आणी -' अशी स्थानिक म्हण प्रचलित होती.

अकलूज गावातच बुरुजातला महादेव आहे. हा बुरुजात झाकला व गाडला गेलेला महादेव आता तट फोडून खुला करण्यात आला आहे, याशिवाय साखर कारखान्याच्या परिसरात शंकरनगरमधील अकलूजची पर्वती बाग म्हणजे टेकडीवरील सुरेख आधुनिक शिवमंदिर! या टेकडीवर मुद्दाम विकसित केलेला वृक्षपरिसर हेही सहलीचे ठिकाण आहे. ही ग्रामीण भागातील प्रगतीची आधुनिक खूण आहे.

त्याहीपेक्षा आकर्षक असे प्राचीन शिल्पकाम व यादवकालीन मंदिर पाहण्यासाठी अकलूजजवळील वेळापूर या प्राचीन गावी (अकलूजपासून १५ कि.मी. अंतरावर) जायला हवे. ते 'अर्धनारी नटेश्वर मंदिर' या नावाने ओळखले जाते. दगडी अखंड बांधकाम, विस्तीर्ण परिसर आणि आत ३/४ फुटी शिवपार्वतीची नृत्यात रंगलेली कलापूर्ण पाषाणमूर्ती. मूर्तीचा आकार, सौंदर्य, अलंकार, आयुधे व भावभावना फारच अप्रतिम आहेत. चौरस आकाराच्या महादेवाच्या पिंडीवर ही यादवकालीन मूर्ती आहे. जवळच प्राचीन अवशेषांचे वस्तुसंग्रहालयही आहे. हे ठिकाण अकलूजच्या किल्ल्याप्रमाणे पर्यटनदृष्ट्या दुर्लक्षित आहे.

वेळापूरहून माळशिरसमार्गे पुण्याकडे परतीच्या प्रवासाला वेगळ्या रस्त्याने निघाल्यावर परतताना अनायसे नातेपुते, फलटणचे ऐतिहासिक श्रीराम मंदिर, अष्टविनायकातील मोरगावचे गणपती मंदिर यांचे दर्शन घेता येते. कऱ्हेच्या काठावरील कै. आचार्य अत्रे यांचे सासवड, तेथील सोपानकाकांची समाधी व मंदिरे, पुरंदरे वाडा पाहून नंतर वाटेतील जेजुरीच्या खंडेरायाचे

दर्शन नवलाख पायरी ओलांडून घेता येते. दीपमाळा आणि कडेपठार यांचे विहंगम दृश्य जेजुरीच्या मंदिराच्या उंच टेकडीवरून दिसते. मग दिवे घाटातून पुण्याला परतण्यापूर्वी घाटाच्या सुरवातीला दिवे गावातून २/४ कि.मी. वर आत सोनोरी हे ऐतिहासिक गाव आहे. पेशव्यांच्या तोफखान्याचे सरदार पानसे यांचे हे गाव. येथे ऐतिहासिक मूर्ती असलेली विष्णु, मुरलीधर, गणेश मंदिरे पाहता येतात. मुख्य रस्त्यावरूनही ऐतिहासिक जाधवगढी दिसते व तेथून पुण्याला तासाभरात परतता येते. अगदी पुण्याच्या परिसरातील सुमारे दहा ठिकाणे २/३ दिवसांच्या सहलीत पाहता येतात.

## ३.५ उज्वल भविष्याचा सिंधुदुर्ग जिल्हा

१ मे १९८१ या महाराष्ट्र - दिनाच्या दिवशी दोन नवीन जिल्ह्यांची निर्मिती आपल्या राज्यात झाली. त्यापैकी एक सिंधुदुर्ग जिल्हा!

महाराष्ट्रातील सर्वात लहान जिल्हा म्हणजे हा नव्याने निर्माण झालेला सिंधुदुर्ग जिल्हा. याचे क्षेत्रफळ फक्त सुमारे ५००० चौरस किलोमीटर असून मूळ रत्नागिरी जिल्ह्याच्या दक्षिणेकडील भाग जो दक्षिण रत्नागिरी म्हणून ओळखला जात असे तोच हा सिंधुदुर्ग होय. मूळ रत्नागिरी जिल्हा म्हणजे दक्षिणोत्तर पसरलेली चिंचोळी किनारपट्टी. त्यापैकी दक्षिणेकडील कणकवली, देवगड, मालवण, वेंगुर्ले, कुडाळ, सावंतवाडी आणि नव्याने निर्माण करण्यात आलेली वैभववाडी हे सात तालुके मिळून सिंधुदुर्ग जिल्हा बनला आहे. वैभववाडी तालुका मूळचा कोल्हापूर जिल्ह्यातील गगनबावडा तालुक्यातील ३७ गावांचा मिळून तयार केला आहे. त्याला तळ - कोकण असेही म्हणतात.

इ.स. १६६४ मध्ये कुरटे या बेटावरील ४८ एकर क्षेत्रात सिंधुदुर्गच्या उभारणीस वेदवाद्यांच्या घोषात शुभारंभ झाला. एकूण ५२ बुरूज असलेल्या ३० फूट उंचीच्या व १२ फूट रुंदीच्या भक्कम तटबंदीची बांधणी आरमारी संरक्षणशास्त्रदृष्ट्या त्यावेळी करण्यात आली होती. या सागरी दुर्गाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे भारतातील एकमेव शिवाजीमंदिर या किल्ल्यातच आहे. ते छत्रपती राजाराम महाराजांनी बांधले, व त्यात शिवाजी महाराजांची काळ्या पाषाणाची मूर्ती अजूनही पूजली जाते. त्या मूर्तीचे वैशिष्ट्य म्हणजे प्रचलित पुतळ्याप्रमाणे दाढी असलेला हा शिवाजी महाराजांचा पुतळा नसून दर सोमवारी या मूर्तीस मानाची खलाशी टोपी चढवली जाते, तसेच प्रतिवर्षी चैत्र नवमीस आणि शिवजयंतीस यात्राही भरते. सुमारे ४५ फूट लांब आणि २३ फूट रुंद असलेले हे शिवमंदिर उठून दिसते.

४००-४५० गावे आणि सुमारे आठ लाख लोकवस्ती असलेल्या या जिल्ह्यातील जीवनमान बऱ्याच ठिकाणी निसर्गाधिष्ठित आहे. डोंगर - उतार, छोट्या टेकड्या, लाल

जांभा दगड, तांबूस माती, शरीरातून घाम काढणारी उष्ण हवा आणि २००-३०० सेंटिमीटर पाऊस यामुळे भाताबरोबरच नारळ, पोफळी, काजू आणि आंबा यांच्या बागा नैसर्गिक अनुकूल हवेमुळे जागोजागी आढळतात. कुडाळ, कणकवली, मालवण, वेंगुर्ले या भागात सहकारी व सरकारी मदतीने छोट्या उद्योग - व्यवसायांची वाढ होऊ लागली आहे. पर्यायाने स्थानिक लोकांची स्थिती निसर्ग - सान्निध्यात सुधारल्यास कोकणचे वैशिष्ट्य राखले जाईल आणि मगच 'कोकणचा कॅलिफोर्निया' करण्याचे स्वप्न साकार होऊ शकेल.

फणस, आंबे, काजू या निर्यातयोग्य फळांबरोबरच समुद्रकिनाऱ्यावर मिळणारी मत्स्यसंपत्ती, विशेषत: कोळंबी (प्रॉन्स) हे या जिल्ह्याचे वैशिष्ट्य आहे. विजयदुर्ग, मालवण, देवगड, वेंगुर्ले येथील मच्छिमारी जीवन व किनारी सौंदर्य पाहण्यासारखे आहे. त्यातच सावंतवाडीची कलापूर्ण लाकडी फळे जणू खरीच वाटतात. तसेच आंबोली हे ठिकाण २७०० फूट उंचीवर असून 'प्रतिमहाबळेश्वर' म्हणून पर्यटकांचे वाढते आकर्षण आहे. या भागात रेशीम व रबर उद्योगांची वाढ करण्यात येत आहे. भरपूर पावसाच्या या प्रदेशात उन्हाळ्यात पाण्याची चणचण पडू नये म्हणून कुडाळ तालुक्यातील टाळंबा धरण, कणकवली तालुक्यातील धोणसरी धरण आणि लहान - मोठे पाटबंधारे उपयुक्त ठरत आहेत. सुपारी, पोफळीबरोबरच कोकणचा मेवा म्हणजे कोकम किंवा आमसुले तयार करण्याचा गृहोद्योग पोह्याच्या कारखान्यांप्रमाणेच परंपरेने चालू आहे. या नैसर्गिक संपत्तीबरोबरच खनिज संपत्तीपैकी कच्चे लोखंड, मँगेनीज् यांच्या खाणी रेडी येथे आहेत; तर कणकवलीजवळ क्रोमाईट, आंबोलीजवळ बॉक्साईट आणि जिल्ह्यात सिलिकाचे साठे आढळले आहेत. निसर्गाने जमिनीच्या पृष्ठभागावर व पृष्ठभागाखालीही या जिल्ह्याला भरपूर नैसर्गिक संपत्ती व खनिज संपत्ती जलसंपत्तीबरोबरच प्रेमपूर्वक बहाल केली आहे, असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. या छोट्या जिल्ह्याच्या निर्मितीतून भविष्यकाळी महान् कार्य घडेल अशी अपेक्षा आहे.

कुडाळजवळील ओरोस बुद्रुक या ठिकाणी आता या जिल्ह्याचे मुख्य ठिकाण किंवा जिल्हा ठिकाण विकसित होत आहे.

## ३.६ अहमदनगर जिल्ह्याची झलक

अहमदनगर जिल्हा त्याच्या नावावरून हिंदू - मुस्लीम संस्कृतीचा संगम असल्यासारखा दिसतो. पूर्वीच्या राज्यकर्त्याचे 'अहमद' हे नाव आणि मोठे शहर या अर्थी संस्कृत भाषेतून आलेला 'नगर' हा शब्द. बऱ्याच वेळा सुकरतेच्या दृष्टीने अहमदनगरला नुसते 'नगर' असेच बोलीभाषेत संबोधले जाते. या जिल्ह्याचे नाव डोळ्यांसमोर येताच पाण्याचे दुर्भिक्ष असलेला दुष्काळी भाग, खास नगरीवाणाच्या साड्या, स्वातंत्र्योत्तर काळातील सहकारी

साखर कारखान्यांची वाढ झालेला जिल्हा, त्याचबरोबर महाराष्ट्राच्या थोर संतपरंपरेतील संतश्रेष्ठ ज्ञानेश्वरांचे नेवासे, देशी - विदेशी भक्तांचे श्रद्धास्थान असलेले शिर्डी हे देवस्थान, स्वातंत्र्यपूर्वकाळातील स्वातंत्र्यसैनिकांना कैदेत ठेवलेला नगरचा भुईकोट किल्ला अशा ठळक गोष्टी डोळ्यांसमोर येतात.

स्थानदृष्ट्या पश्चिम महाराष्ट्रात मध्यभागी असलेला हा जिल्हा उत्तरेकडे नाशिक आणि औरंगाबाद, पूर्वेकडे बीड, आग्नेयेकडे उस्मानाबाद, दक्षिणेकडे सोलापूर, पश्चिमेकडे पुणे व वायव्येकडे ठाणे अशा सात जिल्ह्यांना स्पर्श करतो. सुमारे १७,००० चौरस किलोमीटर क्षेत्रफळाच्या या जिल्ह्यात सुमारे १५०० खेडी असून लोकसंख्या ३५ लाखांच्या जवळपास पोहोचली आहे. मात्र साक्षरतेचे प्रमाण ५०% पेक्षाही कमी आहे. तेरा तालुके असले तरी औद्योगिक वसाहती अहमदनगर व श्रीरामपूर येथे विकसित झाल्या आहेत. जिल्ह्याच्या नकाशाकडे पाहिल्यावर पश्चिमेकडील भाग डोंगराळ सह्याद्रीच्या रांगांचा, तर पूर्वेकडील सखल व उताराचा. महाराष्ट्रातील सर्वात उंच शिखर कळसूबाई (१६४६ मीटर) हे पश्चिमेकडील अकोले तालुक्यातील नाशिक जिल्ह्यालगत आहे. त्याच्याजवळच ब्रिटिशांनी बांधलेले भंडारदऱ्याचे दगडी धरण आणि रंधा धबधबा ही ठिकाणे पर्यटकांच्या दृष्टीने खास आकर्षणाची आहेत. १९१० ते १९२६ या काळात एक कोटी रुपये खर्च करून बांधलेले विल्सन धरण म्हणजे 'भंडारदरा!' या मागचे असलेले सरोवर अजूनही ऑर्थर सरोवर म्हणून ओळखतात. अवघ्या नगर जिल्ह्याचे रूप पालटवणाऱ्या प्रवरा नदीवरील हे धरण मजबूत करण्यासाठी १९७० मध्ये दोन कोटी रुपये खर्ची पडले; परंतु त्यामुळे जिल्ह्याचा कायापालट झाला. येथूनच 'कळसूबाई' - दर्शन घडते व रतनगडही दिसतो. धरणाच्या २/३ मोऱ्यांमधून सोडलेले पांढरेशुभ्र पाणी दुरूनही दिसते. धरणावर पोहोचण्यासाठी विटा घाटातून जाताना घोंघावणाऱ्या पाण्याचा आवाज कानी येतो; परंतु जवळपास पाणी दिसत नाही. मुख्य रस्ता सोडून थोडे आत गेल्यावर काळ्या कातळावरून कोसळणाऱ्या पांढऱ्याशुभ्र रंधा धबधब्याचे शुभ्रदर्शन घडते. हा धबधबा आपल्याला माथ्यावरून पाहता येतो. रंधा म्हणजे शुभ्र फेसाळणारे दूधच जणू! काळ्या धरणीमातेच्या हिरव्या पदराआडून लेकराच्या मायेने उचंबळून येणारे दूध! या ठिकाणचा परिसर असाच निसर्गावस्थेत राहावा. प्रस्तावित जलविद्युत केंद्र उभारताना काळजी घ्यायला हवी.

पेशवाईतील साडेतीन शहाण्यांपैकी तलवार व लेखणी बहाद्दर विठ्ठल सुंदर परशुरामी संगमनेरचे, सेनापती त्रिंबकजी डेंगळे हेही इथलेच. आणि 'बिकट वाट वहिवाट नसावी, धोपटमार्गा सोडू नको' अशा काव्यसंदेशाने आणि लेखणीतील फटक्याने लक्षात राहणारे शाहीर अनंत फंदीदेखील याच भागातले.

संगमनेरशिवाय कोपरगाव, श्रीरामपूर, राहुरी या भागात सहकारी कारखान्यांचे जास्त केंद्रीकरण झालेले आढळते. याशिवाय हातमाग, कापूस, तेल कारखाने वाढत आहेत.

मोसंबी, द्राक्षे आणि ऊस या बागायती पिकांबरोबर कापूस आणि ज्वारी- बाजरी ही मूळची पिके कमी पाण्याच्या भागात होतात.

शिर्डीच्या साईबाबांप्रमाणेच साकोरीच्या उपासनी महाराजांचा कन्या- आश्रम, अरणगावचे मेहेरबाबा, नगरचे दासगणू व श्रीगोंद्याचे महंमदबाबा, पुणताब्यांचे चांगदेव ही संतमंडळी याच जिल्ह्यातील. प्राचीन अगस्ती ऋषींचा आश्रम अकोले येथे आणि शनीदेवाचे शिंगणापूर आजच्या युगातही दरवाजे, कुलपे, कडीकोयंडे याशिवाय सुखरूप आहे. मढीजवळची कानिफनाथांची समाधी - भटक्या जमातीचे श्रद्धास्थान. पारनेरजवळील वडगाव - दर्या हे ठिकाण चुनखडीच्या खडकामुळे निर्माण झालेला लवणस्तंभाचा खडकांचा प्रकार दाखवते. पारनेरचे पारनेरकर महाराज, नगरचा चांदबिबीचा महाल, डोंगरगण ही वैशिष्ट्ये विसरून चालणार नाही. अष्टविनायकापैकी सिद्धटेक हे पुणे जिल्ह्याच्या लगतचे भीमेच्या काठावरचे देवस्थान जिल्ह्याच्या दक्षिणेकडे आहे. राहुरीच्या कृषी विद्यापीठातील कृषी - संशोधन तर आज साऱ्या महाराष्ट्राला उपयोगी ठरते आहे.

पुण्याहून औरंगाबादला किंवा विदर्भात जाताना अथवा नाशिकला जाताना वा धुळे - जळगावला जातानाही हा जिल्हा ओलांडावा लागतो. या जिल्ह्याच्या उत्तरसीमेवरील गोदावरी व दक्षिण सीमेवरील भीमा या नद्या, तसेच सीना, मुळा, घोड, प्रवरा या अंतर्गत भागातील नद्या व त्यावरील धरणे यामुळे दुष्काळाचे रूपांतर सुकाळात होऊ लागले आहे.

पर्यटकांचे आणखी एक आकर्षणाचे केंद्र म्हणजे रेहेकुरीचे काळवीट अभयारण्य! श्रीगोंदे तालुक्यातील सुमारे २०० चौरस किलोमीटर क्षेत्र असलेले हे अभयारण्य श्रीगोंद्यापासून ४० कि.मी. वर आहे. काळवीट हा रुबाबदार हरणाच्या जातीचा प्राणी पर्यटकांना आकर्षितो. चमकदार तपकिरी रंग व सर्पिल शिंगे असलेला हा काळवीट 'कृष्ण - मृग' म्हणून ओळखला जातो. याचा एक विशेष म्हणजे यांच्या कळपाचे नेतृत्व वयस्क परंतु हुशार मादीकडे असते. कोरड्या भागात आणि गवताळ कुरणांवर अती वेगाने धावणारा हा प्राणी म्हणजे या जिल्ह्याचे एक विशेष वैशिष्ट्य आहे.

अशी ही अहमदनगर जिल्ह्याची तोंडओळख. विस्तारलेल्या सहकाराची, संतांच्या आणि इतिहासाच्या साक्षीची, शेतीविकासाची आणि पर्यटनस्थळांची केवळ ओझरती झलक!

## ३.७ दौलताबादचा किल्ला

१४ जानेवारी १९९१ भूगोलदिनाच्या निमित्ताने औरंगाबादला जाण्याचा योग आला; त्याचवेळी टी.व्ही. वर 'इतिहास के गवाह' मध्ये गाजलेला देवगिरी ऊर्फ दौलताबादचा किल्ला मुद्दाम पाहायला गेलो. हा किल्ला पुरातत्त्व विभागाकडे असून अपवादात्मकरीत्या स्वच्छ आणि पर्यटकांना जागोजागी माहिती देणारा आहे. चौकीदार असूनही श्री. यादव

इंगळे यांनी किल्ल्याची मार्गदर्शक माहिती चांगली सांगितली. छायाचित्रे काढण्यासाठी चांगल्या जागाही दाखवल्या. मात्र देशातील अस्थिर परिस्थितीमुळे रोज भेट देणाऱ्या २/३ हजार पर्यटकांऐवजी ३००-४०० पर्यटकच सध्या येतात, नाहीतर या महिन्यात पर्यटकांच्या गर्दीचा दरवर्षी उच्चांक होतो, हीही खंत त्यांनी बोलून दाखवली.

सूर्योदय ते सूर्यास्त ही किल्ला पाहण्याची वेळ असली तरी नाममात्र प्रवेश फी ठेवल्यास किल्ल्याची दर्शनीयता व आकर्षण प्रवाशांना वाटेल, अशी सूचना पुरातत्त्व विभागाचे श्री. महंमद सलाउद्दीन यांनी केली, याचा अवश्य विचार व्हावा. या किल्ल्याचे आकर्षण म्हणजे ७० मीटर उंचीचा 'चांदमिनार', वळणावळणाच्या किल्ल्याच्या चढणीवरील प्रचंड प्रवेशद्वारे, महाकोट, खोल खंदक, शत्रूची दिशाभूल करणारे अंधारमार्ग, भुलभुलैय्या आणि संरक्षणाच्या वेगवेगळ्या वास्तुयोजना पाहून किल्ल्याच्या वास्तुशास्त्राबद्दल आश्चर्य वाटते व अभिमानही वाटतो. 'मेंढा तोफ' ही या किल्ल्याचे भूषण आहे. याशिवाय 'दुर्गा तोफ', चिनी महाल, निजामशाही महाल, गणेश मंदिर, जनार्दनस्वामींच्या पादुका, हाथी हौद आणि भारतमाता मंदिर पाहायला हवे. सुमारे चार तासांचा हा किल्लाप्रवास सुरवातीला मंद चढणीचा असला तरी पुढे दमछाक करतो; मात्र पश्चिम महाराष्ट्रातील किल्ल्यांच्या तुलनेत हा किल्ला विस्तीर्ण व ऐसपैस आहे. प्रवाशांच्या सोयीसाठी रंगीत छायाचित्रे, कॅमेरा रोलपासून चहापाणी व नाश्त्याची व्यवस्था किल्ल्यासमोरील उपाहारगृहात आहे. किल्ल्यापासून पुढे १०/१२ कि.मी. वर वेरूळची जगप्रसिद्ध लेणी आहेत. तिकडे जाताना किंवा येताना प्रवाशांनी हमखास वेळ काढून पहावा, असा हा दर्शनीय किल्ला आहे.

देवगिरी अथवा दौलताबाद सुमारे ८०० वर्षांपूर्वी यादव राजा भिल्लम यांनी शंकूवाकार डोंगरावर हा किल्ला बांधला. पुढे तो खिलजी, तुघलक, निजामशहा, शहाजहान, निजाम यांच्या ताब्यात आला. पायथ्यापासून सुमारे २२१ मीटर उंच असलेल्या या किल्ल्याला सात मोठे दरवाजे आणि सभोवताली खोल खंदक अशी रचना आहे. खंदक ओलांडून किल्ल्यात प्रवेश करणे शत्रूला अवघड होई. तसेच बाहेरील तटाच्या आत आणखी दोन तट असून डोंगराच्या कडा ताशीव, गुळगुळीत, तीव्र उताराच्या असल्याने त्यावरून चढणे शत्रूला अशक्य होईल, अशी रचना आहे. भरपूर पाणी, संरक्षणाचे गुप्त मार्ग व खोल्या, महाल, मशिदी आणि मंदिरे व वैशिष्ट्यपूर्ण वास्तुरचना यामुळे दिल्लीहून दौलताबाद येथे राजधानी आणण्याचा महंमद तुघलकाने केलेला प्रयत्न सर्वज्ञात आहे. औरंगाबाद शहराच्या व वेरूळ लेण्यांच्या जवळच हा किल्ला असल्याने देशी व परदेशी पर्यटकांचे आणि सहलीचे हे आकर्षण केंद्र आहे. या किल्ल्याची छोटीशी भेट देण्याएवढी प्रतिकृती तयार करून घेतल्यास प्रवासी ती हौसेने विकत घेतील. तसेच भारतमाता मंदिराबाहेर अनेक मौल्यवान शिल्पाकृतींचे अवशेष इतस्ततः पडले आहेत, ते दर्शनी स्वरूपात ठेवावेत व मांडावेत अशी पुरातत्त्व विभागास सूचना आहे. नुसतेच किल्ल्याचे फोटो विकत घेण्यापेक्षा आता

प्रवाशांना माहितीपूर्ण सचित्र रंगीत छापील नकाशा मिळाला तर हवा आहे. तसेच किल्ल्यातील विविध स्थाने कोठे आहेत, ती प्रथमदर्शनी कशी दिसतात व त्यांचे वैशिष्ट्य दाखवणारा रेखाचित्रांकित प्रदर्शनीय मोठा नकाशा प्रतिकृती स्वरूपात (६ फूट x ६ फूट) मुख्य दरवाज्याजवळील तोफसंग्रहालयातील मोकळ्या जागेत असावा. तो शाळकरी मुलांनाही पाहता येईल इतक्या उंचीवर म्हणजे जमिनीपासून १॥ ते २ फुटांवर टेबलासारखा मांडावा, अशी सूचना करावीशी वाटते; यामुळे माहितीही मिळेल आणि आकर्षकताही वाढेल. पुरातत्त्व खात्याने हा आधुनिक दृष्टिकोन पर्यटकांच्या सोयीसाठी स्वीकारावाच.

दौलताबादच्या किल्ल्याप्रमाणेच औरंगाबाद परिसरामध्ये पैठणचे संत एकनाथ महाराज समाधी मंदिर, संत ज्ञानेश्वर उद्यान व त्यातील म्हैसूरच्या वृंदावन गार्डनची आठवण करून देणारी बाग, कारंजी, रंगीत दिव्यांच्या झोतात संगीत कारंजे (Musical Fountain), जायकवाडी धरण व नाथसागर जलाशय, गाढेश्वर मंदिर, पैठणी निर्मितीची पारंपरिक कला अशी अनेक आकर्षणे आहेत. औरंगाबाद शहरातील बीबी का मकबरा, पाणचक्की इत्यादी ऐतिहासिक वास्तूही, प्रवाशांना आनंद देणाऱ्या स्थानिक हिमरू शालीसारख्या नाजूक कलात्मक आहेत.

## ३.८ रंधा धबधब्याचे शुभ्रदर्शन

पुण्या - मुंबईच्या प्रवास - इच्छुकांनी खंडाळा, लोणावळा आणि महाबळेश्वर या पर्यटनस्थळांच्या पलीकडे जाण्यासाठी पूर्वी दुष्काळी म्हणून प्रसिद्ध असलेला पण आता धरणाच्या पाण्यामुळे हिरवा झालेला नगर जिल्हा निवडला आणि संगमनेरची वाट धरली तर पुण्याहून ३/४ तासात सहज पोहोचता येते; आणि महाळुंगी - प्रवरा नद्यांच्या संगमावरील हे ऐतिहासिक आणि सहकारी गाव अहमदनगर आणि नाशिकच्या मध्यावर असले तरी भंडारदरा धरणाच्या वाटेवर आहे, म्हणून जायचे ठरवले.

पेशवाईतील साडेतीन शहाण्यांपैकी एक पूर्ण शहाणे - विठ्ठल सुंदर परशुरामी - संगमनेरचेच. शूरवीर त्रिंबकजी डेंगळे आणि शाहीर अनंत फंदी इथलेच. तमासगिरांबरोबर एका गावाहून दुसऱ्या गावाला जाताना दरोडेखोरांनी त्यांना लुटले खरे, पण हा तमासगीर उत्तम लावण्या करतो हे ऐकल्यावर त्यांनी लावण्या ऐकून त्यांची आदरपूर्वक सुटका केली व कलेची कदर दरोडेखोरांनीही दाखवली ती याच परिसरात!

भंडारदरा धरणापेक्षाही मला आकर्षण होते रंधा धबधब्याचे! संगमेनरपासून पश्चिमेला राजुरामार्गे २/२॥ तासांत विटा घाटातून सह्याद्रीच्या डोंगररांगांतून आपण वळणावळणाने प्रवास करू लागलो की निसर्ग आपल्या जवळ येऊ लागतो. सपाटीवर माणसाने वस्ती केली आणि शेजारील डोंगरावरील झाडीही भुईसपाट केली; त्यामुळे ओढ लागते अजून

उभ्या आणि हिरव्या जंगलाची, डोंगर न दिसणाऱ्या झाडीची! घाट ओलांडून आपण माथ्यावर पोहोचल्यावर प्रवरेच्या खोऱ्याचे विहंगम दृश्य पहात असतानाच कानी घुमणारा पाण्याचा आवाज येतो. काळे कातळ आणि खडकातून वाहणाऱ्या स्वच्छ पाण्याच्या कडेने गेल्यावर, पुढे धबधब्याच्या माथ्याजवळूनच कोसळणाऱ्या फेसाळ पाण्याचे शुभ्रदर्शन घडते. उन्हात चमकणाऱ्या आणि तेजाळणाऱ्या पाण्याबरोबरच इंद्रधनुष्याचे फेर धरलेले असतात. धबधब्याच्या माथ्याजवळून घडणारे धबधब्याचे दर्शन अपूर्व व अपवादात्मक आहे. ५०/६० मीटरवरून पडणाऱ्या या पाण्याने दोन्ही बाजूंचा खडक उभा खोदून घळईतून वाट शोधली असावी किंवा एखाद्या लहान मुलाने जिन्यावरून मधल्या पायऱ्या गाळून पुढे उडी मारावी, तशीच या पाण्याने अवखळपणाने खोल दरीत उडी घेतली असावी. शहरीकरणाचा स्पर्श इथे फारसा न झाल्याने वातावरणात शांतता आणि अकृत्रिमता आहे. लवकरच इथे जलविद्युत प्रकल्प होणार असल्याची पाटी वाचली. त्यावर होते, 'मार्च १९८६ मध्ये हा प्रकल्प पूर्ण होईल.' अर्थातच तो सरकारी गतीने चालत असल्याने धबधबा आम्हाला पाहायला मिळाला, हे भाग्यच! जलविद्युत प्रकल्प उभारताना मूळ नैसर्गिक धबधब्याच्या दृश्यात व परिसरात बदल होणार नाही, कृत्रिमता येणार नाही, नैसर्गिक सौंदर्याला बाधक अशी बांधकामे, विजेचे खांब दृष्टिपथात येऊ नयेत अशी दक्षता मात्र घ्यायला हवी, म्हणजे पर्यटकांचे हे आकर्षण मूळच्या नैसर्गिक अवस्थेत राहील.

रंधा म्हणजे शुभ्र फेसाळ दूधच वाटावे! वळणावळणाच्या रस्त्याने सह्याद्रीच्या कुशीत शिरल्यावर डोंगररांगांच्या बेचक्यात धबधब्यापासून १०/१५ कि.मी. अंतरावर भंडारदऱ्याचे दगडी धरण दिसू लागते. धरणाच्या दोन मोऱ्यांमधून सोडलेले पाणी दूरवरूनही नजरेत भरते. १९१० ते १९२६ या काळात एक कोटी रुपये खर्च करून बांधलेल्या या जुन्या 'विल्सन धरणा' च्या मागे पसरलेल्या जलाशयास 'आर्थर सरोवर' असे जुनेच नाव आहे. धरणाचे मात्र जुने नाव बदलले असून ते भंडारदरा असे झाले आहे. अवघ्या नगर जिल्ह्याचे रूप बदलणाऱ्या प्रवरा नदीच्या उगमाच्या जवळचे हे धरण ५०० मीटर लांब व ८० मीटर उंच आहे. १९७० मध्ये धरणाच्या मजबुती व दुरुस्तीसाठी पुन्हा २ कोटी रुपये खर्ची घालण्यात आले, परंतु यानेच जिल्ह्याचा कायापालट घडला. धरणावरून दूरवर जलाशयाच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रातील सर्वात उंच शिखर कळसूबाईचे दर्शन घडते; (उंची १६४६ मीटर) आणि रतनगडही दिसतो. जलविहाराची आणि पर्यटक निवासाची सोय असल्याने या शांत, रम्य परिसरात काही काळ तरी राहण्याचा योग यायला हवा.

धरणाखालील भागात अपवादात्मकरीत्या निगराणी राखलेली छानशी हिरवीगार बाग आहे. तिथे उभे राहून जलतुषारांनी भिजत असतानाच दोन हात लांबीची पिवळी जर्द सोनेरी धामण सरसरत दिमाखात समोरून गेली.

देशातल्या अतिरेकी कारवायांमुळे धरण जवळून पाहण्यास बंदी आहे. मात्र पूर्वपरवानगीने

धरणावर प्रवाशांना राहता येते. हेही नसे थोडके! एम.आय.डी.सी. व इरिगेशनचे तिथे सुरेख बंगले आहेत. राहण्या - जेवणाच्या सोयींसह.

रंधा - भंडारदऱ्याहून निघालो परतभेटीच्या अकृत्रिम इच्छेने आणि माझ्याच मला दिलेल्या आश्वासनाने! परत इथे आल्यावरही हा परिसर आणि हा निसर्ग असाच अकृत्रिम राहील या अपेक्षेने!

## ३.९ कुलदैवत - तुळजापूर आणि पर्यटनदैवत - नळदुर्ग

तसं पाहिलं तर प्रत्येकाने कुटुंबियांसह घरातील शुभकार्याच्या आधी किंवा नंतर, २/४ वर्षांतून किमान एकदा तरी किंवा जमलं तर दरवर्षी धार्मिक कार्याच्या, जत्रेयात्रेच्या निमित्ताने आपापल्या कुलदेवतांच्या दर्शनाला जाण्याची प्रथा धार्मिक व जुनी असली तरी आजही मोठ्या प्रमाणावर पाळली जाते. त्या निमित्ताने कुलदेवतेचे दर्शन घडते, प्रवास घडतो, जुन्यांच्या श्रद्धा जपल्या जातात, नव्या पिढीला नवी माहिती मिळते, व मधल्या पिढीला कर्तव्यपूर्तीचे समाधान लाभते. कोणी जातो कोल्हापूरच्या अंबाबाईला, कोणी जेजुरीच्या खंडोबाला, तर कोणी तुळजापूरच्या भवानीआईच्या दर्शनाला. शिवछत्रपतींचे प्रेरणास्थान असलेली तुळजापूरची भवानी शेकडो वर्षे मराठी मनाला आधार देते आहे आणि निर्धार जागवते आहे.

हे मंदिर मराठवाड्यातील उस्मानाबाद जिल्ह्यात महाराष्ट्र राज्याच्या आग्नेयेकडील भागात असले तरी वर्षभर या ना त्या उत्सवाने गजबजलेले असते. किनारपट्टीपासून आणि राजकीय घडामोडी घडलेल्या पश्चिम महाराष्ट्रापासून दूर असल्याने मूळ दगडी कोरीव काम सुरक्षित आहे. बालाघाट डोंगररांगांच्या दोन कड्यांच्या मध्यभागी, बेचक्यात - डोंगराच्या नैसर्गिक तटबंदीत ही कुलदेवता सुरक्षितरीत्या वसली आहे. डोंगर ओलांडून गेल्याशिवाय मंदिराचा कळस दिसत नाही. परंपरेप्रमाणे मार्गातील घाटशिळ - दर्शनानंतर मंदिरात जाण्याची प्रथा आहे. पूर्वीची दोन महाद्वारे पुन्हा नव्या स्वरूपात बांधण्याचे काम पूर्ण झाले आहे. राजा शिवाजी व राजमाता जिजाबाई अशी ही दोन महाद्वारे ४० फूट उंचीची प्राचीन शिल्पकृतींसह - त्या दोन महाद्वारांमध्ये ३ मजली जुन्या बांधकामाशी साधर्म्य राखणारी वास्तू - पूर्ण झाली असून तेथे संत तुकाराम व संत ज्ञानेश्वर ही धार्मिक ग्रंथालये, श्रीसमर्थ अतिथीकक्ष व माहितीकक्ष तयार झाले आहेत. नवनिर्मित महाद्वारातून आत गेल्यावर डाव्या हाताला कल्लोळ तीर्थावर स्नान करण्यासाठी व कपडे बदलण्यासाठी स्वतंत्र सोय केली आहे. त्यानंतर उजव्या बाजूकडील बारमाही पाणी असलेल्या गोमुखावरील बांधकामाचे नूतनीकरण व सोयी करण्यात आल्या आहेत. मंदिराच्या मुख्य परिसरातही वेळोवेळी आधुनिक बांधकामे व टाईल्स् काढून मूळ स्थापत्याचे जतन व नूतनीकरण करण्याची जबाबदारी तुळजाभवानी

मंदिर ट्रस्टने घेतली आहे. या नूतनीकरणाचा खर्च अंदाजे दीड कोटी रुपये असून तीन नवी विश्रामगृहेही - भक्तांसाठी, बागबगीचा आणि स्वच्छतागृहांसह बांधली आहेत. यामुळे या पारंपरिक तीर्थक्षेत्राचे पावित्र्य व पारंपरिक शिल्पसौंदर्य राखून कालानुरूप आधुनिक सोयी सुविधा केल्याने नवी पिढीही या जुन्या तीर्थक्षेत्री रमेल.

मुख्य मंदिराच्या अलीकडे असलेल्या मंदिर शिखराचे मूर्तीकाम व रंगकाम पारंपरिक पद्धतीने करण्यासाठी खास मद्रासचे श्री. मरीअप्पा सत्पती व त्यांचे सहकारी यांनी दोन वर्षे सतत काम केले. तसेच मूळ मंदिराच्या शिखराच्या नूतनीकरणाचे कामही ते लवकरच पूर्ण करणार आहोत. जिल्हाधिकाऱ्यांपासून व्यवस्थापकांपर्यंत आणि भक्तांपासून तंत्रज्ञांपर्यंत सर्वचजण तुळजाभवानी परिसर नूतनीकरण व विकास प्रकल्प पूर्ण करण्यासाठी उत्सुक आहेत. आपणही त्याला आपला हातभार लावू या.

दरवर्षी सुमारे २५ लाख यात्रेकरू भवानीच्या दर्शनास येतात. त्यांच्यासाठी तुळजापूरची सर्वांगीण माहिती देणारी (केवळ धार्मिक नव्हे) रंगीत छायाचित्रे व नकाशे असलेली पुस्तिका मराठी, हिंदी, कन्नड व इंग्रजी या भाषांमधून मंदिराच्या ट्रस्टने प्रकाशित करावी व अल्प किंमतीत विकावी, अशी सूचना करावीशी वाटते.

### पर्यटनदैवत - नळदुर्ग

केवळ तीर्थक्षेत्राचे दर्शन घेऊन आता भागणार नाही. नव्या पिढीला आणि तरुण मनाला आकर्षित करणारे एक दुर्लक्षित ठिकाण याच परिसरात आहे. तुळजापूरला जाणाऱ्या प्रत्येकाने जाताना किंवा परतताना तुळजापूरच्या आग्नेयेकडे असलेला नळदुर्ग किल्ला पाहायलाच हवा. सोलापूरपासूनही हा किल्ला ५० कि.मी च्या आत आहे. सह्याद्रीतील डोंगरी किल्ल्यांच्या तुलनेने बालाघाट डोंगररांगातील विस्तीर्ण पठारावर पसरलेला हा किल्ला दुरूनही बुलंद दिसतो. सुमारे ३५ चौरस कि.मी. चे क्षेत्रफळ आरि ६७० मी. उंचीवरील ६०० वर्षांपूर्वीचा १४ व्या शतकातील बोरी नदीच्या काठावरील सुरेख तटबंदीचा किल्ला म्हणजे 'पर्यटकांचे कुलदैवत' व्हायला हवा. चालुक्य, बहामनी, आदिलशाही राज्यकर्त्यांनी हा किल्ला इतिहासात गाजवला. खास धरण बांधून बोरी नदीत आपले प्रतिबिंब आणि शिल्पसौंदर्य न्याहाळणारा हा किल्ला आणि किल्ल्यात बांधलेला पाणीमहाल हे मोठे आकर्षण आहे. ऐन उन्हाळ्यात पाणीमहालातील थंडावा, पाण्याचे सान्निध्य आणि ओलावा अनुभवणारे राजे - महाराजे, कल्पक वास्तुतज्ञ यांचा आजही हेवा वाटतो. पुरातत्त्व खात्याने व तेथील श्री. शंकर इंगळे आणि अन्य कर्मचाऱ्यांनी किल्ल्याच्या परिसराची स्वच्छता अपवादात्मकरीत्या चांगली ठेवली आहे. संपूर्ण किल्ला हिंडून पाहताना जुने महाल, दारूखाना, मंदिरे, मशीद यांची माहिती तर मिळतेच, परंतु फत्तेबुरुज आणि परांडा बुरुज तिथे झालेले 'सर्जा' या मराठी चित्रपटाचे शुटिंग आणि ८० फूट उंचीवरून श्री. शंकर इंगळे यांनी

स्त्रीवेषात बोरी नदीच्या डोहात घेतलेली उडी यांचा रोमहर्षक वृत्तांत ऐकावा आणि या स्वधर्माच्या कामासाठी चित्रपटाच्या त्या शुटिंगचे मिळणारे हजार रुपये नाकारणारा रक्षक नळदुर्गच्या किल्ल्यातच भेटला आणि धन्य वाटले! सैन्यातून निवृत्त झाल्यावर पोटार्थी नोकरी स्वाभिमानाने करणारा आणि पर्यटकांच्या पुढे किल्ल्याचा इतिहास जागवणारा असा मार्गदर्शक प्रत्येक किल्ल्यास मिळावा, असे त्या भेटीनंतर वाटले.

ऐन पावसाळ्यात पाणी महालाच्या सौंदर्यात तर वाढच होते. पावसाळ्यात या किल्ल्यातील पाणी महालावरून दोन्ही बाजूंनी पडते, तेव्हा पाण्याचे प्रवाही धबधबे महालाच्या खिडकीतून पाहताना मिळणारा जलानंद शब्दातीत आहे. आरोग्यदायी हवामान असलेल्या या परिसरात नवे पर्यटन केंद्र झाल्यास ते आकर्षण ठरेल व त्याच त्या ठिकाणी होणारी गर्दीही टळेल. या किल्ल्याची छोटी माहिती - पुस्तिका रंगीत चित्रांसह व नकाशांसह प्रसिद्ध झाल्यास पूर्वतयारी होऊन कुलदेवतेच्या दर्शनाबरोबरच पर्यटनदेवतेचेही दर्शन घडेल.

याच परिसरातील नळदुर्गपासून ४० कि.मी. अंतरावरील अक्कलकोट (स्वामी - मंदिर, वस्तुसंग्रहालय व शस्त्रागार) आणि अक्कलकोटपासून ११० कि.मी. असलेले कर्नाटकातील गाणगापूर (दत्तस्थान, अमरजा संगम व भस्माचा डोंगर) या ठिकाणांच्या भेटीचा लाभही घेता येईल. मात्र सोलापूर, तुळजापूर, अक्कलकोट, गाणगापूर या ठिकाणी जाणाऱ्यांनी नळदुर्गचा किल्ला पाहीलाच हवा आणि या दुर्लक्षित स्थळांचा परिचय करून देण्यासाठी श्री. शंकर इंगळे यांच्यासारखा स्थानिक मार्गदर्शक लाभायला हवा.

मराठवाड्यात पर्यटन विकासाला भरपूर संधी आहे. अजूनही हा भाग दुर्लक्षित आहे. जुनी पर्यटनयोग्य स्थळे नव्याने प्रकाशात आणायला हवीत. नळदुर्गवर सापडलेला दुर्मिळ ऐतिहासिक वस्तूंचा ठेवा प्रदर्शनाकरिता औरंगाबाद किंवा पुण्याच्या पुरातत्त्व कार्यालयात न ठेवता मूळ जागेवरच असणे व राखणे उचित आणि दर्शनीय नाही का? याकडे पुरातत्त्व विभागाने व एम.टी.डी.सी. ने त्वरित लक्ष द्यावे.

## ३.१० चिखलदरा - विदर्भाचे नंदनवन

लोणावळा - खंडाळा, महाबळेश्वर, पाचगणी आणि माथेरान या प्रसिद्ध थंड हवेच्या ठिकाणांची भेट शाळा - कॉलेजच्या सहलींच्या, मित्रमंडळी आणि कौटुंबिक ट्रिपच्या निमित्ताने होते. ही थंड हवेची ठिकाणे आता कशी बदलत चालली आहेत, तेथील झाडी कशी कमी होत आहे, थंडावाही कसा कमी होत आहे आणि ही निसर्गरम्य ठिकाणे कशी शहरी आणि व्यापारी होत आहेत याची तोंडी आणि लेखी चर्चाही होते. पश्चिम महाराष्ट्रातील उत्तर - दक्षिण पसरलेल्या सह्याद्रीच्या उघड्या - बोडक्या माथ्यावरची ही दिलासा देणारी हिरवी स्थळे. त्यांचे सौंदर्य ही स्थळे गमावत आहेत. या पार्श्वभूमीवर

आपल्या डोळ्यांना पश्चिम महाराष्ट्रातील उघडे - बोडके डोंगर, दगडधोंड्याची पठारे आणि अशक्त, सुकलेल्या नद्यांचे प्रवाह हे पाहायची सवयच झाली आहे. मराठवाड्यातील भागही बराचसा शुष्क आणि रूक्ष. तुलनेने पूर्व महाराष्ट्र - विदर्भ हिरव्या राईने व्यापलेला आणि संपन्न दिसतो. महाराष्ट्राच्या उत्तरसीमेवरील पूर्व पश्चिम पसरलेल्या सातपुडा पर्वतरांगांच्या पायथ्याशी असलेला हा प्रदेश प्राचीन महाराष्ट्राच्या निसर्गसंपन्नतेचा अर्वाचीन नमुना काहीसा कायम ठेवून आहे. मात्र प्रत्यक्ष पाहिल्याशिवाय आणि अनुभवल्याशिवाय ऐकीव व वाचीव माहिती डोळ्यांसमोर उभी राहणे शक्य होत नाही. महाराष्ट्राच्या नावाशी सह्याद्रीचे नाते जितके परिचित आणि समीकरण झाल्यासारखे वाटते, तितके महाराष्ट्राच्या उत्तरसीमेवरील सातपुड्याचे झालेले दिसत नाही. अर्थात त्याचे भौगोलिक स्थानही महाराष्ट्र आणि मध्यप्रदेशच्या सीमेवर असल्याने तो सह्याद्रीप्रमाणे फक्त महाराष्ट्राचा म्हणून ओळखला जात नाही. पूर्वीच्या मध्यप्रदेशातील आणि अलीकडे महाराष्ट्रात सहभागी झालेल्या या विदर्भाशी उर्वरित महाराष्ट्राने तेथील निसर्गसौंदर्याशीही जवळीक राखायला हवी. हिवाळी अधिवेशनाच्या निमित्ताने नागपूरचे नाव आपल्याकडे त्यावेळी वारंवार वाचायला मिळते. परंतु वऱ्हाडी माणसं, विदर्भातील निसर्ग, तिथल्या संत्री व कापसाप्रमाणे फक्त आयात करून अनुभवता येणार नाही. आंबट - गोड संत्र्यांचे उन्हाळी महत्त्व आणि 'अधर - शृंगार', 'मुखशृंगार' यांसारख्या पानांच्या दुकानांच्या रसिक नावांप्रमाणेच रंगतदार पानाने केलेले स्वागत अनुभवायला हवे. संत्र्याचीही बर्फी असते आणि कापसाचे डोंगर उभे राहतात ते याच विदर्भात. किल्ले, नापूरकर - भोसले मराठेशाहीशी जवळीक राखतात. तर शेगावचे श्री गजानन महाराज आणि संत गाडगेबाबा, संत तुकोडजी महाराज यांचे शिष्य आणि पूजक पुण्यामुंबईकडेही बरेच आहेत. नागपूरहून ३०/४० कि.मी. असलेले रामटेक आणि कालिदासस्मारक - मेघदूताचे जन्मस्थान - आपल्या मनातील कवीमन जागे करते. हमखास भेटणाऱ्या काळ्या तोंडांच्या लांबलचक शेपटीच्या बलदंड वानराच्या भेटीतून.

मला मात्र आकर्षण होते चिखलदऱ्याच्या चिरतरुण सौंदर्याचे! नागपूरपासून पश्चिमेस सुमारे १५० कि.मी. वर अमरावतीला येऊन उत्तरेला गेल्यावर सातपुडा पर्वताच्या कुशीत चिखलदरा लपलेले दिसते. अमरावती ते अचलपूर हे सुमारे ५० कि.मी. अंतर आणि पुढे ३५/४० कि.मी. चा वळणावळणांचा डोंगरातील हिरव्या झाडीतील रस्ता सुरवातीपासूनच निसर्गाशी जवळीक घडवून देतो. बहुतांशी डोंगर वनाच्छादित असल्याने रस्त्याच्या कडेला लावलेली आणि राखलेली इतर झाडे असल्याने नेत्रसुखाबरोबरच त्या हिरव्या गारव्याने मन उल्हसित करतो. विशेष म्हणजे शहरी गोंगाट, बाजारीपणा, गडबडगोंधळ यापासून दूर राहिलेले हे ठिकाण विदर्भाचेच नव्हे, तर महाराष्ट्राचे नंदनवन म्हणायला हवे. मेळघाट व्याघ्र प्रकल्पही याच परिसरात आहे. प्रत्यक्ष वन्यप्राणी पाहण्यासाठी ढाकणा आणि कोळकाज

या ठिकाणी सोयी केलेल्या आहेत. चिखलदऱ्याचे वन्यप्राणी वस्तुसंग्रहालयही आकर्षकरीत्या मांडलेले आहे. रुबाबदार वाघ, चपळ बिबळे, गवा, अजगर, जंगली कुत्रे आणि तरस असे प्राणी, पक्षी आणि आदिवासींची हत्यारेही इथे मांडण्यात आली आहेत. भारत-रशिया महोत्सवासाठी याच संग्रहालयातील प्राण्यांची खास निवड केली आहे; आणि त्यातील काही परतबोलीने रशियाच्या दौऱ्यावर पाठवली आहेत. या परिसरात आवळ्याचीही झाडे बरीच आहेत. कोरकू आदिवासी जमातीच्या काही मुली निरागस चेहऱ्याने संग्रहालयाच्या जवळच बसलेल्या दिसल्या. मुद्दाम जवळ जाऊन चौकशी केली. शहरी किंवा साहेबी माणसांचे अनुभव त्यांना कसे होते कोण जाणे! जवळची एक पिशवी मांडीखाली लपवून बसलेल्या एका मुलीस मी बोलके केले. हिरवेगार, रसरशीत, चमकदार, टपोरे आवळे त्यात तिने जमवले होते. तो रानमेवा रानातूनच त्या रानकन्येच्या हातातून मला मिळाला. ४/५ किलो आवळे अवघ्या ४/५ रुपयात. मोठ्या आनंदाने मी तिच्याकडून घेतले आणि ती आबंटगोड चव जिभेला आणि मनाला लाखमोलाचे समाधान देऊन गेली. विचार आला की दाखवण्यासारखे, विकण्यासारखे फारसे काही नसताना आम्ही शहरी माणसे कितीतरी गोष्टींचे प्रदर्शन करतो; आणि याउलट त्या निरागस रानकन्येचा तो रानमेवा इतका मोलाचा असूनही अल्पमोलाने देतानाही तिला अवघडल्यासारखे वाटत होते. निसर्गाने मुक्तपणे दिलेले हे धन विकायचे कसे, हा संभ्रम तर तिच्या प्रामाणिक मनास पडला नसेल?

चिखलदऱ्याच्या परिसरात वनविभागाने कॉफीची लागवड मोठ्या प्रमाणात केली आहे. वनविभागाने एक आकर्षक वनोद्यानही चांगल्या प्रकारे राखले आहे. मुलांसाठी खेळ आणि फराळासाठी नव्याने 'बांबूचे घर' तयार झाले आहे. आवळ्याचे औषधी उपयोग आणि आयुर्वेदातील मोरावळ्याचे महत्त्व आणि खास चव जुन्या माणसांप्रमाणे तरुण माणसांनाही माहीत असायला हवी. गुळाच्या किंवा साखरेच्या पाकातील मोरावळा, त्याला तिकडे 'आवळकंठी' म्हणतात. वनविभागाने आठवण म्हणून प्रवाशांना १६ रुपये किलोप्रमाणे घरी नेण्यासाठी विक्रीस ठेवला आहे. चिखलदऱ्याच्या १०/२० कि.मी. छोट्या परिसरात 'पंचबोल पॉईंट' म्हणजे आवाजाचे पाच प्रतिध्वनी निर्माण करणारे ठिकाण आहे. त्याशिवाय हरिकेन पॉईंट, भीमकुंड व देवीकुंड हेही आहेत. गाविलगडचा किल्लाही चालण्याच्या टप्प्यात आहे. मुक्कामाच्या विचाराने गेल्यास विश्रामगृह व पर्यटकनिवास उपलब्ध होतात. दिवसातून ४/५ एस.टी. बसेस अमरावतीहून येतात आणि २ गाड्या रात्री मुक्कामास असतात. चिखलदऱ्याची पाहण्याची ठिकाणे कच्च्या रस्त्याने जोडलेली असली तरी चालण्याच्या टप्प्यातील आहेत, आणि हे संरक्षित अरण्य असल्याने झाडतोडीस व शिकारीस बंदी आहे.

चिखलदऱ्यास येताना आणि जाताना अचलपूरहून जावे लागते. अचलपूर - परतवाडा येथे शासनाचा बराच मोठा लाकडाचा डेपो आहे; तोही पाहण्यासारखा आहे. संरक्षित अरण्य व तपासणी असल्याने लाकडाच्या मोळ्या विकणारे दिसले नाहीत, त्यामुळे बरे वाटले. मात्र गाईगुरांचे तांडे रस्त्यावर आणि आजूबाजूस मोठ्या प्रमाणात दिसत होते. चारापाण्याच्या सुबत्तेमुळे पशुधनाची विपुलता आढळते. पूर्वीची ही गवळी राजांची भूमी असल्याची साक्ष पटते. दूध आणि दुधाच्या विपुलतेने दूधदुभते भरपूर असल्याने दुधाचे पदार्थ अचलपूरला स्वस्त वाटले. रबडी २४ रुपये किलो तर खास कलाकंद १८ रुपये किलो होता.

अचलपूरच्या उत्तरेस महाराष्ट्राच्या सीमेवर मध्यप्रदेशातील बैतूल जिल्ह्यात सुमारे १५ कि.मी. वर बहिरम या छोट्या गावाजवळ सातपुड्याने वेढलेल्या दरीत दिगंबर जैन पंथीयांचे 'मुक्तागिरी' हे देवस्थान आहे. या आडवळणाच्या आणि अवघड जागी अगदी डोंगरांच्या कुशीत, धबधब्याच्या आणि मधमाशांच्या सान्निध्यात, डोंगरकपारीत आणि झाडांच्या सावलीत ही मंदिरे जवळ जाईपर्यंत दिसतच नाहीत. सुमारे ५०० पायऱ्या चढून गेल्यावर ओळीने पण चढउतारावर व वेगवेगळ्या टप्प्यांवर १ ते ५२ आकडे दिलेली ही छोटी छोटी मंदिरे मात्र सहजरीत्या पुण्य लाभू देत नाहीत. चढउताराने शहरी माणूस थकतो. पावसाळा असेल तर झऱ्यांचे व धबधब्यांचे पाणी सोबतीला असते. नाहीतर हिरवा एकांत असतोच. काळ्या व पांढऱ्या पाषाणातील महावीरांच्या कोरीव - रेखीव मूर्ती, स्वच्छता आणि निसर्ग यामुळे कोणत्याही धर्मीयांस समान निसर्गसुख व मन:शांती मिळते. ५२ मंदिरांची दर्शन - प्रदक्षिणा पूर्ण केल्यावर जवळच धर्मशाळा आहेत आणि विहिरीचे थंड पाणीही; त्यामुळे एवढ्या डोंगर - चढउतारानंतरही थकवा जाणवत नाही. या ५२ मंदिरांच्या दर्शन - प्रदक्षिणेनंतर भाविकाला लाभ होतो आणि चांगल्या प्रकारचे स्थानांतर घडते; अशी भाविक श्रद्धा आहे, असे एका स्थानिक जाणकाराने सांगितले. याचा उल्लेख ब्रिटिश गॅझेटियरमध्येही आहे. स्थानांतर घडो अगर न घडो, मात्र माणसातील आणि निसर्गातील अंतर मुक्तागिरी आणि चिखलदऱ्याच्या भेटीने नक्कीच कमी होते. यासाठी तिथे प्रत्यक्ष जायलाच हवं!

रेल्वेने जायचे झाल्यास महाराष्ट्र एक्सप्रेसने बडनेरा रेल्वेस्टेशनला उतरून जावे लागते. बडनेरा - अमरावती अंतर १० कि.मी. आहे. पुणे - अमरावती जाणारी महाराष्ट्र एक्सप्रेस दौंड, नगर, मनमाड, भुसावळ, अकोलामार्गे काहीशा कंटाळवाण्या प्रवासाची आहे. मात्र पुणे, नगर, औरंगाबाद, जालना, शेगावमार्गे गजानन महाराजांचे दर्शन घेऊन बुलढाणा जिल्ह्यातून अकोटमार्गे अचलपूरला मोटारने जाता येते. हे अंतर सुमारे ६०० कि.मी. आहे. गजानन महाराजांच्या शेगावपासून चिखलदरा १२५ कि.मी. च्या जवळपास आहे.

**पुण्यापासून अंदाजे अंतर**

| | |
|---|---|
| चिखलदरा | ५६० कि.मी. |
| नागपूर | ७५० कि.मी. |
| अमरावती | ६५० कि.मी. |
| शेगाव | ४३० कि.मी. |

सातपुड्यातील उंच शिखर वैराट ३८६६ फूट (११७७ मीटर).

चिखलदरा उंची ३६६४ फूट (१११७ मीटर)

---

## ३.११ राष्ट्रीय उद्याने, अभयारण्ये, वनोद्याने

### अ) महाराष्ट्र राज्यातील राष्ट्रीय उद्याने. (एकूण पाच)

१) पेंच (नागपूर) क्षेत्रफळ २५७ चौ.कि.मी.
नागपूरपासून ८६ कि.मी.

२) नवेगाव (भंडारा) क्षेत्रफळ १३४ चौ.कि.मी.
नागपूरपासून १४० कि.मी.

३) ताडोबा (चंद्रपूर) क्षेत्रफळ ११७ चौ.कि.मी.
नागपूरपासून १६५ कि.मी.

४) संजय गांधी (मुंबई) बोरिवली क्षेत्रफळ ८७ चौ.कि.मी.

५) गुगामल (मेळघाट-चिखलदरा) अमरावती

### ब) महाराष्ट्र राज्यातील अभयारण्ये (एकूण बावीस)

| अभयारण्य | जिल्हा |
|---|---|
| १) वाघ संरक्षक अभयारण्य (ढाकणा कोळकाज, मेळघाट व्याघ्र प्रकल्प) | - अमरावती जिल्हा |
| २) यावल | - जळगाव |
| ३) राधानगरी (गव्यासाठी) | - कोल्हापूर |
| ४) कर्नाळा (पक्षांसाठी) | - रायगड |
| ५) तावसा | - ठाणे |
| ६) नागझिरा | - भंडारा |
| ७) बोर | - वर्धा |
| ८) किनवट | - यवतमाळ |

| | |
|---|---|
| ९) देऊळगाव रेहेकुरी (काळवीट) | - अहमदनगर |
| १०) माळढोक पक्षांसाठी | - अहमदनगर, सोलापूर |
| ११) कोयना | - सातारा |
| १२) सागरेश्वर | - सांगली |
| १३) भीमाशंकर | - पुणे, ठाणे |
| १४) चांदोली | - सांगली, कोल्हापूर |
| १५) फणसाड | - रायगड |
| १६) नांदूर, मधमेश्वर | - नाशिक |
| १७) अंधेरी | - चंद्रपूर |
| १८) कळसूबाई, हरिश्चंद्रगड | - अहमदनगर |
| १९) चापराला | - गडचिरोली |
| २०) गौताळा, औट्रमघाट | - औरंगाबाद, जळगाव |
| २१) पैनगंगा | - यवतमाळ, नांदेड |
| २२) अनेरधरण | - धुळे |

### क) राखीव मृगया क्षेत्र (एकूण तीन)

| | |
|---|---|
| १) टिपेश्वर | - यवतमाळ |
| २) मायणी | - सातारा |
| ३) मालखेड | - अमरावती |

### ड) महाराष्ट्र राज्यातील वनोद्याने (एकूण बत्तीस)

वनविभागाने राज्यात एकूण ३२ ठिकाणी लहानमोठी उद्याने तयार करून त्यांची नियमित देखभाल केली आहे. ती सहलीची ठिकाणे (फॉरेस्ट पार्कस्) म्हणून प्रसिद्ध आहेत.

| वनोद्याने | जिल्हा |
|---|---|
| १) अजिंठा | औरंगाबाद |
| २) जायकवाडी (पैठण) | औरंगाबाद |
| ३) हिमायतबाग | औरंगाबाद |
| ४) पं.नेहरू उद्यान, शांतीघाट बहादरपुरा | नांदेड |
| ५) सेमिनरी हिल | नागपूर |
| ६) पाल | जळगाव |
| ७) तोरणमाळ | धुळे |

| | |
|---|---|
| ८) बनेश्वर | पुणे |
| ९) सिंहगड | पुणे |
| १०) पाचगाव पर्वती | पुणे |
| ११) भांबुर्डा | पुणे |
| १२) मुळामुठा | पुणे |
| १३) चिखलदरा | अमरावती |
| १४) राणीबाग | बुलढाणा |
| १५) तबकबाग | कोल्हापूर |
| १६) प्रतापसिंह | सातारा |
| १७) प्रतापगड | सातारा |
| १८) आंबोली | सिंधुदुर्ग |
| १९) घारापुरी (एलिफंटा) | रायगड |
| २०) माथेरान | रायगड |
| २१) वज्रेश्वरी | ठाणे |
| २२) अर्नाळा | ठाणे |
| २३) शिवनेरी | पुणे |
| २४) बुलढाणा | बुलढाणा |
| २५) लोणार सरोवर | बुलढाणा |
| २६) नरेंद्र डोंगर | सिंधुदुर्ग |
| २७) आळते, हातकणंगले | कोल्हापूर |
| २८) दंडोबा डोंगर | सांगली |
| २९) गंगापूर | नाशिक |
| ३०) सप्तश्रृंगी | नाशिक |
| ३१) पाटणादेवी | जळगाव |
| ३२) येलदरी | परभणी |

## ३.१२ संभाजी महाराज ते मस्तानी

पुण्यापासून सुटीच्या दिवशी किंवा मुद्दाम सुटी घेऊन एखाद्या दुर्लक्षित आणि अपरिचित ठिकाणी जाऊन मिळणारा अनुभवानंद घ्यावा, वाटावा आणि जमल्यास लिहावा. यावेळी पुण्याहून निवांतपणे सकाळी ९/१० वाजता इतिहासप्रेमी साहित्यिक श्री. म.श्री. दीक्षितांच्या संगतीने पुणे - नगर रस्त्याने छत्रपती संभाजी महाराजांच्या समाधी दर्शनार्थ निघालो. गेल्याच वर्षी १९८९ मध्ये संभाजीराजांचा ३०० स्मृतिदिन साजरा करण्यासाठी प्रेरणास्थान ठरले

होते. पुण्याहून वाघोलीपर्यंतचे पुण्याचे औद्योगिक क्षेत्र ओलांडून बिनखड्ड्यांच्या पुणे-नगर रस्त्याने ३० कि.मी. वर कोरेगाव आहे. तेथून वढू या गावी जाण्यासाठी आत वळावे लागते. त्या रस्त्याच्या फाट्यावर संभाजी महाराज समाधीस्थानाकडे असा मार्गदर्शक फलक आहे. वढू गावातच मोठ्या बांधीव परिसरात संभाजी महाराजांचा रुबाबदार पुतळा आणि त्यापुढील दगडी मेघडंबरीतील ऐतिहासिक समाधी मराठी मनाला पुलकित करते.

औरंगजेबाच्या तुळापूर येथील छावणीतून फर्मान निघाल्यावर महाराजांचा वध वढूच्या परिसरात घडल्याचे सांगतात. स्वराज्यासाठी आणि स्वधर्मासाठी हा त्याग अलौकिक होता. या समाधीस्थानासमोरच कवी कलष किंवा कलुषा कब्जीचा चौथरा समाधी आणि एक वृंदावन आहे. छत्रपती शाहू महाराजांनी सुमारे १७१५ मध्ये या मूळ संभाजी महाराजांच्या समाधीचे बांधकाम केले. १९७७ मध्ये यशवंतराव चव्हाणांच्या हस्ते पुतळा उभारला गेला पण शाळांनी आणि महाविद्यालयांनी या परिसराला सहलीच्यावेळी मुद्दाम भेट देऊन प्रेरणा घ्यायला हव्यात. सामान्य पर्यटकांनीही वाट वाकडी करून येथे नतमस्तक व्हायला हवे. या ठिकाणी शाहीर एकनाथ पाटील भेटले. हे विदर्भातील अभ्यासू कवी यांनी समाधीस्थानाच्या प्रेरणेतून लिहिलेले वीरकाव्य पहायला मिळाले. या वीरकाव्याला मुलानागरिकांपर्यंत जाऊन पोहचण्यासाठी आकाशवाणी व दूरदर्शनचे माध्यम उपलब्ध व्हायला हवे. विदर्भातील या शाहिराने 'रायगडचा रुद्र' हे वीरकाव्य आपले जीवितकार्य केले आहे. स्थानिक मंडळी व प्रतिष्ठानचे कार्यकर्ते त्यांच्या पाठीशी आहेत. शाहीर लिहितात -

सोळाशे एकोणनव्वद साली मार्च अकराला।
फाल्गुन वद्याची आवस आली चढतीला॥ जी ॥
तोडले हात्पाय आणि राजशीर आज।
संपला रुद्र रायगडचा संपले काज॥ जी ॥
झाली भूमी पावन अशी वढू गावाची।
राज आहुती पडली येथेच महाराष्ट्राची॥ जी॥

वढूपासून उत्तरेला छोटा पक्का रस्ता सुमारे ३० कि.मी. वरील पिवळ्या तिळाच्या फुलांच्या आणि ज्वारीबाजरीच्या शेतातून थेट पाबळला जातो. पावसाळ्यात रस्त्यावर काही वेळा पाणी येते; परंतु महाप्रतापी बाजीरावाच्या मस्तानीचे चिरनिद्रेचे स्थान पाहण्याची ओढ होती. आपल्या प्रेमदेवतेला बाजीरावाने दिलेले हे पाबळ गाव, तेथील गावातील मस्तानीची गढी स्थानिक अनास्थेमुळे केव्हाच जमीनदोस्त झाली आहे. आता उरले आहेत गावाबाहेरील वेशीपलीकडे असलेल्या मुस्लीम कबरस्तानातील रूपगर्विता मस्तानीची दुर्लक्षित कबर. दगडी चौथऱ्यावरील जाईचा वेल मस्तानीच्या कबरीवर हिरवी सावली धरून आहे. परंतु गवत व झाडाझुडपात आणि पडक्या मशिदीच्या भिंतीआड ती एकांती

आहे. यासमोरच एक लाकडी कमानदार पेशवेकालीन वास्तुशिल्प रचनेची मशिदीसारखी जागा आहे. आजूबाजूला सिताफळांची अनेक झाडे असून गुलामसाहेब या विश्वस्ताने तारेचे कुंपण घालून तेथे शेती सुरू केली आहे आणि दर्शनासाठी जाणाऱ्या पर्यटकांच्या गैरसोयीत भर घातली आहे असे ऐकले. हिंदू आणि मुसलमान या दोघांनीही हक्काचा प्रश्न न करता हे मराठी साम्राज्याचे 'प्रेमदैवत' आणि परिसर जपायला हवा. पुणे जिल्हा परिषदेपासून पाबळ ग्रामपंचायतीपर्यंत सर्वांना मस्तानी स्मृतिस्थान विकसित करण्याची इच्छा आणि प्रेरणा का होत नाही याचे आश्चर्य वाटते.

स्थानिक रहिवासी सत्यवान पिंगळे आणि ह.भ.प. अरविंद संभूदास यांनीही अधिकार मिळाल्यास मस्तानी परिसर विकास घडवू असे सांगितले. पाबळच्या वेशीबाहेरील मारुती चौकातील नीलकंठेश्वर मंदिर आणि गावातील जैन मंदिर स्वच्छ व प्रशस्त आहे.

पाबळ - राजगुरूनगर रस्त्यावर वायव्येला पाबळपासून सुमारे १०/१५ कि.मी. वर या परिसरातील प्रसिद्ध यमाईदेवीचे स्थान कणेरसर येथे आहे. भारताचे सर न्यायाधीश चंद्रचूड याच गावचे. पेशवेकालीन सरदार चंद्रचूडांची गढी इथे आहे. न्यायाला नेतृत्व देणाऱ्या चंद्रचूडांची प्रेरणा म्हणजेच अन्यायाचे परिमार्जन करणारी यमाईदेवी. मंदिराच्या जीर्णोद्धाराबरोबरच स्वच्छता आणि सोई वाढत आहेत. नवरात्राच्या निमित्त हेही दर्शन मुद्दाम घेतले. मंदिर शिल्पकाम देखणे आहे.

कणेरसरनंतर राजगुरूनगरच्या बाजारातील खास बटाटा घेऊन या क्रांतिकारकाच्या गावातून आम्ही आळंदीमार्गे संध्याकाळी पुण्याला परतलो. अपरिचित स्थानदर्शनाची सांगता ज्ञानीयांच्या राजापुढे माथा टेकून केली.

या एकाच १४० कि.मी.च्या एक दिवसाच्या प्रवासात शौर्यदैवत छत्रपती संभाजी महाराज, प्रेमदैवत मस्तानी, देवीदैवत यमाई आणि संतदैवत ज्ञानेश्वर यांच्या दर्शनांनी प्रवास घडला आणि अपरिचित अनुभवसौंदर्य लाभले. शौर्याची, सौंदर्याची, भक्तीची व ज्ञानाची पूजा बांधण्याचे भाग्य लाभले.

## ३.१३ धुळ्याची त्रिस्थळी

पुण्याहून धुळ्याला जायचा योग बरेच दिवसांनी आला. पुण्याहून नगर - कोपरगावमार्गे किंवा संगमनेर - नाशिकमार्गे जाता येते. औरंगाबादवरून जाणारा मार्ग थोडा लांबचा आहे. हा प्रवास एस.टी. ने मोटारीने सुमारे दहा तासांचा म्हणजे पावणे चारशे कि.मी.चा असल्याने प्रवासाच्या दिवशी दमून आणि थकून गेल्याने विश्रांतीनंतर दुसऱ्या दिवशी धुळे पहावे असे ठरवले. खानदेशातील हा भाग पूर्वी दुधातुपाचा आणि केळीच्या बागांचा. अजूनही मोठ्या प्रमाणात हिरव्या केळ्यांचे घड असलेले ट्रक आणि दूध आणणारी स्वतंत्र

रेल्वे मालगाडी पुण्यामुंबईला रोज येते.

धुळ्यात प्रवेश करताच कमीत कमी वेळेत अशा कोणत्या तीन गोष्टी पहायच्या असे जर मला कोणी विचारले तर धुळे शहराचेच नव्हे, तर खानदेशाचे, महाराष्ट्राचे भूषण असलेले इतिहासाचार्य वि.का. राजवाडे यांचे वस्तूसंग्रहालय! तळमजल्यावरील विष्णु व इतर देवतांच्या अलंकृत व शस्त्रधारी मूर्ती वैशिष्ट्यपूर्ण आहेत. दरवाजामधून आत गेल्यावर डाव्या हाताला असलेली विष्णूची मूर्ती आघातानंतर संगीतनाद निर्माण करणारी आहे. सुमारे सातशे वर्षांपूर्वीची तेराव्या शतकातील या मूर्तीचे नादसौंदर्य व शिल्पसौंदर्य वैशिष्ट्यपूर्ण आहे. याशिवाय प्राचीन ग्रंथ, चित्रे व वस्तू यांच्या दालनातून फिरताना पुण्याच्या शनिवारवाड्याचा नकाशा आणि विविध संगीत रागांवर आधारलेली राजस्थानी रंगीत चित्रे अरसिकातही रसिकत्व निर्माण करतात. मध्यवर्ती दालनात लाकडी कोरीव काम, नक्षीदार गवाक्षे, खांब, दरवाजे, हंड्या, झुंबरे, मेणे आणि पालख्या यांची आकर्षक मांडणी केली आहे. ऐतिहासिक वैभवशाली महाराष्ट्राच्या या खाणाखुणा आजही मराठी माणसाला प्रेरणादायी वाटतात. संग्रहालयातील वास्तू व वस्तूंचे वर्णन करण्यासाठी श्री हाजिरनिस, देव यांच्यासारखे अनुभवी मार्गदर्शक मात्र आपल्याबरोबर हवेत. वस्तुसंग्रहालयाशेजारी संस्थेच्या जुन्या इमारतीत संस्थेचे वाचनालयही आहे. शहराच्या मध्यवस्तीतच हे संग्रहालय सकाळ - संध्याकाळ विनामूल्य उघडे असले तरी भेट देणाऱ्यांची फारशी गर्दी नसते.

धुळ्यातील दुसरे महत्त्वाचे ठिकाण म्हणजे 'समर्थ वाग्देवता मंदिर.' प्रशस्त दगडी इमारतीच्या तळमजल्यावर रेखीव समर्थ मूर्तीचे दर्शन घडते आणि समर्थांच्या हस्ताक्षरातील दुर्मिळ साहित्याचा खजिना दुसऱ्या मजल्यावरील प्रदर्शनात दिसतो. हजारो हस्तलिखिते, संशोधकांना अभ्यासासाठी उपलब्ध आहेत. समर्थांचे शिष्य, त्यांची हस्तलिखिते, समर्थस्थानांचा नकाशा व साहित्य अनेक नामवंतांनी प्रशंसलेले आहे. येथील वातावरणही शांत व पवित्र आहे.

धुळ्यातील तिसरे पाहण्यासारखे ठिकाण म्हणजे पांझरा नदीच्या काठावर अद्ययावत पद्धतीने बांधलेले एकवीरादेवी मंदिर. मूळच्या प्राचीन पडिक मंदिराचा जीर्णोद्धार करून नदीपरिसराचा योग्यप्रकारे उपयोग करून घेऊन स्थानिक मंडळींनी बांधलेले हे नूतन एकवीरामंदिर, तेथील स्वच्छता, प्रकाशयोजना, रंगसंगती, नवे घाट, हत्तींचे प्रवेशद्वार, बागबगीचा यामुळे साधलेला परिसर विकास यामुळे आस्तिकांबरोबर नास्तिकही या स्थानाकडे आकर्षिले जातात.

धुळ्यातील ही त्रिस्थळी यात्रा शहराला भेट देणाऱ्या प्रत्येकाने करावी अशीच आहे. कारण या वास्तुदर्शनातून मिळणारा आनंद आणि समाधान; ज्ञान, अनुभव यात मोलाची भर टाकणारा आहे. धुळ्याच्या शिक्षणशास्त्र महाविद्यालयाच्या संमेलनाच्या निमित्ताने

या भागात जाता आले. परंतु तिथे अनेक वेळा जाणाऱ्यांनीही ही ठिकाणे पाहिलेली नसतात, म्हणून हा ओझरता परिचय. धुळे म्हणजे केवळ धुळीचे साम्राज्य असलेल्या गावाचे नाव किंवा 'धोलिया' यावरून धुळे अशी व्युत्पत्ती एवढाच विचार आणि कामापुरती गावाची भेट असे न करता धुळे गावातल्या गावात घडणारी ही त्रिस्थळी पर्यटन यात्रा - राजवाडे वस्तुसंग्रहालय, समर्थ वाग्देवता मंदिर आणि एकवीरादेवी यांची अवश्य करावी. जास्त वेळ असल्यास जिल्ह्यातीलच नंदुरबार - दक्षिण काशी म्हणून प्रसिद्ध असलेली प्रकाशे येथील मंदिरे, तोरणमाळचे थंड हवेचे ठिकाण. सातपुड्यातील रांगांमधील आदिवासी जीवन हेही पाहता येईल.

मात्र अशा ठिकाणांच्या स्मृती शब्दरूपाने जतन करण्यासाठी छोटी माहिती - पुस्तके, रंगीत छायाचित्रे, छोट्या प्रतिकृती किंवा आठवण भेटींच्या वस्तू उपलब्ध व्हायला हव्यात, असे मात्र नेहमी वाटते.

---

या भेटीच्या एकदोन दिवस आधीच धुळ्यातील आग्रारोडवरील बैराग्याचे राममंदिर या नावाने प्रसिद्ध असलेल्या मंदिरातील अनेक जुन्या मौलिक हस्तलिखित पोथ्या आगीच्या भक्ष्यस्थानी पडल्या. हाच संग्रह राजवाडे संशोधन मंडळासारख्या संस्थेच्या हवाली केला असता तर हा प्राचीन वाङ्मयीन वारसा संशोधकांसाठी फारच मोलाचा ठरला असता. ही खंत त्या मंदिराचे आगीच्या भक्ष्यस्थानी पडलेले स्वरूप पाहिल्यावर सहजच मनात येऊन गेले.

---

## ३.१४ वरंधा घाटातील नेत्रानंद
## पावसाळी सहल वरंधा घाटातली

फक्त उन्हाळ्याच्या सुट्टीतच प्रवासाला जायचे ही सवय आता बदलावयास हवी. ब्रिटिशांच्या प्रभावामुळे उन्हाळ्यातील शाळा, कॉलेजांची सुट्टी कुटुंबियांसह सहलीला जायला सोयीची असली तरी आपल्या देशातील निसर्ग उन्हाळ्यातील सहलीला अनुकूल नसतो हेच खरे. याला अपवाद म्हणजे थंड हवेची ठिकाणे. ज्यांचा शोध आणि वाढ ब्रिटिश राज्यकर्त्यांनी उन्हाळ्याची सुट्टी थंडाव्यात घालविण्यासाठी केली. पण मराठी आणि भारतीय माणसाला उन्हाळ्यातील थंड हवेच्या ठिकाणाचा "चैनी गारवा" परवडण्यासारखा नसतो.

स्थानिक परिस्थितीचा आणि परिसराचा विचार करून आपल्या जाणत्या पूर्वजांनी मात्र महत्त्वाचे सण, यात्रा - जत्रा पावसाळ्यात आणि थंडीतच प्रामुख्याने योजलेल्या

आहेत, हे आपण विसरलो आणि अंधानुकरण करून कडक रणरणत्या उन्हात, घामाची अंघोळ आणि गर्दीतील प्रवास करून उन्हाळ्यातील सहली काढायला लागलो. खरे म्हणजे हे टाळायला हवे. पावसाळ्यातील सहली आपल्याला निसर्गाचे जिवंत आणि तरुण - सौंदर्यदर्शन घडवितात म्हणूनच पुणे - मुंबई रस्त्यावरील बोरघाटातून जाताना पावसाळ्यात डोंगर, कडे, धबधबे आणि हिरवी झाडी पुन्हा पुन्हा पाहावीशी वाटते. पण याहीपेक्षा अपरिचित असे ठिकाण म्हणजे वरंधा घाट. पुण्याप्रासून २-३ तासांच्या अंतरावर सुमारे १०० कि.मीटरच्या आत असलेला हा फारशी रहदारी, वाहनांचा गजबजाट, नसलेला हा अवघड घाट.

शहरी गोंगाट, गर्दी आणि कचरा, धावपळ आणि खडखडाट यापासून दूर नेणारा सह्याद्रीच्या कुशीतील वळणावळणाच्या रस्त्याने भोरमार्गे महाड रायगडकडे नेणारा हा घाट. या शांत निसर्ग स्थळी ऐन पावसाळ्यात जर भोर ओलांडून आपण वळणावळणांनी कड्यांच्या आणि दऱ्यांच्या साथसंगतीने प्रवास करू लागलो की प्रवासातील झोप कधीच मिळत नाही. कारण या घाटरस्त्याची असंख्य वळणे आपल्याला एकदा डोंगरकड्याच्या पायथ्याशी नेतील, तर एकदा खोल दरीच्या टोकावर नेऊन आणतील. हिरडाशी गाव ओलांडून गेल्यावर रस्त्याच्या दोन्ही बाजूला पावसाळ्यात हिरवी भात तरारून आलेली दिसतात. या घाटात वाहनांची फारशी ये- जा नसली तरी पावसाची मात्र सतत ये - जा असत आणि ती आनंददायी आहे. कारण भाताची खाचरे, चिखलणी, लावणी आणि रोपणी, पाऊस आणि डोक्यावरील इरली, तांबडी माती आणि हिरवी शेते, कोकण सौंदर्याची पूर्वसूचना देतात. वरंधा घाट ओलांडून आपण रायगड जिल्ह्यात प्रवेश करतो म्हणजेच सह्याद्रीच्या रांगा ओलांडून कोकणात उतरतो. शिवाजी महाराजांची राजधानी रायगड किल्ला, समर्थ रामदासांची शिवथर घळ, महाड आणि महाडमार्गे चिपळूण, रत्नागिरी या ठिकाणांना जाण्याचा हा एक जवळचा आणि रमणीय मार्ग. पावसाळ्यात तरी खास निवडावा असा

वरंधा घाटाचे पावसाळी सौंदर्य पाहण्यासाठी थेट वरपर्यंत वाघजई मंदिरापाशी जायला हवं या पावसाळ्यात तर मंदिराच्या समोरील दरीत हिरव्यागार झाडीवर पावसाची सततधार चालू असते. आणि समोरच्या कड्यांवरून शिळीम गावचा पेवातला धबधबा, सोलाचा [illegible]बा, माझेरीचा धबधबा अशी अनेक स्थानिक नावे असलेले धबधबे दसरा दिवळीपर्यंत [illegible] मिळतात. वरंधा घाटातील या वाघजाई मंदिरापाशी [illegible] च्या सगळ्या [illegible] आणि [illegible] चौदा एस टी गाड्या थांबतात. मंदिराशेजारच्या [illegible] हॉटेलात [illegible], भजी, वडा, निसर्गाच्या संगतीने प्रवासी घेतात. अशा [illegible] निसर्गाच्या सान्निध्यातील खाण्यापिण्याची मजा आणि लज्जत अनुभवल्याशिवाय [illegible] नाही [illegible] पावसाळ्यात दिवसाकाठी १००-१५० प्रवासी इथे थांबतात, तर उन्हाळ्यात त्यांची [illegible] दुपटी - तिपटीने वाढते असे या वाघजई मंदिरा शेजारचे हॉटेलचे

रमेश पवार आणि बंधू यांनी सांगितले. ही पवार आणि जाधव कुटुंबीय मंडळी उंबर्डे आणि माजेरी खेड्यातील कष्टाळू कोकणी कुटुंबे आहेत. उन्हाळ्यात पिण्याच्या पाण्याची आणि दिवाबत्तीची सोय व्हावी, मग तुमच्यासारख्या येणाऱ्या प्रवाशांची आम्ही चांगली सोय करू शकू असे त्यांनी आवर्जून सांगितले.

वाघजई मंदिरासमोरील एका डोंगराचा गोलसर आकार प्रचंड शिवलिंगासारखा दिसतो. त्याच्याभोवती कोसळणारे, फेसाळणारे धबधबे म्हणजे जणू काही निसर्गाचा रुद्राभिषेकच! याच दरीत खरक नदीला मिळणारा मोठा ओढा उगम पावतो. खरक नदी पुढे काळ नदीला मिळते. घाटातल्या वाघजई मंदिरामागील डोंगरावर अर्ध्या तासात चढून गेल्यास भोर महाड मार्गावरील ऐतिहासिक नऊ टाकी - बारमाही थंडगार पाण्याची आजही आहेत. मंदिराजवळच्या दरीतून लाल तोंडाची अनेक माकडे प्रवाशांकडून खाण्याचे पदार्थ घेण्यासाठी येतात. त्यातील काही तर चक्क मोटारीत किंवा एम.टी त खिडकीतून आत जाऊन बसतात. आमच्याही गाडीत खिडक्या उघड्या असल्याने तीन - चार माकडांचे टोळके घुसले; आता सामानाच्या पिशव्या माकडे पळविणार व आपली फजिती करणार असे वाटले. माकडे पाहताच जुनी टोपीवाला आणि माकडांची गोष्ट आठवली. मात्र प्रवाशांच्या हातातून खाद्यपदार्थ घेण्याइतपत ही माकडे आता माणसाळलेली आहेत. वरंधा घाटाच्या सर्वात उंच भागी असलेल्या व वाघजई मंदिराजवळील वळणावर पुणे जिल्ह्याची हद्द संपते व रायगड जिल्ह्याची हद्द सुरू होते. तिथेच एक उंच सुळका माथ्यावर सपाट भाग असलेला नजरेत भरतो. घाटाच्या वळणांची मजा आणि शोभा पलीकडच्या घाट उतारावर दिसते. पूर्वीतर या अवघड वळणावरून मोटारींना वळताना अरुंद रस्त्यामुळे दोनतीनदा गाडी मागे - पुढे घेऊन (रिव्हर्स) मगच वळण घेता येत असे. आता अवघड घाटरस्ता हळूहळू रुंद करण्यात येत आहे.

वरंधा घाटात पावसाळ्यात दिसणाऱ्या हिरव्या रंगाच्या असंख्य छटा पूर्णपणे कॅमेऱ्यातही पकडता येत नाहीत आणि शब्दातही सापडत नाहीत. चित्रकाराचेही सर्व हिरवे रंग संपवून निसर्गातल्या या हिरव्या रंगछटा शिल्लक उरतातच. प्रत्यक्ष येऊन पाहणाऱ्याला नेत्रानंद आणि निसर्गानंद देण्यासाठी जमेल त्यांनी हा मिळवावा, साठवावा आणि वाटावाही.

## ३ १५ शिखर शिंगणापूर ते औंधची यमाई आणि रंगवैभवी चित्रसंग्रहालय दर्शनीय

छत्रपती शिवाजी महाराजांचे कुलदैवत - शिखर शिंगणापूर पाहण्याची उत्सुकता आणि दर्शनाची ओढ मनी होती. याच शंभूमहादेवाच्या दर्शनाने अवघा महाराष्ट्र वीरश्रीने गाजविणारी शौर्यघोषणा 'हर हर महादेव' उच्चारली की आजही मराठी मनाला स्फुरण चढत. तुळजापूरच्या

भवानीप्रमाणेच सातारा जिल्ह्यातील माण तालुक्यातील शंभू महादेवाच्या डोंगररांगेवरील हे उंच स्थान कोथलपर्वत या नावानेही ओळखतात. पार्वतीने शंकराचा शोध घेताना 'कः स्थलं?' असा प्रश्न विचारून या स्थळाचा शोध घेतला, अशी कथा सांगतात. शंभू महादेवाची ही डोंगररांग म्हणजे सह्याद्री पर्वताचा एक पूर्वेकडे पसरलेला फाटा आहे. सातारा जिल्ह्याच्या पूर्वेकडील, नेमके सांगायचे तर ईशान्येकडील भागात, पुण्याहून फलटण मार्गे पंढरपूरकडे जाणाऱ्या रस्त्याच्या दक्षिणेकडे जाण्यासाठी नातेपुते फाट्याच्या अलीकडे शिंगणापूरला जाण्यासाठी सुमारे ४० कि.मी. जावे लागते. म्हणजे पुण्यापासून शिंगणापूरपर्यंतचे अंतर या मार्गाने १६० कि.मी. होते. परंतु आम्ही या प्रचलित मार्गाने न जाता दुसऱ्या जवळच्या रस्त्याने मिरडगाव - नागुवाडी - कोथलमार्गे जाण्याचे ठरविले. पुण्याहून सातारा रोडने शिरवळपर्यंत जाऊन फलटण फाट्याने वीर धरणाच्या कडेने शिंगणापूर रस्त्याला लागलो. मात्र हा रस्ता छोट्या शहरी वाहनांना स्कूटर आणि छोट्या मोटारींना तापदायकच आहे. कारण या डोंगराळ रस्त्यात अनेक ओढे, नाले, दगड, गोटे पाण्यासह आडवे येतात. आणि तुमचा रस्ता अडवितात. फलटण - शिंगणापूर हा २५/३० कि.मी. चा कच्चा रस्ता वाटेत लागणाऱ्या या दहा - बारा ओढ्यांवर छोटे पूल बांधून सुधारायला रस्ते - बांधकाम खाते एवढा का वेळ घेते आहे कोण जाणे? छत्रपती शिवरायांचा उद्घोष करणारे आपण सर्व त्यांच्या कुलदैवताकडे जाण्याचा रस्ता नीट करू शकत नाही हे योग्य नाही.

मात्र शंभू महादेवाचे हे स्थान सातारा जिल्ह्यात असले तरी सोलापूर जिल्ह्याशी अधिक जवळीक राखते आणि पुणे जिल्ह्याच्या हद्दीपासूनही ते फारसे दूर नाही. मात्र मराठवाड्यातील अनेक भाविक चैत्र महिन्यातील उत्सवाला आवर्जून येतात. त्यात तेली मंडळींची कावड, कोष्टी लोकांचे पागोटे, कोळी लोकांचा अंगारा, माळी समाजाचा दवणा आणि फुले, गडसी वाजंत्रीवाले धनगरांची मानाची पायरी, बडवे ब्राह्मणांची पूजा, लिंगायत स्वामींची उत्तरपूजा अशी सर्व जातीची सेवा साधून बहुजनसमाजाचे हित चिंतणारी ही स्थानपरंपरा सर्व समाजाला श्रद्धेने एकत्र बांधणारी आहे.

डोंगरमाथ्यावरील या ठिकाणाची उंची समुद्रसपाटीपासून सुमारे तीन हजार फूट असून, औरस - चौरस बांधलेल्या सुमारे ३०० दगडी पायऱ्या असून नवा मोटार रस्ता शहरी मंडळींना थेट मुख्य मंदिरापर्यंत पोहचवून पायऱ्या चढण्याचे श्रम वाचवितो. मात्र पायऱ्यांचा रस्ता व मोटार रस्ता दर्शविणारी पाटी पायथ्याशी नसल्याने नवा प्रवासी चुकतो. राजमाता जिजाबाई साहेबांनी बांधलेली कमानही वाटेत आहे. डोंगर - माथ्यावरील हे मंदिर १२ व्या शतकातील अप्रतिम व अजोड नमुना आहे. पूर्वाभिमुखी मंदिरात सूर्योदयाच्या वेळी सूर्यकिरण प्रथम प्रवेश करून प्रकाशपुष्प शंभू महादेवाला अर्पितात - दक्षिणायन अगर उत्तरायण या दोन्हीही काळात! मुख्य मंदिराचा आकार बेलाच्या पानासारखा असून मुख्य

पानाचे जागी चौकोनी आकाराचे स्वयंभू शिवलिंग असून याचे वैशिष्ट्य म्हणजे समोरासमोर असलेल्या दोन शाळुंका म्हणजे शंकर - विष्णू, पार्वती - लक्ष्मी यांची प्रतीके आहेत असे मानतात. म्हणूनच हरि - हर असे संबोधितात. यावरूनच 'हर हर महादेव' ही रणगर्जना शिवशक्तीची प्रेरणा घेऊन शिवप्रभूंनी महाराष्ट्रात गर्जविली. मध्यभागी रंगशिळा असून पितळेच्या पत्र्यांनी मढविलेले चार मोठे नंदी आहेत. सभामंडपात एकाच जागी फिरणारे वैशिष्ट्यपूर्ण फिरते दगडी खांब आहेत.

छत्रपती शाहू महाराजांनी इ.स. १७२६ ते ३१ या मंदिराचा जीर्णोद्धार केल्याचा ऐतिहासिक उल्लेख असा -

"त्यासी पाच लाख रुपये खर्च लाविला।
शंभू पाच लाख झाकिला॥"

उल्लेख असल्याचे मुख्याध्यापक श्री. अरविंद उद्धवराव बडवे यांनी सांगितले. अगदी अलीकडे १९७५ च्या सुमारास दक्षिण भारतीय शिल्प पद्धतीने जीर्णोद्धार समितीने शिखराचा आकर्षक कायापालट घडविल्याचे एस.के. कुलकर्णी यांनी सांगितले. गावात पाण्याच्या व इतर आवश्यक सोयी केल्या गेल्या. आता नुकतेच या वर्षी एक शासकीय विश्रामगृह बांधले आहे. याशिवाय पुजारी मंडळींच्या घरीही पूजा - अभिषेक, नैवेद्य, भोजन, निवास व्यवस्था होते.

या डोंगरामाथ्याचा वरचा पठारासारखा सपाट भाग डम्बेल्सच्या आकाराचा असून एका भागात मंदिर व दुसऱ्या टोकावर छत्रपती शिवाजी, संभाजी व शहाजी महाराजांची स्मृतिस्थाने व न्यायसदर या वास्तू आहेत. मंदिराकडून या समाधी - स्थानांच्या दिशेने साद घातली असता प्रतिसाद मिळतो. या ठिकाणी येणारा आवाजाचा प्रतिध्वनी अत्यंत स्पष्ट आणि जसाच्या तसा ऐकू येतो हे विशेष! कारण काही थंड हवेच्या ठिकाणी उगीचच प्रसिद्धी पावलेले 'एको पॉईंटस्' तितकेसे सुस्पष्ट प्रतिध्वनी निर्माण करणारे नसतात असा अनुभव आहे. मात्र या शिखर शिंगणापूरच्या प्रतिध्वनी स्थानाची फारशी प्रसिद्धी नसली तरी प्रचीती दर्जेदार आहे. शिवछत्रपतींच्या राष्ट्रीय भावनेला असाच सुस्पष्ट प्रतिसाद महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून आजही यावा अशी या कुलदैवताची मूक प्रेरणा तर नसेल?

---

कै. यशवंतराव चव्हाण यांच्या प्रेरणेने या स्थानाचे माहात्म्य सर्वदूर पसरले; तसेच गोव्याचे माजी मुख्यमंत्री कै. दयानंद बांदोडकर यांची श्रद्धा या स्थानी होती.

---

शेतातला देवाचा दवणा काळजीपूर्वक पवित्र आचाराने जोपासावा लागतो. आंघोळ

भवानीप्रमाणेच सातारा जिल्ह्यातील माण तालुक्यातील शंभू महादेवाच्या डोंगररांगेवरील हे उंच स्थान कोथलपर्वत या नावानेही ओळखतात. पार्वतीने शंकराचा शोध घेताना 'क: स्थलं?' असा प्रश्न विचारून या स्थळाचा शोध घेतला, अशी कथा सांगतात. शंभू महादेवाची ही डोंगररांग म्हणजे सह्याद्री पर्वताचा एक पूर्वेकडे पसरलेला फाटा आहे. सातारा जिल्ह्याच्या पूर्वेकडील, नेमके सांगायचे तर ईशान्येकडील भागात, पुण्याहून फलटण मार्गे पंढरपूरकडे जाणाऱ्या रस्त्याच्या दक्षिणेकडे जाण्यासाठी नातेपुते फाट्याच्या अलीकडे शिंगणापूरला जाण्यासाठी सुमारे ४० कि.मी. जावे लागते. म्हणजे पुण्यापासून शिंगणापूरपर्यंतचे अंतर या मार्गाने १६० कि.मी. होते. परंतु आम्ही या प्रचलित मार्गाने न जाता दुसऱ्या जवळच्या रस्त्याने मिरडगाव - नागुवाडी - कोथलमार्गे जाण्याचे ठरविले. पुण्याहून सातारा रोडने शिरवळपर्यंत जाऊन फलटण फाट्याने वीर धरणाच्या कडेने शिंगणापूर रस्त्याला लागलो. मात्र हा रस्ता छोट्या शहरी वाहनांना स्कूटर आणि छोट्या मोटारींना तापदायकच आहे. कारण या डोंगराळ रस्त्यात अनेक ओढे, नाले, दगड, गोटे पाण्यासह आडवे येतात. आणि तुमचा रस्ता अडवितात. फलटण - शिंगणापूर हा २५/३० कि.मी. चा कच्चा रस्ता वाटेत लागणाऱ्या या दहा - बारा ओढ्यांवर छोटे पूल बांधून सुधारायला रस्ते - बांधकाम खाते एवढा का वेळ घेते आहे कोण जाणे? छत्रपती शिवरायांचा उद्घोष करणारे आपण सर्व त्यांच्या कुलदैवताकडे जाण्याचा रस्ता नीट करू शकत नाही हे योग्य नाही.

मात्र शंभू महादेवाचे हे स्थान सातारा जिल्ह्यात असले तरी सोलापूर जिल्ह्याशी अधिक जवळीक राखते आणि पुणे जिल्ह्याच्या हद्दीपासूनही ते फारसे दूर नाही. मात्र मराठवाड्यातील अनेक भाविक चैत्र महिन्यातील उत्सवाला आवर्जून येतात. त्यात तेली मंडळींची कावड, कोष्टी लोकांचे पागोटे, कोळी लोकांचा अंगारा, माळी समाजाचा दवणा आणि फुले, गडसी वाजंत्रीवाले धनगरांची मानाची पायरी, बडवे ब्राह्मणांची पूजा, लिंगायत स्वामींची उत्तरपूजा अशी सर्व जातीची सेवा साधून बहुजनसमाजाचे हित चिंतणारी ही स्थानपरंपरा सर्व समाजाला श्रद्धेने एकत्र बांधणारी आहे.

डोंगरमाथ्यावरील या ठिकाणाची उंची समुद्रसपाटीपासून सुमारे तीन हजार फूट असून, औरस - चौरस बांधलेल्या सुमारे ३०० दगडी पायऱ्या असून नवा मोटार रस्ता शहरी मंडळींना थेट मुख्य मंदिरापर्यंत पोहचवून पायऱ्या चढण्याचे श्रम वाचवितो. मात्र पायऱ्यांचा रस्ता व मोटार रस्ता दर्शविणारी पाटी पायथ्याशी नसल्याने नवा प्रवासी चुकतो. राजमाता जिजाबाई साहेबांनी बांधलेली कमानही वाटेत आहे. डोंगर - माथ्यावरील हे मंदिर १२ व्या शतकातील अप्रतिम व अजोड नमुना आहे. पूर्वाभिमुखी मंदिरात सूर्योदयाच्या वेळी सूर्यकिरण प्रथम प्रवेश करून प्रकाशपुष्प शंभू महादेवाला अर्पितात - दक्षिणायन अगर उत्तरायण या दोन्हीही काळात! मुख्य मंदिराचा आकार बेलाच्या पानासारखा असून मुख्य

पानाचे जागी चौकोनी आकाराचे स्वयंभू शिवलिंग असून याचे वैशिष्ट्य म्हणजे समोरासमोर असलेल्या दोन शाळुंका म्हणजे शंकर - विष्णू, पार्वती - लक्ष्मी यांची प्रतीके आहेत असे मानतात. म्हणूनच हरि - हर असे संबोधितात. यावरूनच 'हर हर महादेव' ही रणगर्जना शिवशक्तीची प्रेरणा घेऊन शिवप्रभूंनी महाराष्ट्रात गर्जविली. मध्यभागी रंगशिळा असून पितळेच्या पत्र्यांनी मढविलेले चार मोठे नंदी आहेत. सभामंडपात एकाच जागी फिरणारे वैशिष्ट्यपूर्ण फिरते दगडी खांब आहेत.

छत्रपती शाहू महाराजांनी इ.स. १७२६ ते ३१ या मंदिराचा जीर्णोद्धार केल्याचा ऐतिहासिक उल्लेख असा -

"त्यासी पाच लाख रुपये खर्च लाविला।
शंभू पाच लाख झाकिला॥"

उल्लेख असल्याचे मुख्याध्यापक श्री. अरविंद उद्धवराव बडवे यांनी सांगितले. अगदी अलीकडे १९७५ च्या सुमारास दक्षिण भारतीय शिल्प पद्धतीने जीर्णोद्धार समितीने शिखराचा आकर्षक कायापालट घडविल्याचे एस.के. कुलकर्णी यांनी सांगितले. गावात पाण्याच्या व इतर आवश्यक सोयी केल्या गेल्या. आता नुकतेच या वर्षी एक शासकीय विश्रामगृह बांधले आहे. याशिवाय पुजारी मंडळींच्या घरीही पूजा - अभिषेक, नैवेद्य, भोजन, निवास व्यवस्था होते.

या डोंगरामाथ्याचा वरचा पठारासारखा सपाट भाग डम्बेल्सच्या आकाराचा असून एका भागात मंदिर व दुसऱ्या टोकावर छत्रपती शिवाजी, संभाजी व शहाजी महाराजांची स्मृतिस्थाने व न्यायसदर या वास्तू आहेत. मंदिराकडून या समाधी - स्थानांच्या दिशेने साद घातली असता प्रतिसाद मिळतो. या ठिकाणी येणारा आवाजाचा प्रतिध्वनी अत्यंत स्पष्ट आणि जसाच्या तसा ऐकू येतो हे विशेष! कारण काही थंड हवेच्या ठिकाणी उगीचच प्रसिद्धी पावलेले 'एको पॉईंटस्' तितकेसे सुस्पष्ट प्रतिध्वनी निर्माण करणारे नसतात असा अनुभव आहे. मात्र या शिखर शिंगणापूरच्या प्रतिध्वनी स्थानाची फारशी प्रसिद्धी नसली तरी प्रचीती दर्जेदार आहे. शिवछत्रपतींच्या राष्ट्रीय भावनेला असाच सुस्पष्ट प्रतिसाद महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून आजही यावा अशी या कुलदैवताची मूक प्रेरणा तर नसेल?

---

कै. यशवंतराव चव्हाण यांच्या प्रेरणेने या स्थानाचे माहात्म्य सर्वदूर पसरले; तसेच गोव्याचे माजी मुख्यमंत्री कै. दयानंद बांदोडकर यांची श्रद्धा या स्थानी होती.

---

शेतातला देवाचा दवणा काळजीपूर्वक पवित्र आचाराने जोपासावा लागतो. आंघोळ

न करता, अस्वच्छपणे, मांसाहार करून किंवा अशुद्धपणे ओशट खाऊन दवण्याच्या पिकाला पाणी दिले तर दवणा जळून जातो अशी स्थानिक माळी समाजाची भावना आहे. याशिवाय मटकी, हुलगा, तूर यासारखी कडधान्ये ज्वारी - बाजरीबरोबर घेतात. करंजा, पिंपरण, चिंच ही झाडे जास्त आहेत. इथे काळ्या तोंडाची लांबलचक शेपटी असलेली वानरसेना कळपाने वावरते.

मोरगाव - बारामती भागातून चुनखडी आणून त्याची भट्टी लावून त्यापासून देवाला लागणारे भस्म तयार करण्याचा व्यवसाय कोळी समाज करतो. शिवशंकराला भस्म विलेपन करून भाविक भस्म प्रसाद म्हणून नेतात. भस्माच्या २/४ लाख वड्या वर्षभरात सहज खपतात.

सातारच्या छत्रपतींचे हे खाजगी देवस्थान असल्याने वैदिक मंत्र - ब्राह्मणांचे, तांत्रिक पूजा लिंगायतांची अशी प्रथा आहे. देवावरचे निर्माल्य छत्रपतींच्या समाधी - स्थानावर वाहतात.

जवळच्या परिसरात ८ लिंगस्थाने आहेत. पैकी २ कि.मी. अंतरावर 'गुप्तलिंग' हे निसर्गरम्य स्थान आहे. डोंगरांच्या कुशीत, दरीच्या तळाशी निसर्गावस्थेतील झाडांच्या छायेत गुहेत चारही बाजूंनी नैसर्गिक थंड पाण्याचा अभिषेक होत असलेले हे शिवलिंग स्थान. गोमुखातील जलधारांनी मन आणि शरीर तिथे थंडावते व आनंदते. प्रदूषणविरहित शांत, स्वच्छ स्थान परिसर शहरी माणसांना तर 'नैसर्गिक आरोग्यकेंद्रच' आहे किंवा प्रदूषणाच्या वाळवंटातील नैसर्गिक 'हिरवळच' जणू!

भगवान शंकर व पार्वतीदेवी सारीपाट खेळत असताना जेव्हा शंकर गुप्त झाले तेव्हा आपल्या जटा इथे आपटल्या, ते जटातीर्थ स्थान गुहेच्या रूपाने दाखवतात. नंतर भगवान जवळच्या कोथलगिरीवर म्हणजे शिखर शिंगणापूरला प्रकटले अशी कथा सांगतात.

---

नव्यानेच फेब्रुवारी १९९१ मध्ये शासकीय विश्रामगृहाचे उद्घाटन झाल्याने सरकारी अधिकाऱ्यांचीही इथे सोय झाली आहे. अन्य वेळी खाजगी प्रवासीही याचा लाभ घेऊ शकतात. मात्र दोनच सूट आहेत; प्रत्येकी एक व्ही.आय.पी सूट आहे. तिथे चहापाणी व जेवण - निवास सोय चांगली करतात, असा माझा अनुभव आहे.

---

गुप्तलिंग मंदिराजवळ दरीतच स्वामी सर्वदानंदजी महाराजांचा संन्यास आश्रम [illegible] आहे. [illegible] स्वच्छ आहे व प्राचीन दिसतो. ध्यानधारणेची व उपासनेची खोलीही आहे. मात्र या दरीत झाडावर मधमाशांची पोळी बरीच आहेत आणि वानरांचा मुक्त

संचार आहे, त्यामुळे प्रवाशांनी थोडी काळजी मात्र घ्यायला हवी.

शिखर - शिंगणापूर ते गुप्तलिंग या वळणदार वाटेवर वृक्षांनी रस्त्याच्या दुतर्फी उभे राहून सावली धरली आहे, आणि त्यातच झाडांच्या गर्दीत एकमेकात गुंफलेल्या फांद्यांमध्ये 'वृक्ष - भेट झालेली दिसते, म्हणजे दोन वेगवेगळ्या झाडांच्या फांद्यांचे निसर्गत:च 'भेट कलम' होऊन वृक्षसंभार वाढला आहे. जणू जिवाशिवाची भेटच या वृक्षभेटीतून प्रतीकरूपाने साकार झालेली पाहायला मिळते. मात्र अशी नवी माहिती मिळण्यासाठी अरविंद बडवे यांच्यासारखे स्थानिक शिक्षक - मार्गदर्शक बरोबर हवेत आणि आपलीही चौकस दृष्टी हवी. वनस्पतिशास्त्रदृष्ट्याही हे दुर्मिळ दृश्य आहे. हा नैसर्गिक चमत्कार आपणही पहायला हवा.

## परतीच्या वाटेवर

माझ्या नेहमीच्या प्रवासपद्धतीप्रमाणे आलेल्या रस्त्याने परत न जाता वेगळ्या रस्त्याने गेल्यास परतीच्या मार्गावरही जाता जाता काही नवे पाहायला टिपायला, अनुभवायला मिळते. आम्ही शिखर - शिंगणापूर ढगाळ हवेत, धुक्यात आणि रिमझिमणाऱ्या पावसातच सोडले व गोंदवल्याचा रस्ता धरला. (शिखर - शिंगणापूर ते गोंदवले - सुमारे ३५ कि.मी.) ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराजांच्या समाधी मंदिरातील रामनामाचे अखंड संकीर्तन, दर्शन, आरतीचा लाभ घेऊन महाप्रसादाला येणारे - सर्व जाती, धर्म, वंशाची स्त्री - पुरुष मंडळी पाहून समाधान वाटले व 'अन्न हे पूर्णब्रह्म' सर्वांनाच कसे आहे ते पुन्हा अनुभवले. प्रसादानंतर तृप्त मनाने आम्ही पुसेगावमार्गे औंधच्या डोंगरावरील यमाई देवीचे दर्शन घेण्यासाठी निघालो (गोंदवले ते औंध - पुसेगावमार्गे - ३० कि.मी.) थेट वरपर्यंत मोटारगाडी जाते त्यामुळे पायऱ्या चढण्याचे श्रम वाचतात, परंतु वाटेतील बदलते दृश्य - सौंदर्य पाहण्यास आपण मुकतो. ८/१० फूट उंचीची यमाई देवीची आसनस्थ उग्र मूर्ती पाहून आपण नतमस्तक होतो. ती भव्यमूर्ती अनेकांचे कुलदैवत आहे. पौष महिन्यात यात्रा भरते. औंधासुर राक्षस देवीने मारला अशी कथा आहे. यमाई म्हणजे पार्वतीचा अवतार मानतात. हे देवस्थान औंधचे राजे पंतप्रतिनिधी यांच्या मालकीचे असूनही सर्व भक्तमंडळींस मुक्त आहे. मोटारने देवी - दर्शनाला येणाऱ्या अतीउत्साही पण असंस्कृत मंडळींनी मंदिराच्या मागील प्राचीन वास्तूवर आपापल्या मोटारींचे नंबर कारून किंवा चुन्याने लिहून ठेवल्याने पावित्र्य हानी व सौंदर्यहानी होते; हे थांबायलाच हवे व सामाजिक कर्तव्य म्हणून हा परिसर पवित्र व स्वच्छ राखायला हवा.

यमाई देवीचा डोंगर अर्धा चढून आल्यावर कि [illegible] मंदिरापासून निम्मा उतरून गेल्यावर भवानी चित्रसंग्रहालयाची बैठी वास्तु, बागबगीचा लागतो. श्रीमंत भवानराव पंतप्रतिनिधी

या कलाप्रिय, रसिक व समाजाभिमुख महाराजांनी देशी - परदेशी चित्रकृती, मूर्ती, शिल्पचित्रे, रंगवैभवी पेंटिंग्ज् यांचे अतिशय देखणे बनवलेले संग्रहालय प्रत्येकाने पाहावे असे आहे. परदेशात गाजलेल्या मोनालिसाच्या चित्रापासून राजा रविवर्म्यांच्या भारतीय चित्रापर्यंत असंख्य चित्रकृती आणि पुतळे हा मोलाचा ठेवा औंधचेच नव्हे तर अखिल महाराष्ट्राचे भूषण आहे. पुरातत्त्व विभागाने त्याची व्यवस्थाही औंधच्या राजपरंपरेनुसार नेटकी ठेवली आहे. दीड रुपया प्रवेशशुल्क आणि १०.३० ते ५ अशी संग्रहालयाची वेळ असून ते सोमवारी मात्र बंद असते. तेथे फोटो घेण्यास मनाई आहे; परंतु चांगले रंगीत फोटो व माहितीपत्रकेही विक्रीसाठी नाहीत. ही सोय नव्या पिढीतील पर्यटकांसाठी शासनाच्या पुरातत्त्व विभागाने त्वरित करायला हवी. हे एक चांगले पर्यटन केंद्र म्हणून केवळ जिल्ह्यातच नव्हे, तर राज्यातही प्रसिद्ध होईल.

इथले आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे बाहेरच्या बागेत असलेले ऋतुदर्शनाचे सौंदर्यवतींचे संगमरवरी पुतळे. वसंत (चैत्र, वैशाख), ग्रीष्म (ज्येष्ठ, आषाढ), वर्षा (श्रावण, भाद्रपद), शरद (अश्विन, कार्तिक), हेमंत (मार्गशीर्ष, पौष), शिशिर (माघ, फाल्गुन) या ऋतूंच्या बदलत्या काळातील नैसर्गिक बदलांचा - मानवी सौंदर्य, सवयी, केशरचना, पुष्परचना, कार्यवैविध्य, भावभावना आणि विविध वस्त्ररचना पाहताना शहारून जावे आणि त्या कवी - कल्पनेच्या अनामिक शिल्पकाराला लाख लाख धन्यवाद द्यावेत. रसिकता निर्जीव दगडातून कशी सजीव होते याचा प्रत्यक्षानुभव घ्यावा अशी ही ऋतुसंकल्पना संगमरवरातून काव्य - शिल्परूपाने आपल्याशी बोलू लागते. या ऋतुशिल्पसौंदर्यवतींचेही फोटो पर्यटकांना त्या खालील अर्थपूर्ण काव्यपंक्तीसह सहजी विकत मिळायला हवेत. हे संग्रहालयाचे सौंदर्यदर्शन सर्वदूर माहीत झाल्यास ते परिसराचाच नव्हे तर राज्याचा देशातील मान वाढवेल यात शंका नाही.

अशी ही दोन दिवसांची माझी कुटुंबसहल चार स्थानांच्या अनोख्या दर्शनाने सफल संपूर्ण झाली, तशी ती तुम्हालाही घडो, ही सदिच्छा!

---

## धुक्यात गवसलेले शिखर - शिंगणापूर

शिखर शिंगणापूरच्या वैशिष्ट्यात, तेथील आम्ही अनुभवलेली धुक्यातील चढणीची वाट, पावसाचा शिडकावा, थंड वाहणारे वारे यामुळे सकाळी १० वाजेपर्यंत सूर्यदर्शनच काय परंतु शिखरदर्शनही होत नव्हते. तसा आजूबाजूचा परिसर डोंगराळ असला तरी उघडाबोडकाच आहे. त्यामुळे एखाद्या थंड हवेच्या ठिकाणासारखी हिरवी झाडी इथे नाही. स्थानिक माहिती सांगताना एका माहितगाराने सांगितले की येथील खडक कठीण असल्यामुळे झाडे वाढत नाहीत. परंतु खास प्रयत्न करून खड्डे घेऊन मातीची भर घालून वनविभागाला

हा परिसर हिरवागार करण्याचे श्रेय कष्टपूर्वक घेता येईल, कारण ४० एकरात पसरलेला, उत्तम बांधणीचा पुष्कर - तीर्थ तलाव मालोजीरावांनी बांधला आणि पाण्याची कायमची ददाद मिटली. या तलावाचे आणखी एक वैशिष्ट्य समजले ते म्हणजे दक्षिणेकडील टेकडीवरून तलावाकडे अभ्यासू दृष्टीने पाहिले असता तलावाचा आकार भारताच्या नकाशासारखा दिसतो. अर्थात तलावातले पाणी म्हणजे भारताची भूमी मानायची. देवाला श्रद्धापूर्वक वाहण्यात येणारा सुगंधी दवणा याच परिसरात माळी समाज श्रद्धेने लावतो. या नाजूक रोपाची निगुतीने व निर्मळतेने वाढ करावी लागते. शंकराने प्राशन केलेले हलाहल विष याच थंड दवण्याने शमले अशी कथा आहे. या दवण्याचे अत्तरही करतात. कोल्हापूरच्या ज्योतीबाला शिंगणापूरचाच दवणा जातो.

---

## आणखी काही अपरिचित स्थळांचा - थोडक्यात परिचय

## ३.१६ नागझिरा (भंडारा जिल्हा)

महाराष्ट्राच्या पूर्वभागात भंडारा जिल्ह्यातील हे एक नावाजलेले अभयारण्य आहे. विदर्भाला लाभलेले निसर्गाचे हे अपूर्व लेणे आहे. या ठिकाणी पानझडी वृक्षांचे जंगल आहे. नागझिरा अभयारण्यात नागझिरा आणि थडेझरी अशी दोन नैसर्गिक तळी आहेत. प्रत्येकी चार हेक्टर्सचे क्षेत्र व्यापणारी, सदैव पाण्याने भरलेली, अभयारण्याच्या सौंदर्यात भर घालणारी, तृषार्त वन्य - प्राण्यांची तृषा शमवणारी, प्रेक्षकांना - पर्यटकांना स्नेहाचा ओलावा देणारी ही तळी निसर्गाच्या रमणीयतेत भर घालतात.

येथील नयनरम्य वनश्री, वृक्षांच्या फांद्यांतून! पानांतून झिरपणारे सूर्यकिरणांचे कवडसे हे जरी सगळे मोहक असले तरी आपली नजर खिळवून टाकतात ते या सुंदर सान्निध्यात संसार थाटलेले अनेकविध रंगीबेरंगी पक्षी!

भंडारा वनविभागात तिरोडा क्षेत्रात पसरलेल्या या अभयारण्याने सुमारे १३१.७५ चौरस किलोमीटरचे क्षेत्र व्यापलेले आहे. नागपूरपासून साकोली १०० कि.मी. वर आहे. येथून अवघ्या ३२ कि.मी. अंतरावर नागझिरा आहे. राज्य सरकारच्या मार्ग - परिवहन मंडळाने पर्यटकांसाठी मिनी बसची खास सोय केलेली आहे.

## ३.१७ ढाकणा कोळकाज (अमरावती जिल्हा)

अमरावती जिल्ह्याच्या उत्तर भागात अमरावतीपासून ११४ कि.मी. अंतरावर असलेल्या सिपना नदीच्या खोऱ्यातील कोळकाज हा प्रदेश घनदाट अरण्याने व्यापलेला आहे. ढाकणा कोळकाज वन्यप्राणी अभयारण्य म्हणून सरकारने हा प्रदेश जाहीर केलेला आहे. या

अरण्यातील ९०० चौ.कि.मी. पट्टा राखीव म्हणून जाहीर करण्यात आलेला आहे. वाघांचे संरक्षण आणि जोपसना नैसर्गिक वातावरणात व्हावी, हा या अभयारण्याचा मुख्य उद्देश आहे.

'माझ्यासारखे ताठ मानेने राहयला शिका' असाच जणू सांगणारा सागवृक्ष, लालभडक फुलांचा सावर, रक्तवर्गी पुष्पांची पखरण करणारा पळस आदि वनवैभव मन मोहून टाकते. येथील जंगलात रौद्र सौंदर्याचा मूर्तिमंत साक्षात्कार वाटावेत असे रानगव्याचे थवे आहेत. सांवर, चितळ व झाडावर चढू शकणारे बिबळे आहेत. अशा या अरण्यात 'पटाईत' वाघ सुखेनैव राहात आहेत. वन्य प्राण्यांबरोबरच नाना प्रकारच्या पक्ष्यांच्या मधुर निसर्गसंगीताने सारा वनप्रदेश कसा भारावून जातो. पक्ष्यांच्या सुमारे ११३ जातींनी वनाच्या सौंदर्यात भर घातली आहे.

वाघांना कोरकू लोक 'कुला' असे म्हणतात. 'कुला' शब्दाचा अपभ्रंश होऊन 'कोल' व त्यावरून 'कोलकाज' हे नाव रूढ झाले. जिथे अगणित वाघ आहेत ते ठिकाण म्हणजे 'कोलकाज' असा अर्थ अभिप्रेत आहे.

## ३ १८ राधानगरी (कोल्हापूर जिल्हा)

महाराष्ट्रात प्रामुख्याने काही विशिष्ट प्राण्यांच्या संरक्षणासाठी ज्या अभयारण्यांची निर्मिती झाली, त्यातील हे एक अभयारण्य आहे. वाघाचे नाव काढताच मेळघाटचे अभयारण्य आठवते, त्याचप्रमाणे रानगवा म्हणताच राधानगरी (दाजीपूर) अभयारण्य नजरेसमोर उभे राहते.

कोल्हापूर जिल्ह्यातील राधानगरी गावापासून फोंडा रस्त्यावर ३२ कि.मी. अंतरावर दाजीपूर हे कोकण सरहद्दीवर वसलेले एक छोटे खेडे आहे. त्याला लागून पाळ्याचा डंग' हे घनदाट अरण्याचे कडेपठार पसरलेले आहे. या जंगलातील गव्यांचे अस्तित्व लक्षात घेऊन कोल्हापूर वनखात्याने दाजीपूर गवा - अभयारण्याची १९५९-६० मध्ये घोषणा केली.

## ३.१९ सागरेश्वर - (सांगली जिल्हा)

प्राचीन काळी सागरेश्वर परिसर 'अंबिकावन' म्हणून प्रसिद्ध होता. याच ठिकाणी सुंदर वनसृष्टीची निर्मिती झाली आहे.

हे अभयारण्य ५ चौ.कि.मी. क्षेत्रात विकसित झाले आहे. वडगाव, देवराष्ट्रे, आसद, दुधारी, ताकारी आणि तुपारी या गावांचे वनक्षेत्र या अभयारण्यात समाविष्ट आहे. सागरेश्वराच्या डोंगराळ भागात मनाला भुरळ पाडणारी ही अभयसृष्टी साकार झाली आहे.

सुमारे ३४ हेक्टर भागावर तयार करण्यात आलेला खास मृगविहार हे या अभयारण्याचे प्रमुख वैशिष्ट्य आहे. चितळ, सांबर, भेकर, चिंकारा या अनेक जातींची हरणे या मृगविहाराचे वैभव आहे.

सागरेश्वर परिसरात - सागरेश्वर, लिंगेश्वर, नागेश्वर, परिमलीक आणि कमळभैरव ही प्रमुख धार्मिक श्रद्धास्थाने आहेत; त्यामुळे या अभयारण्याने धर्माशी नाते प्रस्थापित केले आहे. डाक बंगल्यावरून दिसणारा सूर्योदय आणि ४२ ४० मीटर उंचीच्या रणशळ शिखरावरून दिसणारा सूर्यास्त अतिशय प्रेक्षणीय असतो.

## ३.२० किनवट अभयारण्य (नांदेड - यवतमाळ जिल्हा)

नांदेड व यवतमाळ या जिल्ह्यांच्या सीमेवर पैनगंगा नदीच्या खोऱ्यात ज्या ठिकाणी नदीने एक झोकदार वळण घेतले आहे त्याच्या बाजूलाच सुरम्य वनश्रीचा हा प्रदेश आढळतो. या अभयारण्यातील पळस - वृक्षांची विशेष ख्याती आहे. येथील पळस वृक्षांच्या विपुलतेमुळे हे अरण्य 'पळसवन' म्हणूनही ओळखले जाते. लालभडक फुलांच्या बहरलेल्या पळस वृक्षाने अनेकांना आकृष्ट केले आहे.

या अभयारण्याने सुमारे ३२४ चौ.कि.मी. क्षेत्र व्यापलेले आहे. पुसद तालुक्याच्या दक्षिण भागात असलेले हे जंगल म्हणजे एक प्रकारचे निसर्गसंगीत आहे. या अभयारण्याच्या दर्शनाने निर्भेळ आनंदाची प्राप्ती होते.

## ३.२१ कुंथलगिरी (उस्मानाबाद जिल्हा)

हे एक जैनांचे तीर्थक्षेत्र. बार्शीपासून ३५ कि.मी. अंतरावर हा एक डोंगर असून त्यावर दहा जैन मंदिरे आहेत. माघ पौर्णिमेला प्रतिवर्षी येथे यात्रा भरते. इथे जैनमुनी शांतिसागरमहाराजांची समाधीही आहे.

या पवित्र क्षेत्रात कुलभूषण व देशभूषण नामक बंधूंनी तपश्चर्या केली, त्यांना कैवल्यज्ञानाची प्राप्ती झाली व ते मोक्षाला गेले असे म्हणतात. तिथे त्यांचे मंदिर आहे. तिथल्या मंदिरात आदिनाथ, शांतिनाथ, वृषभनाथ, मल्लीनाथ, मुनीसुव्रत, महावीर यांच्या सुदर मूर्ती आहेत. इथून जवळच एक १३ मीटर उंच गोल दगडी मानसस्तंभ आहे.

## ३ २२ भद्रावती (चंद्रपूर जिल्हा)

हे शहर भद्रा नदीच्या दोन्ही काठावर बाबा बुढण डोंगराच्या पायथ्याशी वसले आहे. शहराच्या जुन्या भागात तेराव्या शतकाच्या मध्यकालात बांधलेले होयरूळांचे लक्ष्मी - नरसिंहाचे पूर्वाभिमुख देऊळ आहे. देवळातील सुखासनावर बसलेली नरसिंहाची मूर्ती

शोभिवंत आहे. मे महिन्यात येथे वार्षिकोत्सव साजरा होतो. प्राचीन काळी हे शहर बैंकिपुरा, बेंकियापुरा, बँकीपुरा, बँकिपुरी इत्यादी नावांनी ओळखले जाई. जैनांचे पार्श्वनाथ मंदिर व बुद्ध लेणी पाहण्यासारखी आहेत.

## ३.२३ मार्कंडा (गडचिरोली जिल्हा)

गडचिरोली जिल्ह्यातील वास्तुशिल्पशैलीसाठी प्रसिद्ध असलेले एक स्थळ. येथे दक्षिणवाहिनी वैनगंगा उत्तरवाहिनी झाल्यामुळे या ठिकाणास धार्मिकदृष्ट्या महत्त्व प्राप्त झालेले आहे. महाशिवरात्रीला येथे मोठी यात्रा भरते. वैनगंगा नदीच्या तीराजवळील उंच खडकावर श्री मार्कंडेश्वर देवस्थान असून दक्षिणोत्तर ६३ मी. लांब व पूर्व - पश्चिम ५३ मी. रुंद अशा विस्तृत आयताकार प्रकारामध्ये हा नगरशैलीत बांधलेला मंदिर - समूह आहे. मार्कंडेय ऋषी, यमधर्म, मार्कंडेयाचा पिता मृकंडऋषी आणि शंकर ही चार मंदिरे कलात्मक दृष्ट्या उल्लेखनीय आहेत.

## ३.२४ रामटेक (नागपूर जिल्हा)

रामटेक हे तालुक्याचे ठिकाण आहे. येथील टेकडीवर राममंदिर आहे; तसेच महाकवी कालिदासाचे स्मारक आहे. येथील रामसागर व अंबाला तलाव प्रेक्षणीय आहे. टेकडीवर राम व लक्ष्मण यांची देवालये आहेत. 'मेघदूत' या महाकाव्यात या टेकडीचा रामनगरी असा उल्लेख आहे. कालिदासाने आपले 'मेघदूत' हे अमरकाव्य येथेच लिहिले. रामनवमी व कार्तिकी पौर्णिमेच्या दिवशी येथे यात्रा भरते. येथील देवालये ६०० वर्षांपूर्वी बांधलेली आहेत.

## ३.२५ येडशी (उस्मानाबाद जिल्हा)

येडशी परिसर पठारावर असून येथे दाट झाडी आहे. येथून जवळच रामलिंग मंदिर आहे. रामलिंग डोंगरावरच दुर्गादेवीचे मंदिर आहे. ते उंचावर असून थंड हवेचे ठिकाण आहे. येथे पावसाळ्यात अनेक धबधबे पाहावयास मिळतात. यास मोरघाट असेही म्हणतात.

## ३.२६ सहस्रकुंड (नांदेड - यवतमाळ जिल्ह्यांच्या सीमेवर)

मुदखेड - अदिलाबाद लोहमार्गावर इस्लापूर गावाजवळ सहस्रकुंड येथे पैनगंगा नदीवर धबधबा आहे. त्याला सहस्रकुंड धबधबा म्हणतात. येथे नदी तीन धारांनी खाली डोहात उडी घेते. परशुरामाने बाण मारून येथे गंगेला वर काढले, अशी आख्यायिका आहे.

## ३.२७ रेणापूर (लातूर जिल्हा)

हे लातूर तालुक्यातील गाव. येथे रेणुका देवीचे सुंदर देवालय आहे. देवीच्या देवळापुढील दीपमाळ दगडाची बांधलेली आहे. आपण धक्का दिल्यावर ती हलते. हे या दीपमाळेचे वैशिष्ट्य आहे.

## ३.२८ वैरागड (गडचिरोली जिल्हा)

येथे ऐतिहासिक किल्ला आहे. भंडारेश्वर व गोरजाईची हेमाडपंती देवालये येथे आहेत. नमाज टेकडीवर ईदगाह आहे.

## ३.२९ खरोसा (लातूर जिल्हा)

खरोसा हे गाव औसा तालुक्यात आहे. या ठिकाणी टेकडीवर कोरलेली लेणी गुप्तवाकाटक काळात इसवी सनाच्या सहाव्या शतकाच्या उत्तरार्धातील असावीत असे संशोधकांचे मत आहे. लेण्यांच्या खोदकामात साधेपणा असला तरी या ठिकाणी असलेली शिल्पे रेखीव आहेत. खरोशीची शैलगृहे बदामीच्या शैलगृहाएवढी जुनी आहेत.

या ठिकाणी नरसिंह, शिवपार्वती, कार्तिकेय, रावण, तांडवनृत्य, समुद्रमंथन, धनुर्धारी राम, कौरव - पांडव युद्धाचे प्रसंग, वराहमूर्ती आदि शिल्पे आहेत. येथील सुमारे पावणे दोन मीटर उंचीची विष्णु - मूर्ती आकर्षक आहे. येथील एका गुहेत जैन - मूर्ती पद्मासन घातलेल्या अवस्थेत आहे. टेकडीवर रेणुका मातेचे मंदिर आहे.

## ३.३० कुकडी नदी (अहमदनगर - पुणे जिल्हा सीमेजवळ)

पुण्याजवळ शिरूरजवळ निघोज गावात कुकडी नदीच्या पात्रात असंख्य रांजण - खळगे (पॉट होल्स्) तयार झालेले आहेत. हे रांजण - खळगे फारच प्रचंड आहेत. कदाचित संपूर्ण आशिया खंडात एवढे मोठे अन् संख्येने इतके रांजण - खळगे किंवा रांजण - कुंडे अन्यत्र नसतीलच. पाण्याच्या झीज - वहन कार्याचा व खडकांच्या प्रकाराचा हा मनोवेधक आविष्कार आहे.

## ३.३१ कान्हूर पठार (अहमदनगर जिल्हा)

अहमदनगर जिल्ह्यातील कान्हूर पठारावर वडगाव - दर्या गावाशेजारी चुनखडीच्या प्रदेशात गुहा तयार झालेल्या आहेत. त्यातील काही गुहांमधील अधोमुखी लवणस्तंभ आणि ऊर्ध्वमुखी लवणस्तंभ म्हणजे स्टॅलक्टाइट व स्टॅलग्माइट आवर्जून जाऊन पाहण्यासारखे आहेत. पाणी ठिबकल्यामुळे व झिरपल्याने एक वेगळेच भौगोलिक शिल्प तयार झालेले

दिसते. अर्थात परदेशातील लवणस्तंभांच्या तुलनेने हे स्तंभ आकाराने लहान असले तरी महाराष्ट्रातील हे भौगोलिक शिल्प दर्शन - घेण्यासाठी १४ जानेवारीच्या भूगोल दिनी व इतरवेळीही अभ्यासू विद्यार्थी व शिक्षक या स्थळी येऊ लागले आहेत. स्थानिक वानरसेना आपल्या स्वागताला सज्ज असते. या परिसरात हे स्थान 'दर्यादेवीचे स्थान' म्हणून भाविकांना दर्शनासाठी आकर्षित करते. परंतु या स्थानांचे वैज्ञानिक महत्त्वही आहे.

## ३.३२ अल्लापल्ली वनविभाग (गडचिरोली जिल्हा)
## चापराळा अभयारण्य

गडचिरोली तालुक्यातील हे अभयारण्य मिश्र पानझडी वृक्षांनी गजबजलेले आहे. सदाहरित वृक्षही असलेले असे हे अरण्य पर्यटकांना मोहवणारे आहे. या अभयारण्यात साग, ऐन, अंजन, पिसा, बेहडा इत्यादी वृक्षराजी व वेली असून व्याघ्र, सांवर, हरणे, तरस यांसारखे प्राणी आहेत.

चंद्रपूरहून सुमारे ८० कि.मी. अंतरावर असलेल्या या अभयारण्यात दोन सूटस् असलेले वनविश्रामगृह पर्यटकांच्या सोईचे आहे. याचे बुकिंग चंद्रपूरहून करता येते या दुर्गमभागात जीप हेच वाहन सुरक्षित वाटावे. कारण जंगलातील कच्चे रस्ते. मुबलक पाऊस (सुमारे ३००० मि.मी.) यामुळे पावसाळा सोडून म्हणजे मुख्यत: ऑक्टोबर ते मे या कालावधीतच तेथे जाणे सोयीचे.

आंध्र प्रदेशाच्या सरहद्दीजवळ महाराष्ट्राच्या काहीशा एका कोपऱ्यात असलेल्या या निसर्गरम्य अभयारण्याला भेट द्यायला पर्यटक मात्र फारसे जात नाहीत, कारण या दुर्गम भागात प्रवासाच्या, वाहतुकीच्या फारशा सोयी नाहीत. हा दुर्लक्षित पण रमणीय परिसर विकसित करायला पर्यटनखात्याला मात्र संधी आहे. जी संधी पर्यटकांना सुखद ठरू शकणारी आहे.

पर्यटकांसाठी आवश्यक तक्ता

| ठिकाण | पुण्यापासूनचे अंतर | मार्ग व वेळ | तेथे काय पहायचे | भोजन/निवास |
|---|---|---|---|---|
| १) फलटण | १२० कि.मी. | पुणे - सातारा रोड शिरवळ मार्गे (२ तास) | राम मंदिर, जेब्रेश्वर शिवमंदिर ज्ञानेश्वर व उपळेकर महाराज मंदिर | स्थानिक हॉटेल्स |
| २) शिखर - शिंगणापूर | १५० कि.मी. | फलटण मार्गे - लोणंद नातेपुते फाटा (१ तास) | शंभू महादेव मंदिर शिल्प दर्शन, छत्रपती स्मृतिस्थाने, प्रतिध्वनी स्थान, फिरते दगडी खांब, पुष्कर तीर्थ, बळी मंदिर, गुप्तलिंग - दरी दर्शन (डोंगरावर मंदिरापर्यंत मोटार जाते) | शासकीय विश्रामगृह, पुजारी किंवा फलटण येथील हॉटेल्स |
| ३) गोंदवले | सुमारे १८० कि.मी. | शिंगणापूरहून (१ तास) गोंदवले | ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज, समाधी मंदिर, राम मंदिर, प्रसाद सेवा | प्रसाद - भोजन, साधक व भक्त निवास |
| ४) औंध | सुमारे १७० कि.मी. | गोंदवल्याहून पुसेगांव मार्गे (१ तास) औंध किंवा पुणे - सातारा मार्गे | यमाई देवी मंदिर (टेकडी मंदिरापर्यंत छोटी मोटार जाते) पंत प्रतिनिधी भवानी चित्र व वस्तुसंग्रहालय | पुजारी किंवा सातारा येथे हॉटेल्स |

**सोय** - शिखर शिंगणापूर व औंध येथे मोटारीने डोंगरमाथ्यावरील मंदिरापर्यंत जाता येते. पायऱ्या चढाव्या लागत नाहीत.

**टीप** - ही चार ठिकाणे पाहण्यास दोन दिवस लागतात व एक मुक्काम करावा लागतो. जाऊन - येऊन सुमारे ४०० कि.मी. अंतरच प्रवास होतो. स्वतंत्र अगर टूरिस्ट टॅक्सीने गेल्यास पवास सुखकारक. जर एकाच दिवसात परत यायचे असेल तर यापैकी फलटण, शिखर शिंगणापूर किंवा गोंदवले व औंध यांपैकी कोणतीही दोन ठिकाणे निवडावी व त्याच दिवशी परत यावे.

# ४

# महाराष्ट्रातील थंड हवेची अपरिचित ठिकाणे

मी 'चार पावसाळे' जास्त पाहिले आहेत, असा वाक्प्रचार मराठीत रूढ आहे. बहुधा पावसाळा हा ऋतू हिवाळा किंवा उन्हाळा यांपेक्षा जास्त क्लेशकारक, अवघड व कठीण असावा, तेव्हाचा तसा अनुभव असावा.

परंतु आता या वाक्प्रचारात बदल करून 'मी चार उन्हाळे' जास्त पाहिले आहेत, असे म्हणण्याची वेळ आली आहे. शहरी भागातील असह्य उकाडा, हवेतील प्रदूषण, आवाजाचे प्रदूषण, गर्दी - गोंधळ, उष्णेतील वाढ यांमुळे उन्हाळ्यात शाळा - कॉललेजेस्ना सुट्ट्या लागल्यावर थंड हवेच्या ठिकाणी जाण्याचे बेत आखले जातात. अर्थात् पैसा, वेळ, सोय, अंतर, रजा, जागा हे पाहून व अंदाज घेऊन!

इंग्रज राज्यकर्त्यांनी थंड प्रदेशातून येऊन उष्ण प्रदेशात व्यापार, वाहतूक, राज्य करायला सुरुवात केल्यावर येथील उन्हाळा मात्र असह्य होत असल्याने तेवढा काळ आपल्या मायदेशी जाण्याचा उपक्रम सुरवातीला केला; परंतु नंतर मात्र ते शक्य होईना; वा स्थानिक थंड हवेच्या ठिकाणाचा शोध लागला व उन्हाळा त्यांना थोडा सुसह्य होऊ लागला असावा. ती प्रथा स्थानिक शिक्षित व श्रीमंतांनी स्वीकारली व ती अनुकरणीय ठरली. बदलत्या परिस्थितीत शहरीकरणाच्या वाढीमुळे व यांत्रिक जीवनपद्धतीमुळे थंड हवेच्या ठिकाणांचे आकर्षण वाढतच राहिले आहे. वाढती सुबत्ता व संपन्नतेबरोबर अधिक दूरच्या ठिकाणी उन्हाळ्यात जायचं, असा उपक्रम फारच थोड्यांना परवडणारा ठरला, म्हणून महाराष्ट्रातील सर्वसामान्य व मध्यमवर्गीयांना परवडणारी काही थंड हवेची ठिकाणे ओझरती तरी पाहू या व कुठे जायचे ते मग ठरवूया.

## ४.१ चिखलदरा - विदर्भाचे नंदनवन

अमरावती जिल्ह्यातील सातपुडा पर्वतातील गाविलगड डोंगररांगेतील अप्रसिद्ध थंड हवेचे

ठिकाण. प्रॉस्पेक्ट, मोहरी, विरार, देवी, इत्यादी पॉईन्टस्, वनोद्यान आणि पंचबोल, हरिकेन पॉईन्टस् पाहण्यासारखे आहेत. खास निगा राखलेले वनोद्यान आणि मेळघाट व्याघ्र प्रकल्पातील संग्रहालय मुद्दाम पाहावे असेच आहे. घनदाट जंगलाने वेढलेल्या जंगल प्रदेशात अभयारण्यातील प्राणी आणि पक्षी पाहण्यासाठी मुक्काम करायला हवा. ढाकणा - कोळकाज हा खास वनांतर्गत प्रदेश आहे.

जाण्याची सोय म्हणजे अमरावतीहून बडनेरा - अचलपूरमार्गे ११४ कि.मी. किंवा नागपूरहून २८० कि.मी. किंवा मुंबई - नागपूर रेल्वेने बडनेरा स्टेशनपासून १२४ कि.मी.

राहण्याची सोय शासकीय विश्रामगृह, हॉलिडे कॅम्प आणि फॉरेस्ट बंगला, त्यासाठी नागपूर किंवा अमरावतीहून रिझर्वेशन करता येते. खाजगी हॉटेल्स् किंवा राहण्याच्या चांगल्या सोयी नाहीत; कारण या ठिकाणाचे अजून व्यापारीकरण झालेले नाही, म्हणूनच शांत थंडावा मिळू शकतो.

याच परिसरात परंतु मध्य प्रदेशच्या हद्दीत बैतूल जिल्ह्यातील मुक्तागिरी नावाचा जैनमंदिर समूह आहे. त्याचे वैशिष्ट्य म्हणजे डोंगरकपारीत असलेली बावन्न मंदिरांची ही प्रदक्षिणा निसर्गाच्या संगतीने, शिल्पसौंदर्याचा आस्वाद घेत भक्तिभावाने, सलगरीत्या पुरी केल्यास चांगला स्थानबदल होतो, अशी भाविकांची श्रद्धा आहे. या दुर्गम भागातील ही मंदिरशृंखला पाहून आपण स्तिमित होतो. चिखलदऱ्याच्या अपरिचितेत भर घालणारे हे आणखी एक स्थान.

## ४.२ म्हैसमाळ - मराठवाड्यातील अपरिचित स्थान

हे अपरिचित थंड हवेचे ठिकाण मराठवाड्यातील जगप्रसिद्ध औरंगाबादच्या वेरूळ लेण्यांजवळ आहे. वेरूळ टेकड्यांच्या परिसरात सह्याद्रीच्या पसरलेल्या डोंगररांगेत औरंगाबादपासून खुल्दाबादमार्गे ४० कि.मी. वर हे विकसनशील थंड हवेचे ठिकाण आहे. येथील गवताळ प्रदेश व माळरान कदाचित म्हशींचं उत्तम चराऊ कुरण असावं, अशीही म्हैसमाळची व्युत्पत्ती समजली. काहींनी सांगितली. गिरिजाभवानी मंदिर व गोरक्षनाथ गुंफा यामुळे भक्तमंडळीही येथे येतात.

राहण्याची सोय - शासकीय विश्रामगृहाचे रिझर्वेशन औरंगाबादला करून तेथे राहता येते. मात्र पर्यटन विभागाचे बंगले किंवा हॉलिडे कॅम्प इथे नाहीत. मराठवाड्यातील या थंड हवेच्या ठिकाणाचा विकास केल्यास अजिंठा - वेरूळची गर्दी इकडे वळवता येईल हे नक्की! म्हणजे औरंगाबादच्या शहरी निवासापेक्षा म्हैसमाळचा निसर्गनिवास पर्यटकांना आवडेल व रुचेल.

## ४.३ तोरणमाळ – उत्तर महाराष्ट्रातील अपरिचित स्थान

महाराष्ट्राच्या उत्तरेकडील, खानदेशातील हे अपरिचित थंड हवेचे धुळे जिल्ह्यातील अक्राणी तालुक्यातील ठिकाण सातपुडा पर्वताच्या डोंगररांगात असून याची उंची समुद्रसपाटीपासून सुमारे १०३६ मीटर आहे. तोरणी झाडांवरून तोरणमाळ नाव पडल्याचे सांगतात. तसेच या परिसरात सदाहरित वृक्ष आहेत. तोरणमाळ पूर्वी मांडू राजांच्या राजधानीचे ठिकाण होते.

हे ठिकाण धुळ्याच्या उत्तरेला सुमारे १४९ कि.मी. अंतरावर आहे. धुळे येथून थेट बसने जाता येते; किंवा धुळे येथून शहादे येथे जाऊनही बसने जाता येते. हा रस्ता राणीपूरमार्गे तोरणमाळला जातो. राणीपूरच्या पुढे डोंगरातून अनेक वळणे घेत हा रस्ता जातो.

सातपुड्यात तोरणमाळचे विस्तीर्ण पठार आहे. पठारावर तोरणमाळ गावाजवळच एक तलावही आहे. हा तलाव नैसर्गिक असून तो ज्वालामुखीमुळे तयार झालेला असावा. त्याचे नाव 'यशवंत तलाव'. जवळच सीताखाई हे विहंगम दृश्य आहे. पठारावर गोरखनाथ, पारसनाथ, नागार्जुन यांची मंदिरे आहेत. नाथपंथी मठही आहे. दरवर्षी ऑक्टोबरमध्ये येथे मोठी यात्रा भरते. या यात्रेसाठी धुळे, जळगाव जिल्ह्यांखेरीज मध्यप्रदेश, गुजरात राज्यांतूनही लोक येतात. यात बरेच आदिवासी असतात.

पर्यटन विभागाने येथे राहण्याची सोय केली आहे. त्याचे रिझर्वेशन पुण्याहूनही करता येते.

## ४.४ भंडारदरा – मध्य महाराष्ट्रातील थंड हवेचे दुर्लक्षित स्थान

महाराष्ट्रातील अहमदनगर या दुष्काळी पण साखर कारखान्याच्या जिल्ह्यातील हे वैशिष्ट्यपूर्ण थंड हवेचे ठिकाण जिल्ह्याच्या वायव्येकडे असून विविधतेने नटलेले आहे. कारण भंडारदरा हे दगडी, जुने, मजबूत धरण आणि उंचावर असलेले ऑर्थर लेक, हा या धरणाचा विशाल जलाशय, तसेच एका तीरावर अमृतेश्वर हे प्राचीन शिल्पाकृती मंदिर हे याच परिसरात आहे, आणि सह्याद्रीतील सर्वोच्च कळसूबाई शिखर आणि खोल दरीत झेपावणारा व फेसाळणारा पांढराशुभ्र रंधा धबधबा, हे सर्व एकाच परिसरात पाहण्याची संधी पर्यटकाला घेता येते.

ठाणे आणि नाशिक जिल्ह्यातील हा परिसर जवळचा वाटतो. मात्र संगमनेरहून वळणावळणाच्या घाटातून रंधा धबधब्याचं दुर्लभ दर्शन घेण्याचे भाग्य लाभते, तेही धबधब्याच्या माथ्याजवळून. राहण्यासाठी भंडारदरा धरणावर शासकीय व पर्यटक विश्रामगृहे चांगल्या प्रकारे ठेवली आहेत. तसेच पर्यटक निवासही आहे.

इगतपुरीपासून ४० कि.मी. किंवा पुण्याहून संगमनेरमार्गे १२० कि.मी. तर मुंबईहून

कळसूबाईमार्गे १८५ कि.मी. वर भंडारदरा गाठता येते. प्रवाशांची गर्दी नसल्याने राहण्याची सोय चटकन होऊ शकते.

## ४.५ आंबोली - दक्षिण कोकणातील विकासोन्मुख स्थळ

दक्षिण कोकणातील सिंधुदुर्ग जिल्ह्यातील कोल्हापूर - बेळगाव - गोवा भागाला जवळचे असे हे अपरिचित थंड हवेचे ठिकाण महाराष्ट्राच्या नैर्ऋत्य कोपऱ्यात शहरी गजबजाटापासून दूर - रुसून बसल्यासारखे आहे. आंबोलीच्या पश्चिम कड्यावर - सूर्यास्तदर्शन पॉईन्टवरून थेट समुद्र आणि क्षितिज यांचे सूर्याच्या साक्षीने होणारे मीलन विलोभनीय दिसते. याशिवाय टेंपल व्ह्यू, व्ह्यू पार्वती आणि शिरगावकर पॉईन्टस् आहेत. जवळच महादेवगड, नारायणगड, नागतास धबधबा व बॉक्साईटच्या खाणी पाहता येतात. हिरण्यकेशी येथे मासेमारीची सोय आहे. आंबोलीजवळचे चौकुळ हे सह्याद्रीच्या माथ्यावरील गाव पर्यटन गाव (Tourist Village) होऊ शकेल. सावंतवाडीहून आंबोली घाटमार्गे अंतर २० कि.मी. आहे. घाटमाथ्याजवळ एका धनगराची समाधी आहे. घाटातून जाणारी - येणारी वाहने या समाधीचे दर्शन घेऊन पुढे जातात. पूर्वी सावंतवाडी संस्थानचे राजे उन्हाळ्यात येथे येऊन राहत. आंबोलीत चांगला मधही मिळतो.

रत्नागिरीपासून २१५ कि.मी. व बेळगावपासून २६४ कि.मी. अंतरावर असलेल्या हिरण्यकेशी नदीच्या उगमाजवळील शंकराच्या देवस्थानाला भाविक आवर्जून जातात. पर्यटन विकास महामंडळाने हॉलिडे कँप्स् मुद्दाम बांधले आहेत. त्यांचे रिझर्वेशन मुंबई, पणजी, कोल्हापूर, आंबोली येथून होते. असा हा रम्य परिसर एकदा तरी पाहायला हवा.

## ४.६ जव्हार - उत्तर कोकणातील थंड हवेचे अपरिचित स्थान

ठाणे जिल्ह्यातील 'महाबळेश्वर' म्हणून ओळखले जाणारे हे थंड हवेचे ठिकाण फारसे कोणाला माहीत नाही. दादरा - कोपरा धबधबा, हनुमान आणि सनसेट पॉईंटशिवाय भूपतगड, अशरगड, विक्रमगड, अशेरीची लेणी व किल्ला भटकंतीला चांगला आहे. दऱ्या खोरी, वनसौंदर्य, उत्साही हवा, आदिवासी जीवन ही येथील वैशिष्ट्ये. आदिवासींची वारली चित्रकला आणि तारपा नृत्य पाहण्याची दुर्मिळ संधी लाभते.

रेल्वेने इगतपुरीपासून ६१ कि.मी; तर मुंबई - अहमदाबाद रेल्वेमार्गाने डहाणूपासून ६५ कि.मी; नाशिकहून ८० कि.मी; तर त्र्यंबकेश्वरहून ५६ कि.मी.वर जव्हार आहे. ठाण्याहूनही जव्हारला जाण्यास बसची सोय आहे.

राहण्यासाठी पर्यटन विकास मंडळाचे हॉलिडे कॅम्प व इन्स्पेक्शन बंगला रिझर्वेशन केल्यास मिळतो.

महाराष्ट्रातील थंड हवेच्या ठिकाणी मुंबईहून किंवा पुण्याहूनही सहजी जाता येते.

**मुंबईपासूनची अंतरे -**

| | |
|---|---|
| खंडाळा | १०० कि.मी. |
| लोणावळे | १०४ कि.मी. |
| माथेरान | १११ कि.मी. |
| भंडारदरा | १८५ कि.मी. |
| महाबळेश्वर | २५६ कि.मी. |
| पन्हाळा | ४२८ कि.मी. |
| आंबोली | ५४९ कि.मी. |
| चिखलदरा | ७६३ कि.मी. |
| जव्हार | १८० कि.मी. |
| पुणे | १७० कि.मी. |

## ४.७ पन्हाळा - दक्षिण महाराष्ट्रातील थंड स्थान

दक्षिण महाराष्ट्रातील कोल्हापूर परिसरातील, सुमारे २० कि.मी. वरील ऐतिहासिक महत्त्वाचा पन्हाळगड असलेले पन्हाळा हे थंड हवेचे ठिकाण शौर्यगाथांचे साक्षीदार आहे. किल्ल्याच्या वैभवी इतिहासाप्रमाणेच नैसर्गिक भूगोलही सुखद वाटतो. वेगवेगळ्या वृक्षराजींनी आच्छादित डोंगररांगांबरोबरच डोंगराच्या कुशीत कलात्मकरीत्या वाढवलेले तबक उद्यान एक आकर्षण आहे. पावसाळा सोडल्यास इतर वेळी केव्हाही तिथे राहणे शक्य होते; म्हणून कोल्हापूरहून आणि बेळगावहूनही पर्यटक येतात.

राहण्याची सोय शासकीय विश्रामगृहाप्रमाणेच पर्यटन विभागानेही केली आहे आणि हॉटेल्सही होत आहेत.

ऐतिहासिक महत्त्व व थंड हवेचे ठिकाण एकाच स्थळी असल्याने जाणकार मार्गदर्शक घेतल्यास छत्रपती शिवाजी महाराजांनी महाराष्ट्राचा इतिहास घडवताना भूगोलाचा, निसर्गाचा व परिसराचा नेमका उपयोग कसा करून घेतला याची जाण होते आणि मग ही थंड स्थाने स्फूर्तीस्थानेही ठरतात.

# परिचित थंड हवेची ठिकाणे

## ४.८ महाबळेश्वर - पाचगणी

महाराष्ट्रातील सर्वप्रिय, प्रसिद्ध, सर्व थरात माहीत असलेले थंड हवेचे हे ठिकाण सातारा जिल्ह्यात आहे.

ऑर्थरसीट, एलफिन्स्टन पॉईंट, हंटर, कॅनॉट केटस् पॉईंट, लॉडविक, विल्सन, बॉम्बे, मार्जोरी असे अनेक पॉईंटस् आहेत. पहावे तेवढे थोडेच! त्याचबरोबर क्षेत्र महाबळेश्वर आणि मंदिर, कृष्णेचे उगमस्थान भाविकांना खुणावते. प्रतापगड, वाई, पाचगणीचे टेबललँड - पठारी सपाट डोंगरमाथा आणि निवासी शाळा यांना परंपरा आहे.

मुंबईहून पुणेमार्गे २९० कि.मी. अंतरावर तर पुण्याहून खंबाटकी घाटातून १२० कि.मी. वर साताऱ्याहून ६७ कि.मी. अंतरावर हे महाराष्ट्राचे सर्वप्रिय, बहुविध आकर्षणांनी नटलेले पर्यटन केंद्र खासगी व शासकीय निवास - व्यवस्थांसह भरगच्च असते. स्ट्रॉबेरी, रासबेरी, मध, नक्षीदार काठ्या, कलाकुसरींच्या व फरच्या वस्तू यांचे दर्शन महाबळेश्वरच्या बाजारात घडते.

तेथून जवळच तापोळा नावाचे छोटे निसर्गरम्य ठिकाण, फारसे परिचित नसलेले परंतु चित्रपटांच्या बाह्यचित्रणासाठी मोठ्या प्रमाणात वापरले जाते.

पुण्याच्या पर्यटकांना माथेरानपेक्षा महाबळेश्वर अधिक जवळचे वाटते.

वेण्णालेकमधील नौकाविहाराचा आनंद, लाल मातीचे रस्ते, हवेतील सुखद थंडावा, झाडी, फळे, शहरी सुखसोयी आणि निसर्गदर्शन यांचा परवडणारा संगम म्हणजे महाबळेश्वर! ब्रिटिशकाळापासून पर्यटकांचा ओघ वाढतो आहे; मात्र स्वच्छता, स्वच्छतागृहे, पाणीपुरवठा, स्वस्त निवास व उपाहारव्यवस्था वाढायला हव्यात. स्त्रिया व मुलांमुलींसाठी विशेष सोयी करणे गरजेचे आहे.

## ४.९ माथेरान

हिरवा शालू पांघरलेली, लावण्याने नटलेली, हळुवार मनाची नवोढा जशी आपल्या सौंदर्याची मोहिनी घालते, तशीच काहीशी भुरळ माथेरानच्या दर्शनाने पर्यटकांच्या मनाला पडते.माथेरान हे प्रसिद्ध थंड हवेचे ठिकाण रायगड जिल्ह्यात कर्जत तालुक्यात नेरळजवळ आहे.

नेरळहून छोटी डोंगररेल्वे किंवा पायी अशा मार्गांनी १५/२० कि.मी. वर माथेरानला जाता येते. डोंगराच्या माथ्यावरील रान (जंगल) यावरून याला माथेरान हे नामाभिधान मिळाले असावे.

ह्यू मॅलेट या इंग्रज अधिकाऱ्याने प्रथम याचे महत्त्व ओळखले. १८५४ मध्ये लॉर्ड

एल्फिन्स्टन यानी येथे बंगला बांधला. तेव्हापासून माथेरानचे महत्त्व वाढत गेले. आदमज पीरभॉय यांनी तेथल्या सौंदर्याने मोहित होऊन नेरळ ते माथेरान अशी पाऊलवाट तयार केली. योगायोग असा की, त्यांच्याच मुलाने - अब्दुल हुसेनने नेरळ - माथेरान हा लोहमार्ग बांधला. ठाकर, कातकरी, धनगर या लोकांचीच प्रामुख्याने वस्ती असलेल्या या भागात ८५ वर्षांची परंपरा असलेली नगरपालिका आहे.

हार्ट, पॅनोरामा, गार्बेट, अलेक्झांडर, ग्रेट - चौक, लिटल - चौक, वन ट्री हील, एको, मंकी इत्यादी पॉईंटस् प्रसिद्ध आहेत.

मोटारीने माथेरानला जाता येते पण तेथे फिरता येत नाही. माथेरान 'मोटारलेस सिटी' या वैशिष्ट्यानेच मिरवते. फिरण्यासाठी डोली, खुर्ची, गाडी व घोडे मिळतात. घोड्यावरू रपेटीचा आनंद वेगळाच असतो.

शासकीय व खासगी निवासव्यवस्था, हॉटेल्स् भरपूर आहेत. मुंबईच्या पर्यटकांना माथेरा अधिक जवळचे वाटते.

## ४.१० लोणावळा - खंडाळा - कार्ले

पुणे जिल्ह्यातील पुणे - मुंबई या सर्वाधिक गर्दीच्या राष्ट्रीय महामार्गावरील सहलप्रि थंड हवेचे ठिकाण.

वळवण डॅम व बाग, भुशी डॅम परिसर व धबधबे, राजमाची पॉईंट, पक्षी - संग्रहालय, तलावांचा परिसर, कार्ल्याची लेणी, लोहगड - विसापूर किल्ले, वळणावळणाचा बोरघाट, ड्यूक्स नोज, शिरोटा डॅम अशी आकर्षणे शहरी पर्यटकांना खेचून आणतात. त्याचबरोब अनेक हॉटेल्स, खाण्यापिण्याविषयी विविधता, वाहतुकीच्या अनेक सोयी येथे आहेत.

पुण्यापासून फक्त ६० ते ७० कि.मी. अंतरावर ही सर्व ठिकाणे व सोयी असल्याने, तसेच मुंबईपासूनही सुमारे १२० कि.मी. वर असल्याने प्रवाशांना ठिकाणाचे आकर्षण वाटते, तर मुलांना लोणावळा चिक्कीचे आकर्षण वाटते. अनेक प्रकारची मध्यम व महा राहण्या - जेवण्याची व्यवस्था रिझर्वेशनशिवाय होऊ शकते.

कार्ल्याच्या हॉलिडे होमचे रिझर्वेशन पर्यटक महामंडळाकडून मिळू शकते.